म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय :
दा.क्र. :

पु. ल. देशपांडे

# अंमलदार



IRBK-0123908

मूळ लेखक निकोलाय् व्ही. गोगोल यांच्या
डी. जे. कॅम्बेल याने केलेल्या इंग्रजी
भाषांतरावरून केलेले मराठी रूपांतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समो
ठाणे-४०० ६०१
दुरध्वनी - २५४०६७८७

# अं म ल दा र

रूपांतरकर्ता
पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

IRBK-0123908
IRBK-0123908

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

## पुस्तक आणि प्रयोग यांच्या हक्कासंबंधी

या चौथ्या आवृत्तीच्या प्रकाशनाखेरीज पुढील आवृत्तींचे, पटकथेचे, भाषांतराचे, रेडिओसाठी अगर पुस्तकांत उतारे घेण्याचे इत्यादि सर्व हक्क सौ. सुनीता पुरुषोत्तम देशपांडे यांचे स्वाधीन आहेत.

ह्या नाटकाचे प्रयोग फुकट असोत, तिकिटें लावून असोत अगर कुठल्याहि संस्थेच्या मदतीसाठी इ. इ. असोत,

प्रत्येक प्रयोगाचे रुपये पन्नास, सौ. सुनीता पुरुषोत्तम देशपांडे, १ रूपाली, ७७७ शिवाजीनगर, पुणे ४११ ००४ ह्या पत्त्यावर प्रयोगाच्या दहा दिवस आधी पोहोंचतील अशा बेताने पाठवून त्यांची रीतसर परवानगी घ्यावी. परवानगी घेतल्याशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल. मानधनाच्या रकमेबाबत कोणत्याहि सवलतीची अपेक्षा नसावी.

पु. ल. देशपांडे

## प्रथमावृत्तीची प्रस्तावना

सुप्रसिद्ध रशियन लेखक निकोलाय् व्ही. गोगोल ·
पूर्व काळांत झारच्या अमदानींत लिहिलेल्या ' दि ग
ऊर्फ 'इन्स्पेक्टर जनरल' ह्या नाटकाचे हे स्वैर रूपांतर
मूळ नाटकाला मराठी पेहेराव देतांना मी काही काटछाट केली आहे. कही ठिकाणी प्रयोगाचे सोयीसाठी स्वतंत्र मजकूरहि घातला आहे.

हे माझे दुसरे नाटक! माझ्या 'तुका म्हणे आता' ह्या पहिल्या नाटकाचा मीच घेतलेला धसका अजून गेलेला नाही. अशा परिस्थितीत दुसरे नाटक लिहिण्याचे आणि त्याहूनही ते रंगभूमीवर आणण्याचे धाडस माझे ज्येष्ठ स्नेही श्री. नाना जोग यांच्या प्रेरणेमुळे मला झाले. विदर्भ साहित्य संघाने संघमंदिराप्रीत्यर्थ होणाऱ्या नाट्यमहोत्सवांत ह्या नाटकाचा नागपुरांतील 'नागपूर नाट्य मंडळ' ह्या हौशी आणि सुविद्य नाट्यप्रेमी कलाकारांनी चालविलेल्या संस्थेच्या सहकार्याने रंगभूमीवर प्रयोग करण्याचे ठरविले. विदर्भ साहित्य संघानेच हे प्रकाशितहि केले. ह्या दोन संस्थांखेरीज मला अनेकांचे साह्य हे नाटक लिहिताना झाले आहे. मुख्यतः हे वातावरण आणि त्यांतील विनोद पुरवणारी संस्थानिक मंडळी (आता विलीन) यापुढे दिसणार नाहीत याची हळहळ वाटते. त्यांचे अप्रत्यक्ष साह्य मोलाचे आहे. याशिवाय प्रयोगदृष्ट्या महत्त्वाच्या अशा टीपा लिहिणारे नाना जोग, ह्या नाटकाचे हस्तलिखित न कंटाळता नकलून काढणारा माझा उपद्रवी मित्र मुकुंद जोग आणि ज्यांच्या स्नेहाचा आणि सौजन्याचा पुरेपूर फायदा घेऊन ज्यांना मी हे रूपांतरित

जाता जाता ह्या नाटकातील सर्व गुणाचे श्रेय गोगोलला ... आणि दोषांचा वाटा पु. ल. देशपांड्यांचा आहे, हे अत्यंत प्रामाणिकपणाने नमूद करतो.

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

गरिबींतहि ज्यांनीं आपली विनोदबुद्धि
आणि स्वाभिमान जागृत ठेवला होता
त्या माझ्या दिवंगत तीर्थरूपांस मी ही
वाङ्मयीन कृति सादर अर्पण करीत आहे.

—पुरुषोत्तम

## पात्रें

श्री. ढेरेसाहेब : सुरुंगवाड संस्थानचे माजी दिवाण. नूतं स्वतःला ' कलेक्टर ' म्हणतात.

माईसाहेब : त्यांची द्वितीय पत्नी.

कुंदा : त्यांच्या पहिल्या पत्नीची कन्या.

श्री. ढगे : सुरुंगवाडचा पोलिस अधिकारी.

गुंडो गणेश गोळे : हेडमास्तर

श्री. टुमणे : न्यायाधीश.

डॉ. रोंगे : सुरुंगवाडच्या संस्थानी इस्पितळातले डॉक्टर.

हरभट, नारभट : संस्थानच्या मारुतीच्या देवळातले पुजारी.

सर्जेराव : कोल्हापूरच्या इनामदाराचा उल्लू पोरगा.

हणमंता : त्याचा नोकर.

श्री. डाके : पोस्टमास्तर.

रामसेवक : ढेरेसाहेबांचा पट्टेवाला.

शिवाय – वेटर, दोन शेठजी इत्यादि इत्यादि.

स्थळ : सुरुंगवाड–एका टीचभर संस्थानाची राजधानी.

काळ : सुरुंगवाड संस्थान नुकतेच विलीन झाल्याचा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे. ५।५।६०.
दा. क्र. २३०८८
वि. ७११२४

# प्रयोगासंबंधीं कांही सूचना

या नाटकाचा प्रयोग करण्याचा मोह कोणाहि नाट्यप्रेमी माणसाला होईल. शंभर वर्षांपूर्वीच्या रशियाच्या झारने गोगोलच्या मूळ नाटकाचे हस्त-लिखित वाचले आणि त्या नाटकाचा प्रयोग झालाच पाहिजे असा आग्रह धरला —त्याच्या स्वतःच्या राजवटीवर त्यांत विदारक टीका असूनहि आग्रह धरला.

आणि त्याचा पहिला प्रयोग चांगला गाजलाहि. परंतु गोगोलला मात्र तो बार फुसका ठरल्यासारखे झाले. त्याला फार हळहळ वाटली. कारण नटांनी नाटकाचा प्रयोग ' फार्स 'सारखा केला. आपल्याहि रूपांतराची बाष्कळ अभि-नयामुळे तीच गत होऊ नये, तें हास्यकारक होण्याऐवजी हास्यास्पद होऊ नये, असे प्रा. देशपांडे यांनाहि वाटतें. त्यांची ही भीति अगदीच अनाठायी नाही.

प्रयोग करण्यासाठी म्हणून हे नाटक वाचल्यानंतर वाचकाने स्वतःला एक प्रश्न विचारावा. जे पदोपदी खोटे बोलतात, विसंगत बोलतात, जे लुचपत-खोर आहेत, असे या नाटकांतले दहाबारा चकवे एकमेकाला चकवूं पाहतातच कसे? " संसाराच्या रंगभूमीवरचे नट बनून–खरेपणाचा उत्कृष्ट अभिनय करून " हें त्या प्रश्नाचे उत्तर आहे आणि आजच्या काळांत तर ते अगदी पटण्यासारखे

आहे. या उत्कृष्ट ‘ अभिनयाचा अभिनय ’ न करतां प्रेक्षकांकडून पावती घेण्यासाठी जे नट आपल्या खोटेपणाचा अभिनय त्यांना ‘ दाखवितील ’ ते या नाटकाची माती करतील. इथली प्रत्येक व्यक्ति खोटें बोलण्यांत इतकी सरावली आहे की ती अंगदी ‘ सहज ’ खोटें बोलते. ‘ साखरेचा काळा बाजार म्हणजे खून नाही ना केला ( जेठूमल मारवाड्याने ) ? ’ असें बोलणाऱ्या जज्ज टुमण्याची, सवयीमुळे या विचारसरणीवर इतकी श्रद्धा बसली आहे की ती त्यांची विचारप्रणालीच बनली आहे! प्रेक्षक या वाक्यावर हसतील, परंतु त्यांच्याबरोबर जर स्वतः टुमणेहि त्या वाक्यावर हसतील, किंवा नुसते डोळे जरी मिचकावतील, तरी ते आपला ढोंगीपणा उघड करतील—प्रेक्षकांनाच नव्हे; ढेरे, रोंगे, हेडमास्तर इत्यादि त्यांच्या शेजारी बसलेल्या मंडळींना. हें त्या विशिष्ट गंभीर प्रसंगाशी अगदी विसंगत होईल.

इथे प्रत्येकाचाच दाम खोटा आहे. आपला दाम खोटा आहे हें प्रत्येकाला माहितहि आहे, पण तो आपला दोष नव्हे, हें स्वतःला आणि इतरांना पटविण्याच्या प्रयत्नांत प्रत्येकाला एक प्रकारचा आवेश चढतो, आणि त्या आवेशाच्या आवरणाखाली प्रत्येकाचा दोष झाकला जातो.

सर्जेराव मात्र या नियमाला अपवाद आहे. तो हाडाचा ढोंगी नाही. निव्वळ करमणूक हाच त्याचा ‘ स्थायीभाव ’ आहे. साहजिकच उल्लूपणा, उडाणटप्पूपणा, बेजबाबदारपणा यांचा ‘ संचार ’ होणें त्याच्या बाबतीत परिस्थितीमुळे अपरिहार्य होतें. ती परिस्थिति त्याच्या करमणूकप्रियतेमुळे निर्माण होते—हिशेबी स्वार्थीपणामुळे नव्हे. “ तीनपानीमध्ये लोक अलिकडे फार फसवायला लागले आहेत, ” हा त्याचा ‘ नीतिवाद ’ करमणुकीची नासाडी झाल्याच्या उद्वेगामुळे उद्भवतो. गांवांतले लोक त्याला लाच देतात—विनाकारणच, कसला तरी घोटाळा झाल्यामुळे देतात—यांतहि त्याची करमणूकच होते, आणि तिचा एक प्रकारचा कैफ त्याला चढतो. त्याच्या स्वभावाचे स्पष्ट प्रतिबिंब त्याच्या शेवटच्या पत्रांत आपल्याला पाहायला सापडते.

दुसऱ्या अंकांत त्याच्या अंगांत संभाजी संचरतो. त्याचा संचार ‘ सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना ? ’ या वाक्यापासून होतो. हे वाक्य प्रथम तो सहज स्वगत बोलतो. नंतर संभाजीची कल्पना त्याच्या डोक्यांत व डोळ्यांत

चमकते आणि नंतर त्याच वाक्याचा ' संभाजी 'सारखा पुनरुच्चार करून, विविध नटांचीं पोरकट नक्कल करीत, आपल्याच मनाशीं हसत तो तें स्वगत बोलतो.

इथले पुरुष जसे अर्थाच्या बाजारांत आपापलीं खोटीं नाणीं धडाक्याने चालवतात, तशाच इथल्या दोघी बाया लग्नाच्या बाजारांत ' खपणाऱ्या ' खोट्या नोटा आहेत. त्याहि पुरुषांइतक्याच ' नटव्या '-म्हणजे अभिनयपटू आहेत. त्यांच्याकडे पाहून सद्‍भिरुचीच्या प्रेक्षकांना जर थोडी खंत वाटली तर तो नाटककाराचा उद्देश सफल झाल्याचा पुरावा समजावा.

प्रा. देशपांडे यांना हें रुपांतर करण्याची कल्पना मीच दिली. त्यांनी उलट या सूचना लिहिण्याचे काम माझ्यावर टाकले. फारशी जागा न अडवता तें आटोपण्याचा प्रयत्न मी केला आहे.

—नाना जोग

नागपूर,
१९५२

# अंक पहिला

( ढेरेसाहेबांचा दिवाणखाना. जुन्या पद्धतीचें शिसवी फर्निचर. भिंतीवर रविवर्म्याच्या तसबिरी—माईसाहेबांनी केलेल्या भरतकामाचा एक नमुनाहि त्यांत आहे—दाराखिडक्यांना भडक रंगांचे पडदे आहेत. दोन्ही बाजूंना दारं आहेत. मधल्या दारामागून गॅलरी आहे—दिवाणखाना पहिल्या मजल्यावर आहे. गॅलरींतून डोकावून रस्त्यांतल्या माणसांशीं बोलतां येईल येवढीच पहिल्या मजल्याची उंची आहे. जुन्या वाड्याचीच मोडतोड करून अद्ययावत् करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भिंतीवर काळविटांची तोंडं आहेत. जमिनीवर वाघाचं तोंड असलेलं कातडं पसरलं आहे. परंतु मधल्या भिंतीवर मात्र सुरंगवाडचे राजेसाहेब व राणीसाहेब यांच्या मोठ्या तसबिरी टांगलेल्या आहेत. राजेसाहेब मानापमान नाटकांतील लक्ष्मीधरासारखे दिसावेत आणि राणीसाहेबहि दागिन्यांनी मढवलेल्या असाव्यात—

सकाळची वेळ—पडदा वर जातो तेव्हा दिवाणखान्यांत हेडमास्तर गोळे, जज्ज दुमणे आणि डॉक्टर रांगे बसले आहेत. ढेरेसाहेब बाहेर येण्याची वाट पाहत आहेत. हेडमास्तर अधिक आदबीने अंग सावरून बसले आहेत.

डॉ. रांगे कांही वेळाने वाट पाहून कंटाळल्यासारखा चेहरा करून सिगरेटची पेटी काढतात. सिगरेट काढून ओठांत धरतात. इतक्यांत ढेरेसाहेब आल्याची चाहूल लागते. चपापून सिगरेट काढून खिशांत कोंबतात—समोरच्या टीपॉयवर सिगरेटची पेटी पडलेली असते ती ढुमणे आपल्या खिशांत शिताफीने टाकतात—रांगे चमकून त्यांच्याकडे पाहतात तोंच ढेरे येतात. ढेऱ्यांच्या हातात गुरुवारी दत्ताला घालतात तसले रोडावलेले दोन हार आहेत. ढेऱ्यांचे स्नान वगैरे नुकतेच उरकले आहे. कपाळाला दुबोटी गंध लावले आहे. धोतर—सेपरेट कॉलर न लावलेला पट्टीचा रेशमी शर्ट आहे. सोन्याची बटणे, चार बोटांत आंगठ्या आहेत—वय पन्नाशीच्या पुढचे. चेहरा उग्र आहे—मिशांच्या झुबक्यामुळे आणि जाड भुवयांमुळे तो अधिकच उग्र वाटतो. तुरळक केसांचा मधोमध पंचम जॉर्ज बादशहासारखा भांग पाडला आहे. )

**ढेरे**—नमस्कार. आलांत ? बसा. एवढं हें उरकतो.

**हेडमास्तर**—वा. अजून दरबारी रिवाज राखले आहेत ढेरेसाहेबांनी !

**ढेरे**—अर्थात् ! गेली तीस वर्षं अन्न खाल्लंय् ह्यांचं ! संस्थानं विलीन झालीं म्हणून जुन्या निष्ठा विलीन नाही झाल्या आमच्या. बरं का हेडमास्तऽऽर ! ( हार घालून तसबिरींना मुजरा करतात. हेडमास्तरहि करतात. बाकीचे बसल्या जागेवरून नमस्कार करतात. ) काय हो जज्जऽऽ ?

**जज्ज**—अगदी बरोबर ! महाराजांचं कांही पत्र वगैरे आलं होतं की नाही अलीकडे ?

**ढेरे**—महाराजांचं कांही नाही पण ( राणीसाहेबांच्या तसबिरीकडे बोट दाखवून ) आईसाहेबांचं आलं होतं. त्याच्यावरूनच तर काल आमचं भांडण झालं मास्तरांशी—

**हेडमास्तर**—माझ्याशी ?

**ढेरे**—तुमच्याशी नाही हो, पोस्टमास्तरांशी. पोस्टांत पत्रं फोडून वाचायची घाणेरडी खोड आहे त्याला.

**जज्ज**—शी ! काय माणूस आहे ! जुन्या संस्थानी राजवटीत ठीक होतं. आता म्हणजे कठिण आहे—

**ढेरे**—कठिण ? महाभयंकर आहे. त्याच्याचसाठी तर तुम्हाला बोलावणं केलं मी आज–

**हेडमास्तर**—( केवळ ढेरेसाहेबांना बरे वाटावे ह्या हेतूने ) पण ( राणीसाहेबांच्या तसबिरीकडे जोडलेले हात नेऊन ) आईसाहेबमहाराजांची प्रकृति ठीक आहेना ?

**ढेरे**—आईसाहेब गेल्या खड्डयात ! त्यांना काय धाड झाली आहे हो ! त्यांचं काय बिघडलं ? महिना चार हजाराचा तनखा मिळतोय् त्यांना–ह्या नव्या राजवटीत तुमचे आमचे हाल झाले आहेत. लोकशाही म्हणे.हूं! हें वाचा ( खण उघडून पत्र काढतात ) चक्क मृत्युलेख लिहून पाठवला आहे तुमचा आमचा ! दिल्लीहून पत्र आलंय्–

**जज्ज**—म्हणजे संस्थानी खात्यांतून की काय ?

**ढेरे**—संस्थानी खात्यांतून आता पत्र कशाला येतय ? अंमलदार येणार आहे चौकशीला–

**हेडमास्तर**—चौकशी ? कुणाची चौकशी ?

**ढेरे**—आपणा सर्वांची ! सगळ्या संस्थानची बारकाईनं पाहणी करायला दिल्लीहून गुप्तवेषांत एक अंमलदार येणार आहे–

**हेडमास्तर**—गुप्तवेषांत ?

**जज्ज**—बारकाइनं पाहणी ? कसली ?

**ढेरे**—सगळ्यांची ! आपल्या कारभाराविरुद्ध इथल्या चावट लोकांनी दिल्लीला नाही नाही त्या तक्रारी केल्या असतील खोट्या नाट्या–बरं कुणाला बघवतय् ? नव्या राजवटीत आपल्या नोकऱ्या टिकल्या. दिवाणाचे आम्ही हंगामी का होईना, कलेक्टर झालों. बाजारमास्तरचे तुम्ही हेडमास्तर झालांत. प्यालेस सुप्रिंटेंडटचे तुम्ही जज्ज झालांत. झालं, लोकांना नाही पचलं आपलं सुख. पाठवल्या असतील तक्रारी. पोस्टमास्तर सांगत होते की दिल्लीला अलीकडे आपल्याविरुद्ध अर्ज जाताहेत. तरी त्यानं बिचाऱ्यानं पाचपंचवीस अर्ज तसेच दाबले. आता लोक शाहणे झाले आहेत ना. दुसऱ्या गावाला नेऊन तिथल्या पोष्टांत टाकलीं असतील पत्रं. पोष्टमास्तर एकटा कुठे कुठे म्हणून लक्ष देणार ? तसा त्याचा खूप उपयोग आहे आपल्याला–

**हेडमास्तर**—नाही–तसा माणूस एरवी कुणाच्या अध्यांत ना मध्यांत–

**जज्ज**—हो, आता चार लिफाफे फोडले म्हणजे काही माणुसकी सुटली नाही त्याची. बरं पण हे अर्ज कोणी केले, काय केले ह्याचा कांही अंदाज ?

**ढेरे**—सगळं बरोबर माहीत आहे मला. पण आता आधी हें संकट उभं राहतंय याचं काय करायचं बघा. हे पाहा, तुम्हाला माझा दिल्लीचा मेहुणा माहित असेल. आमचा राजाभाऊ–

**हेडमास्तर**—हो, म्हणजे आपल्या पहिल्या कुटुंबाचा भाऊ–

**ढेरे**—तोच. अजून संबंध टिकून आहेत आमचे.

**हेडमास्तर**—त्याला काय होतंय–दुसरं लग्न केलं म्हणून—

**जज्ज**—हो आता पहिली वारली तेव्हाच केलं होतं आपण — नाही पण तरीसुद्धा राहत नाहीत अशीं नातीं. बाकी माणसामाणसावर आहे म्हणा.

**ढेरे**—आमच्या कुंदेचा फार लळा त्याला. शिवाय महाराजांच्या वशि-ल्यानंच पूर्वीच्या राजवटीत दिल्लीला चिकटवला आम्ही त्याला–

**हेडमास्तर**—पण हे तरी स्मरतंय कोण हल्ली !

**ढेरे**—तें स्मरतोय म्हणूनच त्यानं हे पत्र पाठवलं. ऐका– ( लखोटा उघडता उघडता ) मला मात्र असं कांही चमत्कारिक घडणार असं का कोण जाणे पण उगाचच वाटत होतं.

**हेडमास्तर**—ध्या ! काय टुमणेसाहेब ?

**जज्ज**—काय ?

**हेडमास्तर**—इथं येण्यापूर्वी मी काय म्हणालो होतों तुम्हाला ( ढेऱ्यांना उद्देशून ) आपल्या बंगल्यावर यायला रावसाहेबांच्या गाडींतून निघालों. गाडी स्टार्टच घेईना. खाली उतरून ढकलायला मागे जातों, तिथे पोहोचेपर्यंत–अगदी आमंत्रण दिल्यासारखं एक काळं मांजर हे असं ऽ ऽ, डावीकडून उजवीकडे–

**जज्ज**—नाही, उजवीकडून डावीकडे.

**हेडमास्तर**—हो उजवीकडून डावीकडे—गेलं की नाही ? मी लगेच म्हटलं रावसाहेबांना, कांही तरी अशुभ आहे. बरं आपला तातडीचा निरोप, काय करावं कळेना.

**जज्ज**—बरं काल क्लबात आपण प्रकृति ठीक नाही म्हणून अर्धी रमी

टाकून उठून गेला होता, म्हणून आपल्या सिव्हिल सर्जन साहेबांना घेऊन आलो. काय डॉक्टर ?

डॉक्टर—होय ना.

ढेरे—अहो ह्यांना सगळ्यांना मीच बोलवलं होतं.

जज्ज—कालच्या रमींत आम्ही मारले बघा अकरा आणे. आपण मला वाटत मायनस दोनशेतीस होतां—

ढेरे—अहो कुठे कुठे काय काय म्हणून ध्यानात ठेवूं ? पत्र ऐका अगोदर. तीर्थस्वरूप अण्णासाहेबांचे चरणीं यमूयमूयम् (सुरुवातीचा मजकूर अर्धवट पुटपुटतात)—हं, हें ऐका नीट. पत्र लिहिण्यास मुख्य कारण असें—विलीन झालेल्या संस्थानांतील जुन्या अधिकाऱ्यांविरुद्ध रोज येत असलेल्या नांवी आणि निनांवी तक्रारींनी फायली भरून वाहत जात आहेत.

डॉक्टर—काय हलकट आहेत लोक !

ढेरे—याबाबत मला एक ऑफिशियल सीक्रेट कळलें आहे तें असें. ह्या अधिकाऱ्यांचे गैरवर्तन व लांचलुचपत ह्याबाबत गुप्त चौकशी करण्यासाठी एका खास अंमलदाराची नेमणूक झाली आहे. सदरहू अंमलदार ही चौकशी करण्यासाठी गुप्त वेषानें त्या भागांत लवकरच येणार आहेत. साध्या वेषांत वावरून सर्व माहिती गोळा करून अधिकाऱ्यांना शासन किंवा नोकरीवरून कमी करण्याच्या शिफारसी करण्यासाठी ही नेमणूक आहे. आपल्यासारख्या निःस्पृह आणि पापभीरु अधिकाऱ्यांना जरी धोका नसला, तरी जुन्या संस्थानी खात्यांत वाढलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना वेळीच सावध करणे इष्ट आहे. सावध असावें. एव्हाना तो अंमलदार सुरंगवाडच्या हद्दीत पोहोचून काम सुरूहि झालें असेल. बरोबरीच्या आपल्या इतर अधिकाऱ्यांना दक्षता घेण्यास सांगावें. वेळ काही सांगून येत नाही. बाकी सर्व मजकूर घरगुती आहे. सौ. माईसाहेबांची प्रकृति कशी आहे ? कुंदा यंदा पुन्हा मॅट्रिकला बसणार का ?—हं तें सोडा. आता बोला ! !

जज्ज—कठिण आहे.

हेडमास्तर—पण दिल्ली कुठे, सुरंगवाड कुठे, ही चौकशी काय ? म्हणजे सगळ्या खात्यांची की काय ?

ढेरे—होय होय ! सगळ्या खात्यांची आणि सगळ्या खाणाऱ्यांची.

जज्ज—मला वाटतं नुसतं एवढंच नसेल. सध्या गावोगावी हे गुप्त कट वगैरे चालले आहेत. सरकारचा कांही राजकीय हेतू असेल.

ढेरे—राजकीय हेतू ? आणि इथं सुरुंगवाडात ? झेंडावंदनाला पंधरा माणसं जमत नाहीत. सभेपेक्षा सभेच्या व्यवस्थेचे पोलीसच अधिक असतात. स्वराज्य आलं म्हणून सांगितलं कोकलून तरी विश्वास बसत नाही लोकांचा. बापजन्मीं कधी राजकारणाशी संबंध आलाय इथल्या लोकांचा ? सिव्हिल जज्ज झाल्यावर काय वाटेल तें बोललं तरी पचेल असं वाटलं काय ट्रुमणे तुम्हाला ?

जज्ज—तसं नाही ढेरेसाहेब—

हेडमास्तर—नाही, पण दिल्लीकरांना आमची काळजी कशाला ?

ढेरे—दिल्लीकर ? वर्गात इतिहासाचा तास चाललाय असं वाटलं काय मास्तर तुम्हाला ? दिल्लीकर म्हणे ! शहाआलम बादशहाच्या अमदानीत असल्यासारखेच बोलताय ! दिल्लीकर म्हणे !

जज्ज—अहो भलतंच ! तिथं खडान् खडा माहिती असते दिल्लीला.

हेडमास्तर—असेल बुवा. पण आता कसं काय करायचं ?

ढेरे—काय करायचं ? कलेक्टर ॲज् सच् माझ्या खात्यांतल्या लोकांना तंबी गेली आहे. पोलीस सुप्रिंटेंडेंटला कळवलंय.

जज्ज—म्हणजे आपला ढगे. चांगला चान्स मारला लेकानं !

हेडमास्तर—ढेरेसाहेबांची कृपा. फौजदाराचा डी. एस्. पी. झाला.

ढेरे—हं-हेच बोंबलत सुटा. म्हणजे अलगद त्या अंमलदाराच्या कानावरं जाऊं दे सगळी बातमी. ढग्याला, ताकीद दिली आहे मी. जिल्ह्यांत शांतता आणि सुव्यवस्था अशी पाहिजे की, अंमलदाराला वाटावं, इथल्या तमाम लोकांच्या वाचा कुठल्यातरी सार्वजनिक सार्थांत बंद झाल्या आहेत. सगळ्यांचे आवाज बंद ! रस्तोरस्ती बोर्ड टांगले आहेत. डाव्या बाजूने गाडी हाका. उजव्या बाजूने चला. रस्त्यांत थुंकू नका. जरा कोणी मोडला कायदा की दंडाशिवाय बात नाही. दोन दिवसांत तीनशे रुपये दंड नुसता रॉंगसाइड आणि ओव्हर-लोडचा वसूल केलाय. त्यांतून पोलिसांच्या कपड्यांना पितळेची बटनं आणलीं.

सेफ्टी पिना लावून हिंडत होतें लेकाचे ! आमचीं खातीं चोख आहेत. तुमचीं सांभाळा.

**हेडमास्तर**—पण, हें पत्र केव्हा आलं ?

**ढेरे**—झाले चारपांच दिवस.

**जज्ज**—पण साहेब, आधी कळवलं असतं तर ? आता आयत्या वेळी व्यवस्था करायची म्हणजे–बिकट आहे.

**ढेरे**—चांगलं आहे ! वास्तविक तुम्हाला हे कळवणं हा गुन्हा आहे. तुमच्या कल्याणासाठी हे रिस्क पत्करून तुम्हाला कळविण्यासाठी मुद्दाम बोलावलं आज. आणि उलट आधी कां कळवलं नाही म्हणून विचारता ? इन्सबॉर्डिनेशन् !

**जज्ज**—नाही, पण तसंच पाहायला गेलं तर कलेक्टर ॲज् सच् जिल्ह्याची सगळी जबाबदारी पर्यायानं आपल्यावरच येऊन पडेल–

**ढेरे**—माहिती आहे मला. मला शहाणपणा नका शिकवूं. तुम्ही–विशेषतः डॉ. रोंगे, तुम्ही काळजी घ्या. हॉस्पिटलं बघायची फार खोड असते ह्या मोठ्या लोकांना. सरकारी हॉस्पिटलचे डॉक्टर तुम्ही. बिछान्यावरच्या चादरी धुऊन घ्या आजच्या आज. एखादे वेळी पेशंटच्या वेषांत येऊन राहिला सुद्धा असेल तो अंमलदार. किती पेशंट आहेत हल्ली ?

**डॉ. रोंगे**—सध्या कोणी नाही.

**ढेरे**—काल तर पंधरावीस माणसं दिसत होतीं–

**डॉ. रोंगे**—तीं–तीं–होय–

**ढेरे**—त त प प काय करता ?

**डॉ. रोंगे**—नाही, ती जाणार आहेत आज.

**ढेरे**—ठेऊन घ्या त्यांना चार दिवस. आणि भिंतीवर तुमचे ते वेळापत्रका-सारखे कागद असतात त्यांच्यावर पाचपंचवीस ठिपकेबिपके काढून ठेवा. काय मनाला येईल तो ताप टिपा ! दोनचार पेशंट सीरियस करून खडखडीत बरे झाले म्हणून नोंदवा. राहूं देत ते पेशंट.

**डॉ रोंगे**—पेशंट नाहीत ते–

**ढेरे**—मग ?

**डॉ. रोंगे**—आमच्या बाबीच्या लग्नाचं वऱ्हाड उतरलं होतं–

ढेरे—म्हणजे ? जानोसा सरकारी हॉस्पिटलच्या वार्डात ठेवला होता ? आणि बायकांची व्यवस्था मॅटर्निटीच्या इमारतीत केली होती की काय ?

डॉ. रांगे—नाही, पण सध्या जागेची अडचण पाहताच आपण–

ढेरे—अहो म्हणून काय लग्नाचं वऱ्हाड सरकारी दवाखान्यांत उतरायचं ? हाकलून द्या सगळ्यांना. आणि संध्याकाळपर्यंत पाहा कुठे पेशंट मिळाले तर. त्या मारुतीच्या देवळासमोरचे भिकारी उचला आणि निजवा त्यांना चार दिवस खाटेवर.

डॉ. रांगे—मुंबईहून औषधं मागवावी लागतील.

ढेरे—आणखी औषधं ? परवा तर पाचशे रुपयांची औषधं आणवलीं. ती संपली काय इतक्यात ?

डॉ. रांगे—औषधं दीडशेच रुपयांची होती ढेरेसाहेब. आपण म्हणालांत म्हणून पांचशेचीं बिलं करून घेतलीं होतीं.

ढेरे—हेंच बोला आणखी मोठ्यानं त्या अंमलदारापुढे आणि लावा फास आमच्या नरड्याला ! आणा काय औषधं आणायची असतील तीं. आणि जातांना आमच्या टॉमीला तपासून जा. कालपासून सारखा भुंकतोय तो. मला वाटतं पोट बिघडलंय त्याचं.

डॉ. रांगे—अरे ! तपासतों. नाहीतर ॲम्ब्युलन्स पाठवून घेऊन जाईन. गुरांच्या दवाखान्यांत सुद्धा कोणीच पेशंट नाही.

ढेरे—तें बघा तुम्ही. आणि तुम्ही मिस्टर ढुमणे, नोकरी टिकवायची असेल तर ऐका ! जरा कोर्टाला व्हाइटवॉश वगैरे काढून घ्या. आणि काहो, तुमच्या बंगल्यावरच्या कोंबड्या कोर्टात कशाला येतात ? कोर्टाची पोल्ट्री करून टाकली आहे अगदी. तुमचे हे खाजगी शौक घरापुरते ठेवा की. कोर्टात वकीलां-पेक्षा कोंबड्याच अधिक झाल्या आहेत.

हेडमास्तर—मग चार कोंबड्या ( हाताने कापण्याचा अभिनय करीत ) –करा की. ढेरेसाहेब, आपल्याला चालतं ना ?

जज्ज—न चालायला काय झालं ? रात्री येता जेवायला ? आमचा हुसेन पट्टेवाला मस्त पकवतो—

ढेरे—ढुमणे, प्रसंगाचं गांभीर्य जज्ज असून तुमच्या लक्षांत येत नाही

अजून–कोंबड्या कसल्या खाताय्? तो अंमलदार येणार आहे ना तुमच्या आमच्या मुंड्या मुरगळायला. नाहीतर चार दिवस राहूं देत तुमच्या कोंबड्या. त्यालाच खिलवूं या. आणि दुसरं म्हणजे वकिलांना खाजगी ताकीद देऊन ठेवा. तुमचा आताशा तो बोभाटा फार व्हायला लागला आहे. वाढत्या संसाराला पगार अपुरा पडतो, मान्य आहे मला. दिवस हे असे आहेत, कबूल आहे. तुम्हीहि अगदी रामशास्त्री प्रभुणे व्हायला पाहिजे असं नाही. पण जरा बेतानं. एखादे दिवशी हा अंमलदार आरोपीच्या वेषांत उभा राह्यचा कोर्टात आणि मूठ दाबता दाबता अलगद हातकड्या चढवून द्यायचा हातांत. संसाराचं खटलं वाढतंय तुमच्या, म्हणून इशारा देतोंय. वास्तविक तुम्हाला कितीदा सांगितलं, आमच्या परमार्थ मंडळांत येत चला. पण नाही. चोवीस तास संसार आणि त्या कोंबड्या ह्यापलीकडे विचार नाही दुसरा. वास्तविक न्यायाधीश म्हणजे काय पाहिजे! जाऊं द्या झालं. आमचंच चुकलं. आम्ही शिफारसी केल्या आणि पॅलेस सुप्रिटेंडंटचे तुम्ही जज्ज झालांत. आता जागा टिकविणं आणि गमावणं तुमच्याच हातांत आहे.

जज्ज––नाही, पण खरं सांगायचं म्हणजे सगळे अधिकारी आजकाल हात ओले करून घेताहेत...पण आमच्याच विरुद्ध बभ्रा अधिक. नाही, म्हणजे आम्ही स्वतःला अगदी आपण म्हणालांत तसे रामशास्त्री प्रभुणे नाही समजत. न्यायदेवतेच्या आसनाचा मान राखून अगदी नैवेद्याच्या स्वरूपात थोडंफार स्वीकारतों, पण सांगायचा मुद्दा म्हणजे बभ्रा अधिक. परवा त्या जेटुमल मारवाड्याची केस–कसं झालं तरी गावांतला प्रतिष्ठित इसम. त्याला साखरेच्या केसमध्ये सोडलं आम्ही, म्हणून गावांतल्या वर्तमानपत्रवाल्यांनी शंख केला आमच्या नांवानं. साखरेचा काळाबाजार म्हणजे खून नाही ना केला त्यानं? कोर्ट उठेपर्यंत शिक्षा भरपूर होती त्याला. आता त्या दिवशी बोर्डावर दुसरी कामंच नव्हतीं आणि आम्ही लवकर उठलों हा कांही त्याचा अपराध नव्हे. बरं त्याला शिक्षा म्हणून आम्ही दिवसभर बसून राहायचं की काय? त्याच्या बायकोनं आमच्या हिला बाळंतविडा म्हणून सोन्याच्या बांगड्या दिल्या म्हणजे कांही आम्ही ब्राइब घेतली असं होत नाही. जेठुमलावर केस झाली त्याच वेळीं आमची ही प्रसूत झाली हा काही आमचा दोष नाही––

ढेरे—तें तुमचं तुम्ही ठरवा ! आणि तुम्ही–मास्तर, ॲज ए हेडमास्तर, शाळेंतल्या इतर मास्तरांच्यावर तुमचा वचक पाहिजे. परवा तुमच्या मुलाच्या मुंजीत वाढायला तुमच्या शाळेंतले मास्तर होते. शिक्षकांच्या दर्जाला शोभत नाही हे !

हेडमास्तर—पण तेच होऊन आले.

ढेरे—आर्ग्युमेंट करूं नका. आले तर तुम्ही येऊ द्यायचे नाहीत. ते संस्कृतचे शास्त्रीबुवा आंत बटाटे चिरत बसलेले मी पाहिले.

हेडमास्तर—पण त्यांना मी धड्याला पावली ह्या दरानं चार धड्यांची रुपया चिरणावळ दिली आहे. नाही तरी पूर्वी त्यांची खाणावळच होती.

ढेरे—खाणावळवाल्याला तुम्ही संस्कृत शिकवायला नेमलंय ? आणि इंग्रजीला कोण बटलर ठेवलाय का–

हेडमास्तर—पण हल्ली मास्तर मिळत नाहीत ट्रेंड मास्तरांचे पगार परवडत नाहीत.

ढेरे—म्हणून काय खाणावळवाल्याला नेमायचं ? सध्या एकूण शिक्षक किती आहेत ?

हेडमास्तर—आहेत दहाबारा. ड्रॉइंग मास्तर गेल्याच महिन्यांत सोडून गेले. यंदा ड्रिलमास्तरहि नाहीत.

ढेरे—तो जिनगर आळींतला उस्मान जिनगर आहे, त्याला नेमा थोडे दिवस. बेगड कातरून वस्तू बनवतो बघा तो. हॅण्डीक्राफ्ट्स् टीचर म्हणा त्याला. आणि त्याच्याच दुकानातल्या वस्तू मांडून ठेवा ड्रॉइंग हॉलमध्ये. ड्रिलला आपल्या दादू गवळ्याला सांगा. तो फौजेत होता आपल्या. त्याच्याकडे खाकी विजार आणि सद्राहि असेल. चार दिवस पोरांना हातपाय हालवायला शिकव म्हणावं. शाळेंतल्या सर्व मुलांना फुकट सरकारी खर्चांत दूध पाजायची योजना आहे म्हणावं, म्हणजे येईल तो. खरंच हातपाय हालवण्यावरून आठवलं, तुमचा तो इतिहासाचा मास्तर–काय नांव त्याचं ?

हेडमास्तर–भुतेगुरुजी–

ढेरे—तो एवढासा इसम गुरुजी म्हणवतो का स्वतःला ? त्या दिवशी शिवजयंतीला शिवाजीवर भाषण दिलं त्यानं, केवढ्यांदा ओरडत होता.

हातवारे काय करीत होता. विद्वान असेल हो तो, पण अफझुलखानाचा वध अगदी आपण स्वतः केला अशा थाटांत कशाला ओरडायला पाहिजे? त्याला ताकीद द्या. नाहीतर अंमलदाराच्याच अंगावर किंचाळून जाईल. काय करीत होता हा पूर्वी?

**हेडमास्तर**—नाटककंपनींत होता. गणोजी शिर्क्यांचं काम पेटंट त्याचं–

**ढेरे**—म्हणून शाळेंत देखील शिरा ताणतो वाटतं? त्याला ताकीद द्या.

**हेडमास्तर**—देऊं या की.

**ढेरे**—अहो देऊं या, करूं या, असं नको. आत्ता द्या! एरवी काही भीति नव्हती. पण हा वेषांतर करून येणारा अंमलदार आता एवढ्यांत उभा राहायचा आणि विचारायचा, इथला जज्ज कोण आहे? मार्तंडराव टुमणे, आणा त्याला समोर. सरकारी डॉक्टर कोण? डॉ. रोंगे, एल्. सी. पी. एस्.

**डॉ. रोंगे**—शिवाय होमिओपाथीच्या डिग्र्या आहेत माझ्या!

**ढेरे**—शट् अप्! हेडमास्तर कोण आहे?

**हेडमास्तर**—( भयंकर भेदरून ) मी–

**ढेरे**—मला माहिती आहे हो. अंमलदाराला काय सांगू? हेडमास्तर मिस्टर गोळे!

**हेडमास्तर**—यस् सर ( थरथरतो )

**ढेरे**—तुमचं शिक्षण काय झालं आहे? काय उत्तर देणार तुम्ही? सांगा एम्. ए. आहे म्हणून. तो कुठे सर्टिफिकिटं तपासायला येणार आहे?

**हेडमास्तर**—काय सांगावें! एखादे वेळीं मागितलीं तर? हो–

**ढेरे**—भयंकर आहे. आलिया भोगासी–

( दार उघडून पोस्टमास्तर हरिभाऊ डाके येतात. सर्वजण दचकतात. )

**पोस्टमास्तर**—ऑं–तुम्ही सर्वजण इथेच आहांत वाटतं? काहो ढेरेसाहेब, हे अंमलदाराचं प्रकरण काय उद्भवलं आहे नवीनच?

**ढेरे**—तुम्हाला कळली वाटतं बातमी? कांही त्याच्या नांवचं पत्रबित्र आलंय का तुमच्या पोस्टांत?

**पोस्टमास्तर**—अजून कांही नाही. आज पाहिलेल्या पत्रांत तर कांही नाही. त्या सुंद्राबाई नर्सला तेवढं एक गमतीदार पत्र आलंय–

**हेडमास्तर**—आणलंय का ?

**ढेरे**—मास्तर, प्रसंग काय ? तुम्ही कुठे आहांत ? उद्या पटापट नोकऱ्या गमावून बसलांत म्हणजे त्या मुडणीचीं लुगडीं धुवायलासुद्धा कोणी नेमणार नाही तुम्हाला. डाक् मास्तर, तुम्हाला कसं कळलं हे अंमलदाराचं प्रकरण ?

**पोस्टमास्तर**—तो नारभट आला होता पोस्टांत, तो म्हणाला.

**ढेरे**—बरोबर ! मवाशी मीच सांगितलं होतं त्याला. ह्या भटुर्ग्यांच्या पोटांत एक गोष्ट राहील तर शपथ ! तो नारभट आणि तो हरभट. देवस्थान ट्रस्टी म्हणून कायम नेमणुका करून घेतल्या ह्या भटांच्या, बजावलं होतं त्याला कुठे बोंबलत सांगू नकोस म्हणून–जाऊ दे. तुम्हाला काय वाटतं ? हा अंमलदार कशाला येणार असेल इथं ?

**पोस्टमास्तर**—कांहीतरी राजकीय हेतू असेल त्याचा.

**जज्ज**—राइट् ! माझंहि हेच मत आहे.

**पोस्टमास्तर**—नव्या महायुद्धाचंहि वाटतं आहे–

**ढेरे**—त्यांत सुरुंगवाडचा काय संबंध ? महायुद्ध म्हणे ! तुमच्या आमच्याशीच करायचं असेल त्याला युद्ध. आपले मुडदे पडणार इथं. काय ?

**पोस्टमास्तर**—कांही सांगता येत नाही बुवा ! तुमचं काय मत आहे ?

**ढेरे**—आपल्याला काय ? तशी कांहीच भीति वाटत नाही म्हणा. जरा उगाच नर्व्हसनेस वाटतोय. बाकी तसं कांहीच कारण नाही. तो (वर बोट दाखवून) साक्षी आहे. कर नाही त्याला डर कशाची !! मास्तर, (हेडमास्तर पुढे येतात) तुम्ही नाही हो. पोस्टमास्तर! मास्तर, जरा इकडे या. मला वाटतंय आमच्या हितशत्रूंनी कांही कारण नसतांना दिल्लीला सेंट्रल गव्हर्मेंटकडे कांही पर्सनल हेवेदावे–काय–उगाच आपलं—काय हे, ते वगैरे काय ? त्यासाठी येणार असेल–काय ? तुम्ही पोस्टांत येणारं प्रत्येक पत्र जरा तपासून पाहा. फोडून पाहा असं नाही सांगत, पण जमल्यास बघा. मला वाटतं वाफेवर उघडता येत असतील बंद लिफाफे—

**पोस्टमास्तर**—डोंट वरी. आज वीस वर्षांचा अनुभव आहे. कांही वाईट हेतू नाही आपला. आपली मौज जरा. काय पत्रं येतात हो एकेक—

**ढेरे**—एवढ्यांत दिल्लीहून कांही—

**पोस्टमास्तर**—नाही बुवा. पण पुण्यामुंबईहून खूप येतात. दाखवीन एखादे दिवशी. रामराम, काय नीति विघडत चालली आहे हो लोकांची! ह्या सुंद्रासुइणीला कोणाचं पत्र आलं असेल असं वाटतं तुम्हाला? तीन ट्राय—

**हेडमास्तर**—आपण नाही बुवा पाठवलं.

**जज्ज**—आपण सुद्धा नाही पाठवलं.

**पोस्टमास्तर**—अरे तुम्ही कोण? हू यू? प्रत्यक्ष मुंबईच्या एका ब्रह्मचारी देशभक्ताचं पत्र आहे. अमेरिकेला जातोय म्हणे तो मनःशांतीवर व्याख्यान द्यायला. सुन्द्रीला सेक्रेटरी म्हणून नेणार आहे.

**जज्ज**—कोणाला? त्या सुइणीला?

**पोस्टमास्तर**—यस्, पुरावा आहे ह्या इथे! (खिशांत हात घालतो.)

**जज्ज**—बघू ते पत्र!

**ढेरे**—डाकेमास्तर, पत्र खिशांत ठेवा.

**जज्ज**—ठेवा खिशांत. पण मास्तर, अशानं भानगडीत याल एखादे दिवशीं. दुसऱ्यांची पत्रं फोडून वाचणं हा गुन्हा आहे. ब्रीच ऑफ ट्रस्ट!

**ढेरे**—पण मी त्यांना सांगतोय ते तुमच्या हितासाठी. मला काय? आमचं कूस वाकडं करायची छाती नाही त्या अंमलदाराची. पण कसं झालं तरी संस्थानी राजवटीत इमानानं राबलेले गादीचे सेवक आपण. नव्या राजवटीत भरडले जाऊ नये म्हणून ही दक्षता—

**जज्ज**—बरोबर आहे! पोस्टमास्तरांच्या मदतीची आपल्याला आवश्यकता आहे.

**पोस्टमास्तर**—आपण मध्यरात्रीला तयार आहों! नुस्ती हाक मारा, मी उभा आहे! (कोचावर बसतो) परवा फुलचंद शेठ मेला—

**ढेरे**—डाकेमास्तर, फुलचंद शेठ मेला—त्याचं सोनं झालं. आपलं काय होणार आहे ते बघा आधी. वेषांतर केलेला अंमलदार! काय सांगावं, धाडदिशी दार उघडले आणि—(दार उघडून नारभट आणि हरभट हे दोघे भटजी—जुळे भाऊ असावेत असे दिसणारे—येतात.)

**हरभट**—ढेरेसाहेब, महदाश्चर्य!

**नारभट**—विचारूं नका. आपली तर बोबडीच वळली.

**सर्व**—ऑं–काय झालं ?

**हरभट**—केवळ चमत्कार ! छ्या : ! आम्ही चाललों होतों तातू भंडाऱ्याच्या खाणावळीकडे–

**नारभट**—( त्याला अडवीत ) म्हणजे झाली काय गंमत ? मी निघालों होतों तातू भंडाऱ्याला भेटायला. मी हरभटाला म्हटले, रे हरभट–

**हरभट**—तशी मी म्हणालों, ओ–तशी नारभट मला म्हणे कसा, तातू भंडाऱ्याच्या खाणौळींत येतोस काय ?

**नारभट**—तर हा मला म्हणे, सकाळींच निघालास काय नळी फोडायला ? तशी मी म्हटलें नळी कसली फोडतोस–

**हरभट**—फोडीत नाहीस काय एरवीं ? घे गायत्रीची शपथ.

**नारभट**—फोडतों. खोटें कां बोलूं ? पण तातूकडेस आहे उद्या सत्य-नारायण––

**हरभट**—वर्षांतून बारा सत्यनारायण करतो तातू. भंडारी असला तरी धर्मनिष्ठ आहे.

**नारभट**—धर्मनिष्ठ कसला रांडीचा ? धंदा चालू आहे जोरांत लॉजिंग-बोर्डिंगाचा.

**हरभट**—पण श्रद्धा आहे ना ?

**ढेरे**—हरभट, जरा आवरा. खाली बसा मंडळी. थांबा. हं नारभट, सांगा काय पाहिलंत तें. आणि ए शास्त्र्या, मधे बोललास तर शेंडी उपटून हातांत देईन. सांगा नारभट.

**नारभट**—( सत्पक्षाचा पाठिंबा मिळाल्याच्या ऐटीत बोलू लागतो ) सकाळीं वाणी गल्लींतल्या मलुष्ट्याकडची एकादष्णी आटपली आणि नामजोशी वकिलांकडे लघुरुद्र कधी करणार विचारायला गेलों. नामजोशी वकील गेले होते साठे डाक्टरांकडे, म्हणून तिथून आपल्या बंगल्यावर आलों. पूजा उरकून बाईसाहेबांना तीर्थ दिलें आणि आपण भेटलांत. आपण ती अंमल-दाराची बातमी सांगितलीत ती कळवून त्याबद्दल कांही सरकारी गाजीट आलें आहे किंवा कसें ह्याबद्दल चौकशी करावी म्हणून डाकेमास्तरांना भेटायला

पोष्टांत गेलों तर मास्तर भाजी घेऊन येतांना पोस्टाच्या फाटकांतच भेटले. त्यांस वर्तमान दिलें आणि पुढे निघालों तो हरभट भेटला—

**हरभट**—होय. भेटलों मी, दामू शिंप्याच्या दुकानाशीं. जरा बंडी सैल करून घेतली मी आज. दामूनं त्यास एक बिडी दिली, मस एक दिली. मी–

**नारभट**—मी एक झुरका घेऊन हरभटास म्हटलें, रे हरभट–

**हरभट**—मी म्हणे ओ–

**नारभट**—हरभट, हे दिल्लीच्या अंमलदाराचें लचांड कळ्लें काय तुला ? तो म्हणे कोण अंबलदार–

**हरभट**—नाही ! मी म्हटलें कुठला अंबलदार–

**नारभट**—कुठला अंबलदार–हो ! अडवूं नकोस असा मला ! मला सहज काय सुचलें, अंबलदार आहे दिल्लीचा म्हणजे कांही वरणभातवाला असायचा नाही. डब्बल टी वाला असणार. मीं हरभटास काय म्हटलें, धोरण हो आपलें माझें. हरभट, जरा तातू भंडाऱ्याच्या लॉजिंगबोर्डिंगावरून वळण घेऊन जाऊं या.

**हरभट**—मीं म्हटलें जाऊं या. काय ?

**नारभट**—हो ! हा म्हणे जाऊं या. तर सांगायची गोष्ट, आम्हीं तातू भंडाऱ्याच्या न्यू गुरुप्रेम मटण प्लेट हाऊसमध्ये गेलों–

**हरभट**—धि न्यू गुरुप्रेम–

**नारभट**—होय, धी न्यू गुरुप्रेम मटण प्लेट हाऊसमध्ये गेलों. आंत गेलों. तातू गेला होता खाटकाकडे. मी सहज हिकडेतिकडे पाहतों तर पलीकडच्या खोलींतून, म्हणजे उत्तरेच्या, आपल्या शंभू तांबटाच्या दुकानाच्या बाजूच्या खोलीतून एक चांगला उमदा तरुण–

**हरभट**— हो उमदा तरुण, अंगांत ड्रेसब्रिस कांही नाही–

**ढेरे**—म्हणजे ?

**नारभट**—म्हणजे ड्रेस नव्हता. साधे कपडे होते. असा हिंडतांना पाहिला. मी लगेच हरभटास म्हटलें, हरभट, अरे हा कोण संप्रति नवा पुरुषावतार ? डोळ्यांच्या पाण्यावरून ओळखलें. हा कांही साधासुधा पाशिंजर नाही. इतक्यांत

मटण घेऊन स्वतः तातूच आला. मी तातूस एका बाजूस नेलें आणि म्हटलें तातू–

**हरभट**—मी आधी साद घातली, तातू–

**नारभट**—हो, मीं म्हटलें तातू, हा नवा पाशिंजर रे कोण? तशी तातू म्हणे कसा? मेहरबानी करा शास्त्रीबुवा, पण त्या पाशिंजराच्या बाबतींत काही विचारूं नका मला–

**ढेरे**—आँ! तातू म्हणाला असं?

**नारभट**—ब्रह्मगांठेशपथ. मीं पुन्हा खोंचलें त्याला. सोडतो काय? तातू गायत्रीशपथ तुला, सांग कोण तो? तर तातू म्हणे, हा इसम दिल्लीहून आलों म्हणून सांगतोय! दोन आठवडे एक पैसा न देतां राह्यलाय. अजून मुक्काम हल-वायचीं चिन्हें दिसत नाहीत. मला शंका आली. मीं म्हटलें, अरेच्या–

**हरभट**—अगोदर मीं म्हटलें अरेच्या–

**नारभट**—बरें तूं म्हटलेंस अरेच्या. पण मीं सुद्धा नाही का म्हटलें? सांग. आम्ही दोघेहि म्हणालों अरेच्या!! दिल्लीचा इसम सुरुंगवाडच्या तातू भंडाऱ्याच्या हॉटेलांत कां राहतो? आणि एवढा अंबलदार असून?

**ढेरे**—कोण अंमलदार?

**नारभट**—तोच–

**ढेरे**—शक्य नाही. हरे राम! नाही नाही, शक्य नाही–

**नारभट**—तोच असला पाहिजे. तातूस कांहीतरी अंतस्थ बातमी ठाऊक असेल. नाहीतर फुकट्या पाशिंजराला तातू ठेवेल कसा?

**हरभट**—मलाहि वाटतें तोच तो. त्याची नजर कशी कावळ्यासारखी. आम्ही किचन सुपाची बशी तोंडाला लावली, बरें नाही म्हणून हो. काय नारभट–

**नारभट**—हो, नाहीतर कोण खातोय तें अभक्ष्य? रुग्णाला रूढीबंधन नाही हें शास्त्रवचन आहे–

**हरभट**—पण तो अंबलदार बघे कसा आमच्याकडे! त्याच्या दृष्टीवरून मी ताडलें आणि तोंडासमोर बशी धरून नारभटाला हळूच म्हटले, नारू–अंब-

ल्दारच हा. हळूच तो पुढे आला आणि नारभटाच्या मागे उभा राहून बर्शांत नजर टाकून गेला.

**ढेरे**—परमेश्वरा ! हरभट, शंकरावर अभिषेक धरा. किती नंबरच्या खोलींत उतरला आहे तो ?

**नार-हरभट**—तीन नंबरच्या. उत्तरेकडची खोली. गेल्या सालीं सरकारी अधिकाऱ्यासाठी खास चंदा नायकिणीच्या गाण्याचा प्रोग्राम केला होता ती खोली–

**ढेरे**—किती दिवस झाले त्याला येऊन ?

**हरभट**—होळीच्या दिवशीं आला म्हणे.

**ढेरे**—होळी ? रामराम ! तेव्हापासून बघतोय तो सारं ? म्हणजे ढुमणे, तुमच्या कोर्टातल्या कांबड्या नक्की मोजून गेला असेल तो. धुळवडीच्या दिवसा-नंतर अजून गावांतले रस्ते देखील झाडले नाहीत. सगळा गाव नुसता कचऱ्याच्या पेटीसारखा झालाय. मरा आता ! बरं, वय काय त्याचं ?

**नारभट**—चोवीस.

**हरभट**—किंवा तीस—

**ढेरे**—तरुण आहे म्हणजे ! हरकत नाही. संस्थानी मुत्सद्यांशी गाठ आहे म्हणावं.

**जज्ज**—मला वाटतं आपण सर्व अधिकाऱ्यांनी त्याला जाऊन भेटावं.

**ढेरे**—नको, मी जाईन एकटा. हरभट, तें अभिषेकाचं बघा.

**हरभट**—अभिषेकपात्र फुटलं आहे. नवीन घ्यायला पाहिजे. पन्नास-एक रुपये पडतील–

**ढेरे**—अहो तूर्त तुमच्या घरच्या बादलीला भोक पाडून ओता पाणी. कुठूनही पिंडीवर पाणी पडल्याशीं कारण— छे ! मीच जाऊन भेटतो त्याला ! नारभट, तुम्ही या माझ्याबरोबर. सहज फेरी टाकून येऊं या. रामसेवक– ( रामसेवक येतो ). डीएसी साबको बोलाव. नाही तर थांब. तुम्...थांब कोणाला तरी पाठवून दे—तुम मत जाव.

**हेडमास्तर**—मग आम्ही निघतों. चला ढुमणेसाहेब. कांही तरी व्यवस्थेला लागलं पाहिजे.

पोस्टमास्तर— लागा की! मास्तरलोकांना जरा दाढीबिढी स्वच्छ करून या म्हणावं.

हेडमास्तर—तुमच्याहि पोस्टमनचे कपडे धुऊन घ्या.

पोस्टमास्तर- आम्हाला काय पर्वा ? आमचं डिपार्टमेंट डिफ्रंट आहे. बरं आहे ढेरेसाहेब, कांही मदत लागली तर बोलवा. हजर आहे सेवेला. (बेपर्वाईने जातो)

ढेरे—माजला आहे लेकाचा! रोंगे, जा ते पेशंट पकडा अगोदर—आणि टुमणे, कोर्टात धूपदीप घाला जरा—

जज्ज—त्याची काळजी नको ढेरेसाहेब. कोर्टातली घाण नाकांत शिरल्यावर अंमलदार आत येतोय कशाला ? रेकॉर्ड तर असं लख्ख ठेवलंय आमच्या कारकुनांनी की प्रत्यक्ष चित्रगुप्ताच्या तीर्थरूपांना अक्षर उमगायचं नाही. चला मास्तर. (सर्वजण जातात. भटजी राहतात. ढेरे अस्वस्थ होऊन फेऱ्या घालतात.)

ढेरे—रामसेवक,

रामसेवक—जी—

ढेरे—जरा रस्त्यावर जाऊन बघ. नाहीतर नको; थांब, असं कर—माझी काठी घे चांदीच्या मुठीची. आणि पगडी. नारभट, निघालं पाहिजे आपल्याला—

हरभट—मीहि यावं म्हणतों—

ढेरे—तुम्ही कशाला ? काय श्राद्धाचं जेवण आहे तिथं ? गाडींत जागा नाही. शिवाय कालपासून घोडा लंगडतोय आमचा.

हरभट—नाही, मी बगीमागून हळूहळू पळत येईन.

(रामसेवक काठी, कोट, पगडी आणतो.)

ढेरे—(कोट घालता घालता) एकदा परटाकडून आल्यावर निम्मा झाला कोट! मोतीचंद कापडवालाहि मोठा मस्तवाल झालाय. पर्मिटं मागतांना थोबाडांची खेटरं करून येतात लेकाचे! काल एक वुलनचा तागा मागितला तर बिल काय करूं म्हणून विचारायला लागला. माणुसकी सोडली आहे सगळ्या व्यापाऱ्यांनी. आण, काठी आण. (डी. एस्. पी. ढगे येतात) या ढगे, सकाळपासून कुठे हरवला होता ? फौजदाराचे डी. एस्. पी. झाल्यावर बंगल्या-

वरची रोजची हजेरी चुकवायला लागलात वाटतं. निमकहराम औलाद बचा तुम्हा लोकांची! एखाद्याचं भलं करायला जावं–

**ढगे**—नाही साहेब–

**ढेरे**—अजून साहेब म्हणता, नशीब आमचं! नाहीतर नव्या राजवटींत तुमचा आमचा दर्जा म्हणे सारखा. जाऊं दे ते. हं काय काय व्यवस्था केलीत?

**ढगे**—आपन **सांगितल्यापमान्** सर्व मॅणेजमेंट केली. इस्माइल बत्तीवाल्या-कडून पान्याच्या बंबाला भोकं पडलीं होतीं त्यांना डाग लावून घेतले. पानी भरून ठेवलं. आमच्या चार पोलिसांना बंबवाल्याचा विणिफार्म देऊन बंब-खाण्यांत बशिवलंय. अंमलदार आल्याचं नक्की झालं, म्हणजे धर्मशाळेला अगोदर वर्दी देऊन आग लावायची मॅणेजमेंट करतों आणि खुनेपर्मानं लगेच बंब सोडून इजविन्याची मॅणेजमेंट करतो.

**ढेरे**—ठीक आहे, त्याची काही घाई नाही! पण कधीतरी फायरब्रिग्रेडचं काम दाखवावं लागेल साहेबांना. आणि हे बघा, खुणांचा घोटाळा नको. नाहीतर आधी बंब जायचे आणि मग आग लागायची.

**ढगे**—छे: छे:! त्याची काळजी नको. निम्मी धर्मशाळा जळल्यावर वर्दी जाईल.

**ढेरे**—बरं रस्त्यांतल्या पोलिसांचे कपडे बिपडे ठीक आहेत ना? तो फौजदार तावडे काय म्हणत होता, त्याला ड्रेस नाही म्हणून.

**ढगे**—आता साहेब–त्यानं आपला ड्रेस नाटक कंपनीला विकला.

**ढेरे**—तुमचा जुना ड्रेस द्या त्याला आणि म्युन्शिपाल्टीत जा आणि सेक्रेटरी आहेत आपले नवलाखे. त्यांना म्हणावं–रस्ते बिस्ते खोदून ठेवा दहा बारा ठिकाणीं. चार दोन घरांचे ओटे उखडा म्हणावं. शहराची पुनर्रचना चालली आहे असं वाटलं पाहिजे साहेबांना, काय? बरं, पोलिसांना सांगून ठेवा. अंमलदारसाहेब विचारतील काही तक्रारी आहेत का? कांही नाही–अगदी रामराज्यांत असल्यासारखं वाटतंय म्हणून सांगायचं. ड्रिलबरोबर हीं वाक्यं पाठ करून घ्या! लेफराइट जमायला लागलं की नाही?

**ढगे**—नाही अजून. आज नुसती रांग नीट करताहेत. उद्यापर्यंत जमेल.

**ढेरे**—माय गॉड, उद्या! अहो अंमलदार आला म्हणे. पंधरवडा झाला.

**ढगे**—कुठे आहे ?

**ढेरे**—ऑफिशियल् सीक्रेट विचारता मला ? डिस्‌मिस् व्हाल !

**ढगे**—माफ करा.

**ढेरे**—परमेश्वरा ! काय होतय देव जाणे. हरभट, तेवढं अभिषेकाचं बघा. चला नारभट. पगडी कुठे आहे ?

( **ढगे**—( आदबीने पगडी देतो ).

**ढेरे**—खरंच ! तुमचे ते पोलीस नुसते सदरे वर सोडून तसेच गावभर हिंडत असतात. विजार असल्याशिवाय पोलीस आढळला तर चौकीवर नेऊन फटके द्या त्याला ! चला वेळ घालवूं नका. नारभट, चला. हरभट, तुम्ही अगोदर देवळात जाऊन अभिषेकाचं बघा. परमेश्वरा ! ( जातात. ढेऱ्यांची द्वितीय पत्नी श्यामलाबाई ऊर्फ माईसाहेब–वय पस्तीशीजवळ–आणि पहिल्या बायकोची मुलगी कुंदा–वय विशीच्या आसपास–घाईघाईनं येतात. )

**माईसाहेब**—अगबाई गेले वाटतं. वाटलंच होतं मला. कुंदे अजून पुरेशी पावडर फासून झाली नाही वाटतं !

**कुंदा**—( येत ) काय ग माई ? अय्या, बाबा एकटेच गेले वाटतं ! आणि न सांगता–

**माई**—थांब. त्या हरभटाला बोलाव. ( खिडकीतून ) अग, ते बघ अजून बग्गीत बसले नाहीत–

**कुंदा**—बाबा–

**माई**—अहो भटजी. हा मेला कशाला धावतोय त्यांच्या गाडीमागून ! भटजीऽऽ-कुंदे, हाक मार की त्याला–

**कुंदा**—अहो भटजी–भटजी–माईसाहेब बोलावताहेत–हो आत्ता–वर या आधी–

**माई**—तुझ्यामुळे झालं हे सगळं. हे जाणार त्या अंमलदाराला भेटायला म्हटल्यावर मी आधीच जाऊन बग्गीत बसायचं म्हणत होतं, तर तुलाहि अगदी राहवेना. न न्यावं बरोबर तर तेवढंच कारण. सावत्र आई ना–

**कुंदा**—पण मला सुद्धा बघायचा आहे ग तो अंमलदार–

माई—मग त्याला इतका थाट कशाला ? माझ्या गळ्याला पावडर नाही ना ग दिसत ?

कुंदा—नाही. चोवीस वर्षांचे आहेत म्हणे ते–

माई—तीस! मी ऐकलंय त्या भटजींनी सांगतांना.

कुंदा—हो म्हणजे तरुणच आहेत.

माई—वयावर काय आहे ? एकेकाचं वय लहान असून सुद्धा उगाच थोराड दिसतात. तो भटजी कुठे मेला कोण जाणे! बघ, तो वर येतोय की नाही–

कुंदा—( खिडकीतून पाहत ) अगबाई गेला वाटतं–

हरभट—( प्रवेश करत ) काय माईसाहेब ?

माई—भटजी, तुम्ही पाहिलात काहो तो अंमलदार ?

हरभट—ह्या डोळ्यांनी–चक्षुर्वैसत्यम् !

कुंदा—केवढासा आहे ?

हरभट—छान आहे. चांगला रुबाबदार आहे माझ्यासारखा ! डोळ्यांत चमक आहे, अधिकाराची जरब आहे–

कुंदा—पण तरुण आहे ना ?

माई—थांब ग ! दिल्लीचा म्हणजे मराठीच बोलतो ना ?

हरभट—अहो मूळ इथलेच ते–कामानिमित्त दिल्लीस असतील. पण माणूस काय आहे म्हणून सांगू ? हुशार ! !

माई—खरंच ?

हरभट—तुम्ही दोन अक्षरं बोला माईसाहेब त्यांच्याशी. त्याची छाप ताबडतोब पडेल तुमच्यावर. आपलं–तुमची छाप ताबडतोब पडेल त्याच्यावर. मी नुसता एकदा हसलों त्याच्याकडे पाहून. तोहि हसला. गर्वबिर्व कांही दिसला नाही–उमदा माणूस ! बरं–जाऊं ?

कुंदा—आणखी सांगा ना त्याच्याबद्दल–

माई—कशाला ? कांही नको. भटजी, पण गोरा आहे काहो ?

हरभट—होहो–अगदी कुन्दाताईच्या वर्णाचा–नाही, त्याहून गोरा–आपल्या इतका गोरा असेल. मला अगोदर इंग्रजच वाटला. बरं जाऊं–

**माई**—हे बघा—तुम्ही जा तो उतरला आहे तिथें. आणि सगळी माहिती आणा.

**कुंदा**—हो त्यांना काय आवडतं—काय नाही.

**माई**—इतकं कांही नको विचारायला. पण वृत्ति पाहा. खाण्यापिण्यांतल्या आवडी निवडी—

**हरभट**—आता तातू भंडाऱ्याच्या खाणौळींत उतरलाय म्हणजे (हाताने दाखवीत) ह्यांतला असणार!

**माई**—त्याची नको काळजी. कुन्दा, आपलं ते दीडहजार पाकक्रिया ऊर्फ पत्निस्नेही पुस्तक काढून ठेव. भोपळ्याचा खिमा करून घालूं त्याला—

**हरभट**—छान! पत्ता नाही लागायचा त्याला भोपळा आहे की खिमा आहे. छान!!

**कुंदा**—मी रताळ्याची जेली करीन—

**माई**—जेली नको. आइस्क्रीमच करूं या. काय भटजी?

**हरभट**—आइस्क्रीम ना? हो, तेंच बरें थंडगार आपलें प्यायला—

**माई**—प्यायला?

**हरभट**—परवां होळीच्या दिवशीं केले होतें तेंच ना? प्यालोंच की आपण तें—

**माई**—बरं बरं—वेळ नका घालवूं. आधी जाऊन या तिथे आणि लवकर या सांगायला.

**कुंदा**—मी जाऊं का भटजीबरोबर?

**माई**—कांही नको. हे कदाचित त्यांना इथंच घेऊन येतील. व्यवस्था करायला पाहिजे सगळी. भटजी, निघा बघू लवकर. आता सुपारी कातरत नका बसू. घेऊन जा ती सुपारी. (भटजी सुपारी बंडीच्या खिशात टाकून अडकित्ताहि नेऊं लागतात) तो अडकित्ता ठेवा.

**हरभट**—हो (अडकित्ता ठेवतांना आणखी दोन सुपाऱ्या खिशांत टाकतात.)

**माई**—(खिडकींतून) लवकर या. वाटेत आणखी कुठे थांबू नका—

[ पडदा पडतो ]

म. ग्रं. ५।७।९०
क्र. २३९०८
वि. ८११८७

# अंक दुसरा

( धि न्यू गुरुप्रेम लॉजिंग बोर्डिंग हाऊसमधील एक खोली. कोपऱ्यांत एक आरसा असलेला हॅटस्टॅण्ड, कॉट, एक खुर्ची, टेबल. एकूण खोली अस्ताव्यस्त. कपडे इकडेतिकडे पडले आहेत. सर्जेरावाचा नोकर हणमंता हातांत ओल्या कपड्याचे पिळे घेऊन येतो. कॉटच्या बाजूच्या वळकट्यावरचे पूर्वीचे कपडे काढून तिथे हे कपडे टाकतो. खोली अस्ताव्यस्त आहे ती जरा व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करतो. वाळलेले कपडे त्या स्टॅण्डवर ठेवायला जातो. )

**हणमंता**—( आरशांत पाहून ) कां ? चेहरा कां उतरला ? कसं वाटतं आता ? चांगली पिठाच्या गिरणीतली नोकरी सोडून ह्या रावसाहेबाबरोबर हिंडायची हौस आली होती नाही का? हिंडा ! भूक पोटांत ताशे बडवायला लागली ? कोणाला सांगतोस लेका ? ऑं ? मालकाने पैसे उधळले तमाशे पाहण्यात आणि जुगार खेळण्यात, आता बसा दोघंहि तंगडींत शेपूट घालून. सरदार लोकांच्या घरीं नोकरी पाहिजे होती नाही का ? तरी थोरले धनी सांगत होते, ह्याच्या नादाला लागू नकोस. नाही पटलं ! तीन महिने झाले गाव सोडून. आता परतीच्या तिकिटाच्या सुद्धा दिडक्या राहिल्या नाहीत खिशांत !

वारे सरदार! आणि तुम्ही चोपदार त्यांचे. मरा इथंच! खिशांत नाही दिडकी आणि रुबाब काय? (टिनमधून सिगारेट घेतो व सर्जेरावाच्या पलंगावर पाय ताणून पडतो) ए हणम्या, जा. गावांत बेष्ट हॉटेल कुठे आहे पाहा! दोन पेशल रूम, फस्क्लास जेवण पायजे म्हणावं. सकाळी मटण आणि संध्याकाळी मुर्गी! हं! गावाकडं काय कमी होतं? पण नाही. बापाच्या इस्टेटीतली शेवटली पै उधळली म्हणजे ताबूत थंडे होणार ह्यांचे. आणि तिच्यायला तेंही खुळं थैली सोडूनच बसलंय आपल्या लेकासाठी! मरेना, आपल्याला काय करायचं आहे! जमेल तितके दिवस राहायचं. नाहीतर एक दिवस सलाम!

(बाहेरून सर्जेरावाची हाक ऐकू येते—हणम्या!)

**हणम्या**—अरे बापरे! (सिगरेट विझवून आदबीने दारांत उभा राहतो.)

(सर्जेराव प्रवेश करतो. हणमंताच्या हातांत आपली हॅट देतो. हणमंत त्याचा कोट काढतो. सर्जेराव तिशीच्या आंतला तरुण. दिसायला रुबाबदार.)

**सर्जेराव**—हणम्या, पुन्हा माझ्या बिछान्यावर लोळत होतास गाढवा!!

**हणम्या**—मी? मी कशाला लोळू रावसाब? जन्मांत काय कधी गादीच पाहिली नाही आम्ही?

**सर्जेराव**—खोटं बोलूं नकोस! लोळत होतास तूं. पलंगपोस बघ कसा झालाय—

**हणम्या**—मग मी काय करूं रावसाब?

**सर्जे**—नीट कर! आणि तो टिन घे इकडे—

**हणम्या**—जी रावसाब! (टिन देतो.)

**सर्जे**—ह्यांतल्या सिगरेटी काय झाल्या?

**हणम्या**—(त्याने ऐकूं नये अशा बेताने) उन्हांत वितळल्या असतील.

**सर्जे**—हणम्या इकडे ये! आ कर! ओढलीस की नाही सिगरेट?

**हणम्या**—मी कशाला ओढूं? आपल्याला बिडीकाडी, पानमाचीस, पंत्रापाणी कसलाच शोक नाही रावसाब! आन् उपाशी पोटी सिगरेट ओढली तर चक्कर येते रावसाब मला—

**सर्जे**—बरं हें बघ! (जरा मऊपणाने) जरा खाली जा!

**हणम्या**—कुठं?

सर्जे—स्वैपाकघरात. वर ताट पाठवून द्या म्हणावं फर्स्टक्लास-

हणम्या— आपली छाती नाही.

सर्जे—हणम्या. नोकरीवरून काढून टाकीन. डुक्कर कुठला-

हणम्या—पण जाऊन काय उपयोग ? तो खाणावळवाला पैसे चुकते केल्याशिवाय मीठ सुद्धा वाढायला तयार नाही.

सर्जे—नॉन्सेन्स ! काय बिशाद आहे त्याची न वाढायची !

हणम्या—तो म्हणतो, की मी आज पोलिसात वर्दी देणार. तीन आठवडे झाले एक पैसा मोजला नाही त्याला. तू आणि तुझा रावसाहेब-भामटे-चोर-डाकू-लफंगे आहांत. तू बेडर आहेस आणि तुझा मालक रामोशी आहे. ( सर्जेराव रागाने पाहतो ) असं तो म्हणाला.

सर्जे—आणि तू हे मिटक्या मारीत सांग मला. डांबीस.

हणम्या—नाही. पण तो म्हणाला, तुम्ही चोर लोक इथे येता—फुकटचं गिळता आणि पैसे बुडवून पसार होता. हा चाललो पोलिसांत ! बेड्या ठोकतो तुम्हाला ! ( आपण जाऊं लागतो. )

सर्जे—ए, तू कुठे चाललास ? जा सांग त्या भामट्याला-

हणम्या—मी बोलावून आणतों त्याला, आपणच सांगा रावसाहेब.

सर्जे—मी ! मला तोंड सुद्धा पाह्यचं नाही त्या चोराचं ! जा तूच सांग !

हणम्या—जी साहेब ! ( थोडा वेळ रेंगाळून जातो. )

सर्जे—जा. काय होईल ते होईल. आण त्याला बोलावून. चोर लेकाचे ! इकडे पोटांत कावळे लागले कोकलायला. तिकडे पैसे घालवून आलो जुगारात म्हणून, नाहीतर हॉटेल विकत घेतलं असतं ह्याचं ! कोण कुठला लेकाचा आला आणि ओळीनी पांच ट्रेल काढले एकट्याचे. तीनपानीत फार फसवायला लागले आहेत लोक हल्ली ! हणम्या, गेला वाटतं. काय गाव आहे ! पैसे मोजल्याशिवाय एक वस्तू मिळत नाही. पैसा, भांडवलवाले लोक ! काही ध्येय नाही, माणुसकी नाही, तो कम्युनिझम् येणार येणार म्हणून ओरडतात इतके दिवस, आणत कां नाही लेकाचे ! बस ! भाई भाई एक साथ—

( हणम्या व वेटर येतात. )

**वेटर**—साहेब, मालकांनी मला पाठवलय–

**सर्जे**—( मूठ वळून 'लाल' सलाम करतो ) बस. बसा. अहो बसा. आपण सगळे सारखे. तुम्ही गरीब वेटर आणि मी श्रीमंत ताठर हा भेदभाव नाहीसा झाला पाहिजे. हणमंतराव, तुम्ही बसा. हं. वेटरसाहेब, बसा. माझ्याकडे असा भेदभाव नाही. रशियात आहे का ? मग आपल्याचकडे कां बरं ? इथंच ही विषमता फार आहे. एकानं भरपूर खायचं आणि दुसरा उपाशी. असं कां बरं ? काय, खाणावळ ठीक चालली आहे ना ?

**वेटर**—हो. देवाच्या दयेनं–

**सर्जे**—हे बघ, अहो देवाची कसली दया ? तुमचे श्रम ! तुमच्या निढळाच्या घामाने तुम्ही पुऱ्या तळता, आणि मालक त्याचे पैसे घेतो. बंगले बांधतो. मोटार घेतो. तुम्हाला अर्धपोटी ठेवतो. मला उपाशी ठेवतो. आज काय केलंय ?

**वेटर**—मुर्गी, चॉप्स्, खिमा, कटलेस, भेजा, कलेजी, पुलाव, गुडदा, कोफ्ता–

**सर्जे**—असू दे ! हे पाहा वेटरसाहेब, आमचं ताट अजून आलं नाही. लवकर पाठवून द्या. जेवणानंतर आम्हाला जरा अर्जंट काम आहे–

**वेटर**—पण तुम्हाला जेवण द्यायचं नाही असा मालकांनी हुकूम दिला आहे–

**सर्जे**—मालकशाहीच्या हुकूमशाहीपुढे तूं मान वाकवणार ? शेम् ! वेटर साहेब, भांडवलशाहीचा मी भूकबळी व्हावं अशी तुमची इच्छा आहे ? गरिबांना पिळून उपाशी टाकणाऱ्या भांडवलशाहीचे तुम्ही हस्तक होणार ? हा हणमंता पाहा. आमच्या घराण्यांत दहा पिढ्या नोकर आहे हा. इथे येण्यापूर्वी कसा गाजरासारखा लाल होता. आता कसा सुकलेल्या वांग्यासारखा चेहरा झालाय याचा ! ही पिवळणूक मान्य आहे तुम्हाला ? पोटांत अन्न गेलं नाही तर काय होईल आमचं ? जा. तुमच्या खाणावळींत भूकबळी पडूं नये अशी इच्छा असेल तर आधी जेवण आणा आणि मटणात नळी विसरू नका–

**वेटर**—पण मी मालकाना काय सांगू ?

**सर्जे**—त्याच्यापुढे गंभीरपणाने ही समस्या ठेवा. 'अन्न' ह्या विषयावर क्रांतिकारक दृष्टिकोणातून त्याच्याशी बोला ! मी उपाशी राहिल्याने होणारी

शारीरिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि जिल्हानिहाय होणारी हानि कोणत्या स्वरूपाची आहे हे त्या हरामखोर भांडवलवाल्याला पटवून द्या! पैशाचा प्रश्न नाही म्हणावं. माणुसकी–विश्वबंधुत्व अधिक महत्त्वाचं आहे. नवमानवतावाद सांगा त्याला आणि हे पाहा, भेजा करपला होता परवा–आज जरा बेतानं तळून आणा. आणि वनस्पतीचं तूप वापरूं नका बाबांनो. तिसऱ्या पिढींत डोळे गेल्यावर डोळे उघडतील तुमचे. जा, मालक नाही म्हणाला तर तुमचा संप आणि आमचा अन्नसत्याग्रह एकदम सुरू. बस्स, आता उपास. आमरण उपास.

**वेटर**—थांबा मी आणतो कांही तरी–( सर्जेरावाच्या आरडाओरडीने घाबरून जातो. )

**सर्जे**—शाबास, क्रांतीचा विजय असो! भूक [ हणम्या पळतो ] भूक!! सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना? मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना? वडवांनलानं अरबी समुद्र तर जाळला नाही ना? मग आम्हीच असे उपाशी कसे! अरेरे, काय झालं हे! मनाचा मानी–माथ्याचा बिनहिशेबी–बकासुर तूं! खानावळीची निवड चुकलास आणि दोन वेळच्या जेवणाला हुकलास! नका, खानावळवाले, अशा रागाने ह्या सर्जाकडे पाहू नका. उद्या वेळ आली तर माझी सोन्याची बटणं विकून मटनाचे पैसे चुकते करीन. पैरण विकून आजवर खायला घातलेल्या वैरणीचा हिशेब पुरा करीन. हरहर–काय स्थिति ही! सर्जा–सर्जा–वडगावच्या सुभानराव सुंठमारीकर इनामदाराचा एकुलता एक मुलगा सर्जेराव तूं–ज्याच्या वाड्यावर रोज अर्धा बोकड न्याहारीला आणि उरला सुरला दुपारला संपायचा तो आज ह्या सुरुंगवाडात गोळाभर भातासाठी आणि वाटीभर खिम्यासाठी तडफतोय! थूः तुझ्या जिनगानीवर! बापरे! पाहा! तीं पाहा तुझ्या कर्माची फळं! ती पाहा एकेका यत्तेंत काढलेली चार चार वर्षे तुझ्यापुढं रमींतल्या सीक्वेन्ससारखी ओळींऽऽनं उभीं आहेत! त्या पाहा कॉलेजच्या क्लासांत मुक्काम असताना तीर्थरूपांना मारलेल्या थापा! तुझ्याकडे बघून फिदीफिदी हंसताहेत! क्रूर कठोर कर्दनकाळा, ये! हा सर्जा उभा आहे. त्याला घासभर अन्न मिळालं नाही तरी त्याचाच घास करून त्याला गिळून टाक! सर्वसाक्षीदार परमेश्वरा, ये–गजेंद्राला सुसरीच्या रूपानं तारलंस. माझ्यापुढे खिमा रोगनजूस होऊन ये. आकणी पुलाव हो–किमानपक्षी

दूधभात, भेंडीची भाजी तरी हो. भस्मासुरासाठी स्त्रीपार्ट घेतलास, माझ्यासाठी राइसप्लेट होऊन येरे– ( हणम्या येतो. )

**हणम्या**—रावसाब जेवण येर्तंय–

**सर्जे**—कोन खंडोजी ?

**हणम्या**—खंडूजी ?

**सर्जे**—हणम्या–माझ्या अंगात संभाजी संचरला होता. तो खाणावळवाला पुढे आला असता तर त्याला दत्तोजी अण्णासारखा त्या भिंतीत चिणून टाकला असता–

**हणम्या**—पण तो खाणावळीच्वा तर पोलिसात वर्दी द्यायला गेलाय–

**वेटर**—( चहा आणि कागदातून चपाती आणतो ) साहेब, बस्स. मालकाला न कळत एवढे चोरून घेऊन आलोय !

**सर्जे**—शाबास ! काय आणलंस-चहा आणि एवढी चपाती ?

**वेटर**—जी–

**सर्जे**—हात लावणार नाही मी त्याला ! ह्यानं काय होणार ? पोटातली अन्ननलिका वीस फूट लांब असते माहिती आहे ना तुला ? पाऊण इंच नलिकेची भूक भागणार नाही यानं ! आणि चपाती नुसती खाऊं ? तूपसाखर तरी निदान–

**वेटर**—तूपसाखर नाही साहेब.

**सर्जे**—कां नाही ? आणि मघाशी संध्येतल्या नावांसारखी नावं घेतलीस ? मुर्गी, खिमा, कटलेस, पुलाव–कुठं आहेत ती मंडळी ?

**वेटर**—ती पहिल्या वर्गाच्या पासिंजरांना आहेत !

**सर्जे**—पहिला वर्ग ! वर्गविग्रह झाला पाहिजे ! तूंहि भांडवलदारांचा हस्तक आहेस ! तूप आण अगोदर, नाहीतर ह्या सुरीनं गळा कापतो तुझा–

**हणम्या**—त्या सुरीनं केळं कापेना काल, गळा काय कापणार ?

( वेटर कपबशी उचलूं लागतो. )

**सर्जे**—थांब ! ( चहा पीत ) राम राम राम राम ! हा काय चहा आहे ? लेको चहांत काय टुथपावडर घालतां काय माकडछाप ? आणि यांत दूध कोणी घालायचं ? घेणार नाही मी चहा–( एक घोट घेऊन कप ठेवतो.)

**वेटर**—ठीक आहे, नको तर राहिलं! ( पुन्हा उचलूं लागतो. )

**सर्जे**—राहूं दे. तुम्हांला लोकांना फसवून पैसे उकळायची सवय लागली आहे! ( चहा पीत ) परमेश्वरा, काय चहा हा! आणि ही—हणम्या ओढ ( दोघेही चपातीची ओढाताण करतात ) ही चपाती—आणि ही आलम हिंदुस्थानांत नुस्ती खाल्ली होती का कोणी? अरे खिमा नाही तर निदान पातळ भाजी? आणि पिठांत शिमीट मिसळलं होतं कायरे? आणखी काय आहे?

**वेटर**—बील—

**सर्जे**—बील? दण्ड करायला लावतो लेका तुझ्या मालकाला. हणम्या, तो उरलेला चहा पी आणि चपाती खा खाता आली तर! जा चालते व्हा. ( दोघेहि जातात. आकाशाकडे पाहून ) कां? आमचे हाल पाहून आनंद होत असेल आपल्याला! तुमची चंगळ आहे. प्यायला अमृत आणि खायला अप्सरांच्या हातचा स्वैपाक—

**हणम्या**—( धावत येतो ) साहेब, घात होणार—

**सर्जे**—होणार? आणखी काय व्हायचा राहिला आहे?

**हणम्या**—थट्टा नाही रावसाब—कोणी तरी मोठा साहेब घेऊन आलाय तो खाणावळवाला. खाली चौकशी चालली आहे—

**सर्जे**—एवढ्यांत फौजदार हजर? अरे म्हणजे पोलिस खातं आहे की चेष्टा? एवढ्यांत तक्रार नोंदून चौकशी सुरू? म्हणजे इथल्या पोलिसांना गुन्ह्याची चौकशी करण्यापलीकडे उद्योग नाही की काय दुसरा? म्हणजे आम्हाला तुरुंगात घालणार की काय? नीट वागले तर जाईन दोन चार दिवस तुरुंगात ह्यांच्या समाधानासाठी. पण उगीच भलता फाजीलपणा करायला लागले तर स्पष्ट विचारीन—कोण? समजलांत कोण मला? मला समजलांत कोण?

[ ढेरेसाहेब ही वाक्ये ऐकतच प्रवेश करतात. सर्जेराव व ढेरे दोघेहि मनस्वी भेदरले आहेत. दोन क्षण स्तब्धता. हळूच नारभट आंत येतो ]

**ढेरे**—नमस्कार, नाही म्हणजे—मला वाटलं—यम् यम् यम् नमस्कार—

**सर्जे**—नमस्कार—

**ढेरे**—माफ करा, पण न विचारतां आलों—

**सर्जे**—हरकत नाही—

ढेरे—ह्या जिल्ह्याचा मुख्य अधिकारी ह्या नात्यानं माझं कर्तव्य करायला मी आलो आहे. इथं येणाऱ्या प्रवाशांची–विशेषतः बड्या अंमलदारांची मी जातीनं विचारपूस करीत असतों–

सर्जे—हो का ? अस्सं–पण (एकदम ओरडून) पण मला काय त्याचं ? मी काय केलंय ? मी देईन पैसे, नाही म्हणतो का ? (हरमट डोकावतो) ह्या खाणावळवाल्याचा अपराध आहे सगळा. कुऱ्हाडीने तुटेना ह्याची चपाती. तो चहा पिऊन बघा आणि जिवंत राहिलात तर सांगा कसा होता तो. काय घालतात देव जाणे त्यांत ! आज तीन आठवडे झाले, उपाशी ठेवलंय आम्हांला. हा चहा आणि ती चपाती–आणि जिल्ह्याचे मुख्य अधिकारी ह्या नात्यानं त्याला–तो मटण शिजवतो का सागवानाचे तुकडे शिजवतो विचारा ! छान आहे, मी का म्हणून जावं–

ढेरे—माफ करा साहेब, सॉरी सॉरी साहेब, माझा काहीच अपराध नाही. वास्तविक इथल्यासारखं मटण मुंबईला सुद्धा मिळत नाही. म्हणजे मी खात नाही, पण म्हणतात. आमचे राजेसाहेब पॅरीसला जातांना इथून बोकड घेऊन गेले होते. पण ते कांही असलं तरी आपली इथं गैरसोय होत असली तर दुसरी-कडे व्यवस्था करतो मी–

सर्जे—मी मुळीच जाणार नाही. दुसरीकडे व्यवस्था म्हणे–मला बरोबर समजते ही भाषा ! दुसरीकडे म्हणजे तुरुंगातच की नाही ? काय अधिकार आहे तुम्हाला ? कोण तुम्ही ? मी कोण आहे माहिती आहे तुम्हाला ? हणम्या–

हणम्या—जी–

सर्जे–सांग ह्यांना मी कोण आहे ते !

ढेरे—छेः छेः नको, कशाला ? रामकृष्ण—

सर्जे—हं ! जास्त फाजीलपणा केलात तर दिल्लीला जाईन परराष्ट्रीय मंत्र्याकडे–

ढेरे—दिल्ली ? महाराज, क्षमा करा. गरिबाला मारू नका. माझी बायको–पोरंबाळं–सरकार–जगांतून उठवू नका मला–

सर्जे—ठीक आहे. नाही उठवत. पण–छान, तुम्हाला बायकापोरं आहेत

म्हणून आम्ही तुरुंगवास सोसायचा ? ( हरभट डोकावतो. )

ढेरे—आपल्या सारख्यांना ही खाणावळ तुरुंगासारखी दरिद्री वाटावी हे साहजिक आहे. पण आम्हांला अनुभव नाही अजून. दिवाणाचे कलेक्टर होऊन चारपाचच महिने झाले आम्हाला. नव्या राजवटीत रुळलो नाही आम्ही अजून. आणि इथे मिळणार तरी काय आम्हाला ? चहासाखर सुटत नाही पगारांत. काय दोन पैसे इकडले तिकडे झाले असतील आमच्या हातून, नाही म्हणत नाही. पण कुठं कोणाकडून पोरांच्या चड्डयांना कापड, कुठे एखादी टेबलखुर्ची. आणि ती हवालदाराच्या बायकोला चाबकानं फोडल्याची बातमी जर आपल्या कानावर आली असेल तर ती साफ खोटी आहे हुजूर. केवळ लोकाना बरं बघवत नाही म्हणून. केवळ निंदा—

सर्जे—पण मला कशाला सांगता हे सारं ? तुमचे शत्रू—हवालदाराची बायको—तुम्ही डी. एस. पी. च्या बायकोला चोपलंत, म्हणून मला काय ! पण मला हात लावायची छाती आहे का कुणाची ? हं ! मृत्युपत्र लिहून यावं लागेल. मी पैसे देईन, माझ्याजवळ पैसे आले की लगेच्च देईन. तोपर्यंत इथं राहणार मी. —सध्या एक पै नाही माझ्याजवळ. पाहा हवं तर—( कोट आणायला जातो.)

ढेरे—( पुटपुटतो ) अरे चोरा, अशी सूचना काय ! आलं लक्षांत ! पैसे संपले काय ? आणि हे अंमलदार लाचलुचपतीला आळा घालणार—वा ! ( सर्जेराव आपला कोट पॅंट आणतो. )

सर्जे—बघा वाटल्यास खिशांत हात घालून—

ढेरे—वा ! आपल्यावर विश्वास नाही काय आमचा ? पण आपण पैशाच्या अडचणीत असलांत तर मी आपल्या सेवेला सादर आहे. परदेशी माणसाला मदत करणं कर्तव्य आहे माझं—

सर्जे—चांगलं आहे. ( हणम्याला ) ए, सलाम कर ह्यांना. अशीं संत माणसं आढळत नाहीत हल्ली. ठीक आहे. मला थोडी रक्कम कर्जाऊ द्या. त्या खानावळवाल्याचं तोंड बंद करतो. एक शंभर रुपये—थोडे कमीही चालतील—

ढेरे—( त्याने दिलेल्या कोटांत नोटा कोंबतात ) हं, बरोबर शंभर. मोजले आहेत मी—

सर्जे—थँक्यू. बसाना खुर्चीवर—

ढेरे—छे छे! लायकी नाही आमची ! ( सर्जेराव कोट ट्रंकेत ठेवूं लागतो. एवढ्यात नारभट पुढे सरकला आहे. ढेरे–नारभटाला ) दोनशे दिले.

सर्जे—हणम्या, वेटरला बोलाव. अहो बसा ना तुम्ही. मला वाटलं होतं की तुम्ही मला तुरुंगात घालायला आलात. ( ट्रंक बंद करूं लागतो. )

ढेरे—( नारभटाला ) आपण अंमलदार आहों हे लपवायचं आहे त्यांना. आपण देखील तसंच भासवूं. ( सर्जेरावाला ) तुरुंगात ? छे छे ! सहज हिंडत होतों शहरांत–रोज जातीनं पाहाणी करतों आम्ही–हे नारभट. इथल्या देवस्थानचे मुख्य द्रष्टी–ट्रस्ट–ट्रष्ट्री–

सर्जे—देवस्थान ?

नारभट—मारुतीचं देवस्थान आहे. जागृत आहे. एवढा भ्रष्टाचार खपायचा नाही तिथें. म्हणजे झालें काय ? थोरल्या राजेसाहेबांच्या मुंजीच्या वेळची गोष्ट—

ढेरे—नारभट ( त्याला गप्प करतो ) मी गावांतून स्वतः तपासणी करतों. इतर कलेक्टरांप्रमाणे नुसता जिल्ह्यांत हिंडून वेळ घालवत नाही. केवळ अधिकारी म्हणून नव्हे, तर मानवत्य–मानवत्ता–मानव्य–सर्वां परमेश्वरीं भूतो–ह्या न्यायाने गरीबगुरीबांची विचारपूस करणें, मदत अडल्यानडल्यास करणें हें सुद्धा माझं कर्तव्य मानतो. त्याचं फळ म्हणून आपणासारख्या थोरांच्या गाठी पडतात.

सर्जे—वा ! आम्ही कसले थोर ! तुम्ही जर आता ही मदत केली नसतीत तर मला ह्याचं बिल केव्हाच भरता आलं नसतं. काय चहा घेणार ? वेटर, वेटर ( वेटरच्या नांवाने ओरडत बाहेर जातो. )

ढेरे—बिल देतां आलं नसतं काय ? नारभट, पाहिलंत सूचना कशा मार्मिक आहेत ?

सर्जे—( प्रवेश करून ) वेटर कुठे मेला लेकाचा कोण जाणे. बाकी तुम्हांला हा असला चहा तरी कशाला देऊं मी ?

ढेरे—राहूं दे ! ( आपण अगदी धूर्त प्रश्न टाकत आहों अशा आविर्भावाने ) आपण कुठल्या प्रवासाला निघालां आहांत वाटतं–

सर्जे—मी आता परत जाईन कोल्हापूरला. आमचे वडील आहेत तिथं. त्यांचा फोटो असेल माझ्या ट्रंकेत ( ट्रंकेजवळ जातो. )

ढेरे—थापा अगदी तयार आहेत तोंडावर. कोल्हापूरला वडील आहेत काय ?

सर्जे—( शोधून ) नाही सापडत–

ढेरे—राहू दे ! बाकी प्रवासांत म्हटली तर मौज असते आणि म्हटला तर त्रासहि असतो. आपण अगदी गमतीसाठी निघाला असाल मुशाफरीला ?

सर्जे—अहो गंमत कसली ? आमचे वडील निघाले आहेत आम्हांला दिल्लीला नोकरीसाठी पाठवायला. त्यांना वाटतं की आम्ही दिल्लीला पोहोचलों की स्वतः पंतप्रधान आमच्या नोकरीची खटपट करणार ! आपल्याला तर नोकरीच करायची नांही, मग ती दिल्लीला असो नाहीतर लंडनला असो. वडलांची कटकट चुकवायला सटकलोंय–

ढेरे—मग आता कोल्हापूरलाच जाणार असाल ?

सर्जे—खुद्द कोल्हापुरांत नाही आमचा वाडा. चोरांचं वडगाव आणि देवाचं वडगाव ह्यांच्यामध्ये एक बाजार वडगाव आहे. पण तिथे माझ्यासारख्या हायली एज्युकेटेड माणसाला कसं करमणार सांगा बरं ! आणि आमचे वडील म्हणजे काय ? वडीलच आहेत ते ! मी आता गेल्यावर सरळ बॉम्बे गाठणार. बस्स–ताजमहाल हॉटेल–जुहू–सी. सी. आय.–बी. बी. सी. आय.–नाहीतर आमचं बाजार वडगाव ! अहाहा "कसं म्हादबा, सदू लव्हाराचा बैल म्येला म्हनं–आन् म्हादासुतारानं म्हमइस्नं नइ पटाशी आनलिया म्हनं–वाइच च्वोळा की तमाकू "–ह्याशिवाय व्हॉट इज्–( सोडून देतो. ) खेड्यांत राहून लाईफ वेस्ट कां करूं ? लाइफमध्ये मला ( हातवारे करीत ) असं असं कांहीतरी करायंच आहे मला. टु बी ऑर नॉट टु बीऽऽ–

ढेरे—खरं आहे ! खेड्यांत काय करणार आपण ? आमचंच पाहाना· इथं या मागासलेल्या भागांत जनतेची सेवा करण्यांत आयुष्य काढलं आम्ही, काळ्याचे पांढरे झाले. पण काय चीज आहे त्याचं ? खोली जरा दमट वाटते नाही–

सर्जे—जगांत इतकी घाणेरडी खोली कुठंहि नसेल–ढेकूण, डास, पिसवा, ऊफ् !

ढेरे—छे छे ! आपल्यासारख्या थोरामोठ्यांना इथं राहावं लागलं. छे– आणि अंधारहि आहे नाही थोडा–

**सर्जे**—चांगलाच अंधार आहे. आता उजेड आहे म्हणून एवढं वाटत नाही तुम्हांला. पण एकदा अंधार पडला की डोळ्यांत बोट घातलं तरी दिसत नाही. त्यांतून मालकांनी दिवा बंद करून टाकलाय आमचा. ज्या नीचानं मीठ तोडलं आमचं, त्याला दिव्याचं काय ? त्यामुळे कुठे काही वाचावंसं वाटलं, कुठे कांही लिहिण्याची स्फूर्ति आली तरी ह्या अंधारापुढे कांही चालत नाही–

**ढेरे**—नाही, म्हणजे मी आपल्याला असं सुचवणार होतों–छे–पण लायकीच नाही आमची–

**सर्जे**—काय सुचवणार होतां ?

**ढेरे**—नाही–पण–छे–आपला दर्जा कुठं, आम्ही कुठं ? छे नव्हेच ते–

**सर्जे**—काय ते सांगा ना–

**ढेरे**—आमच्या बंगल्यावर चांगली खोली आहे. हवापाणी सुंदर–चारी दिशांचं वारं–पण छे–रागावू नका–आम्ही आपली साधी माणसं–

**सर्जे**—वा ! असं असेल तर आम्ही अवश्य येऊं. असल्या सार्वजनिक कचरा केंद्रापेक्षा खाजगी बंगला केव्हाहि चांगला !

**ढेरे**—गरीबावर मेहरबानी–आमच्या हिला अतिशय आनंद होईल–लहानपणापासून माझा हा स्वभाव–आल्यागेल्याचं आगतस्वागत करायचं–जन्मस्वभावच–त्यांतून आपल्यासारखा कोणी थोर पाहुणा आला म्हणजे–पण हे मी कोणत्याही आशेने करतो आहे असा गैरसमज करून घेऊं नये–

**सर्जे**—वा थँक्यू–माझा स्वभाव अगदी डिट्टो तुमच्या सारखाच आहे बघा. मला दुतोंडी माणसं आवडत नाहीत–तुम्ही दाखवलेली आपुलकी–जिव्हाळा–सदैव इथं ( छातीच्या उजव्या बाजूला प्रथम व नंतर डाव्या बाजूला हात लावून )–इथं–राहील !

( हणमंत व वेटर येतात. )

**वेटर**—आपण बोलावलंत ?

**सर्जे**—माझं बिल ?

**वेटर**—मघाशी दिलं होतं मी तुम्हांला–

**सर्जे**—तुमची ती दीड दमडीची चिटोरीं मी कुठे संभाळीत बसूं ? किती आहे ?

वेटर—पहिल्या दिवशी एक जेवण–तीन स्पेशल खिमावाट्या—

सर्जे—ए गद्धया—सगळा परवचा ऐकवणार काय आम्हाला ? पैसे बोल–

ढेरे—राहूं देत साहेब ( वेटरला ) जा रे–पैसे पाठवतों मागून–

सर्जे—अहो पण ? असं म्हणतां, बरं बरं–( वेटर जातो. )

ढेरे—आपण गावांतल्या सगळ्या संस्थांची पाहणी करणार असालच. खाजगी संस्था, सरकारी संस्था–

सर्जे—म्हणजे ?

ढेरे—म्हणजे कशा काय चालल्या आहेत ? वास्तविक आमचा कारभार म्हणजे–कसा अगदी यंत्रासारखा–सुरळीत चालला आहे–

सर्जे—बघू या की–

ढेरे—मला वाटतं, आपण प्रथम हायस्कूलमध्ये जाऊं या. आम्ही कांही नवीन ‘ शैक्षणिक पद्धतीं ’चा अवलंब केला आहे–

सर्जे—छान छान–

ढेरे—तिथून हेडपोलीस स्टेशन–तुरुंग–

सर्जे—( संशयाने ) तुरुंग ?

ढेरे—आम्ही कैद्यांनाहि नवीन पद्धतीने वागवतों–

सर्जे—वाहवा. पण त्यापेक्षा कांही धर्मार्थ संस्था पाहूं या. जीवदया-मंडळ, पांजरपोळ, दवाखाना, रोग्यानाहि नवीन पद्धतीने वागवत असलाच की नाही ?

ढेरे—जशी आपली मर्जी. बरं आपण आमच्या बग्गींतून याल की आपल्याला निराळी मोटार हवी ?

सर्जे—कशाला ? तुमची बग्गी चालेल–

ढेरे—ठीक आहे. मग नारभट, तुम्हांला जागा नाही बग्गीत–

नारभट—हरकत नाही–

ढेरे —हे बघा, ह्या दोन चिठ्ठया घ्या. एक हॉस्पिटलमध्ये रांगे डॉक्टरना द्या आणि दुसरी आमच्या घरी द्या. साहेब, आपल्या परवानगीने कुटुंबाला चिठ्ठी लिहून कळवतो. आपल्यासारख्यांची पायधूळ झाडली जाणार गरीबा घरी. उंबरा सोन्याचा झाल्यासारखा वाटेल तिला !

सर्जे—लिहा ना. हे पेन घ्या. कागद–कागद–हे घ्या, ह्या बिलांच्या मागे लिहा ना–

ढेरे—चालेल (पुटपुटत लिहूं लागतो.) सर्व व्यवस्था–[(वड) साहेब, हें चालतं ना आपल्याला ?

सर्जे—(कोट चढवत) हो हो! सर्व कांही चालतं. तुम्हांला हो शास्त्रीबुवा ?

नारभट—(लाचारीने हसतो. ढेरे नारभटाला चिठ्ठी देतो. नारभट दार उघडायला जातो आणि दाराआडून चोरून ऐकणारा हरभट एकदम आंत धडपडून पडतो.)

सर्जे—अरे अरे, (त्याला उठवत) लागलं नाही ना ?

हरभट—नाही नाही, विशेष नाही. आपण काळजी करूं नका. जरा नाकास रक्त आलें आहे. घुणा फुटला असेल. असूं दे. फुटूं दे. मी रांगे डॉक्टराकडून पलिस्तर मारून घेईन. घरचाच डॉक्टर, मारलं पलिस्तर की दोन दिवसांत होत्याचें नव्हतें करतो रांगे डॉक्टर–

ढेरे—हं (त्याला दटावतो.) चला साहेब, निघूं या आपण. तुमचा मनुष्य सामान आणेल. (हणम्याला) माझ्या वरीं आणायचं. दिवाणसाहेबांचा बंगला विचारा, कोणीहि सांगेल. (सर्जेरावाला) लोक अजून आम्हांला दिवाणसाहेब म्हणूनच ओळखतात–

सर्जे—असं का ? छान! आमचं पेन द्या ते तेवढं! (ढेरे पेन देतात)

ढेरे—चलावं–

सर्जे—चला, आपण व्हा पुढे–

ढेरे—छे छे, आपण व्हा पुढे. (सर्जेराव पुढे जातो तेवढ्यात ढेरे वळून हरभटाला) एहेहेहे, हा डोंबाऱ्याचा खेळ करायला दुसरी जागा नव्हती ? देवळात अभिषेक करायचं सोडून इथं विदूषकी करायला याच वेळी हजर! चला–

# अंक तिसरा

**स्थळ**—पहिल्या अंकांतील दिवाणखाना.

( माईसाहेब आणि कुंदा खिडकींतून पुन्हा पुन्हा डोकावून वाट पाहत उभ्या आहेत. )

**माई**—पाहा, दोन तास झाले सारखी वाट पाहत उभी आहेस तू. आणि सत्रांदा पातळं बदललीस. नसता त्रास मेला ! ( आपण डोकावून पाहतात ) एक चिटपाखरूं दिसत असेल रस्त्यांत तर शपथ ! मेलींबिलीं की काय ह्या गावांतली सगळी माणसं !

**कुंदा**—पण माई, आता एवढ्यात येतील कुणीतरी. हरभट तरी नक्की येतील. ( खिडकींतून पाहत, ) माई, माई ते पाहा. कोणी तरी येतंय-कोण-हरभट-हो हरभटच तो. किती सावकाश चालतोय-

**माई**—कुठला हरभट ? छे-

**कुंदा**—अग हरभटच तो-

**माई**—शक्य नाही. बाकी मी ऊठ म्हटलं की बसायची सवयच आहे म्हणा तुला ! मी म्हणेन त्याच्या उलट बोलायचं-

कुंदा—पण नीट बघ तू माई, हरभटच आहेत ते–

माई—दिसतंय मला. डोळे फुटले नाहीत माझे. यांत अगदी शहानिशा करण्यासारखं काय आहे ? ( खिडकीतून ) लवकर—जरा पाय उचल की मेल्या ! कुठे आहेत ते ? हं सांगा तिथूनच. धांद्रट मेला ! अगदी वर येईपर्यंत शब्द फुटेना ह्याच्या तोंडातून. ( धापा टाकीत हरभट येतात. ) हं, सांगा काय काय झालं ? भटजी, जनाची नाही तरी कांही मनाची--सभ्य गृहस्थ म्हणून विश्वास टाकला तुमच्यावर,आणि तुम्ही नाचत राहिलां वाटतं त्या लोकांच्या मागे ! चार तास झाले, एक अक्षर कळलं असेल तर रामाचं नांव ! कांही वाटत नसेल. आणि मी मात्र अविधवा नवमीला न चुकता धारवाडी खण देत्येंय शास्त्रीणबाईंना. कांही नाही ! माणसांची दानतच फिरली आहे आताशा–

हरभट—तसं नाही माईसाहेब, छातीत दम टिकत नाही माझ्या. तुम्हांला सांगतां गेल्या टायफिटपासून–

माई—ऐकलंय नेहमीचं तुमचं ते चऱ्हाट. सांगा काय काय झालं–

हरभट—नारभटानं चिठ्ठी दिलीय तुम्हांला. दिवाणसाहेबांनी दिली. म्हणाला–( चिठ्ठी देतो. )

माई—हज्जारदा सांगितलं, त्यांना कलेक्टरसाहेब म्हणा म्हणून. कुंदे, तुझं काय काम आहे इथं ? ( कुंदा जाते ) मरू दे ते ! बरं तो अंमलदार तोच ना ? कमिशनेर असेल–

हरभट--नसावा ! पण व्हायला हरकत नाही. काय विद्वत्ता, काय तेज !

माई—मग तोच तो–

हरभट—तोच तो ! शंकाच नको–मी बरोबर ओळखलं. अहो वेषांतर केलं म्हणून काय झालं ? मूळ तेज लपेल काय कुठं ? मी तेव्हाच ताडलं. मी आणि नारभटानं–

माई—बरं काय काय झालं तरी सांगा–

हरभट—मारोती पावला अन् सगळं कांही ठीक झालं. सुरवातीस दिवाणसाहेब–आपलं–कलेक्टरसाहेब गेले तेव्हा जरा हुप्पच होता. मी फटींतून पाहत होतो. चिडलाच होता. तात् भंडाऱ्याच्या मुंब्रय् फॅशनीला शिव्यांचे सहस्त्रनाम मोजल्ेत. पण कलेक्टरसाहेबांनी हळूहळू घेतला वेधेंत, आणि आणला

सरळ नारदाच्या शेंडीसारखा. आता रांगे डॉक्टरांचें इस्पितळ तपासायला गेले आहेत. कलेक्टरसाहेबांना अगोदर भीति वाटली, आपल्याबद्दल कांही हुकूम असेल त्याच्या गाजीटांत म्हणून—मीहि घाबरलों होतों हो थोडा—

**माई**—तुम्ही कशाला घाबरलात ? तुम्ही कांही सर्कारी नोकर नाही—

**हरभट**—बरोबर. पण मोठे अंमलदारसाहेब. बोलायला लागले की वाटतो हो थोडा नर्व्हसनेसपणा—

**माई**—जाऊं दे ते ! बरं पण कसा आहे तो ? तरुण की म्हातारा ?

**हरभट**—छे हो, अगदी तरणा बांड ! अगदी पंचविशींतला, पण बोलणें कसें साठींतल्या मुत्सद्यासारखें गंभीर. पेशवाईत असता तर सखारामबापूच्या मांडीला मांडी लावून बसता. मी म्हटलें त्याला, म्हटलं तरण्याच्या खांद्यावर बुढ्याचें टाळकें आहे. तो लगेच म्हणे कसा ? ( नक्कल करण्याचा प्रयत्न करीत ) असूं दे—असूं दे—मला इथं जायचं आहे—बी बी सी आय्—वा ! ! डौल काय ! काय ? मला वाचन करायचं असतं, लेखन करायचं असतं—पण अंधार अंधार ! कांही विचारूं नका !

**माई**—पण गोरा आहे की काळा—

**हरभट**—थोडा तांबूसच आहे. पण डोळ्यांत पाणी काय खेळतंय ! वा !

**माई**—अगबाई ! चिठ्ठी वाचायची राहिलीच. ( चिठ्ठी घेऊन वाचूं लागते. ) देवाने माझी अब्रू वाचवली. परमेश्वराची मर्जी म्हणूनच दोन मुर्गी, चॉप्स-खिमा, दहिवास्या—ऑं—हे काय ?

**हरभट**—ऑ—हां—बिलाच्याच कागदावर लिहिलें आहे—

**माई**—हं—हां—मर्जी म्हणून सहीसलामत सुटलों. अंमलदार साहेब आपल्याच घरीं उतरणार आहेत. पूर्वी पोलिटिकल एजंटाची जी तैनात आपण ठेवत होतों तीच. फर्स्टक्लास स्टेट गेस्टची व्यवस्था घरांत करणं. श्रीमंत सरकारच, प्रत्यक्ष उतरले आहेत असे समजणे. कळावे, तुझा—इश्य ( लाजते. भटजीहि उगाचच लाजतात. )

**हरभट**—मग मी निघतों माईसाहेब. इस्पितळांत काय होतंय पाहूं या. जाऊं—

माई—तुम्हांला कोणी अडवलंय ? कुंदे—

हरभट—कुंदाताई–कुंदाताई–मी जाऊं ?

माई—पुन्हा तेंच ( हरभट जातो ) कुंदे—

कुंदा—( येत ) आले का ग ते माई ? ( पुन्हा निराळे पातळ नेसली आहे. )

माई—आता हद्द झाली तुझ्यापुढे. हे पातळ तू नेसलीस ! मी नेसणार होतें—

कुंदा—पण पांच वारी आहे तें माई !

माई—मग मला काय पांचशेवारी लागतं ? तू ते डाळिंबी नेस.

कुंदा—पण नऊ वारी आवडत नाही मला—

माई—मग काय वाटेल ते नेस–नाही तर कांहीच नेसूं नकोस. मला हे पातळ पाहिजे—

कुंदा—पण तुला बरं दिसायचं नाहीं तें माई—

माई—ते तू कोण ठरवणार ?

कुंदा—पण वयस्क बायकाना हे बरं दिसणार नाही—

माई—म्हणजे मी वयस्क आहे वाटतं ? दुसऱ्याला नांव ठेवता ठेवता स्वतःचा चेहरा तरी आरशात नीट पाहावा एकदा. तुझी सावत्र आई झाले म्हणजे कांही वय नाही झालं माझं. आत्ता सोडून दे मला ते पातळ. नवीन पाहणाऱ्यानं सांगावं माझी तू आई, का तुझी मी आई—

कुंदा—पण माई—

माई—पण नाही नि परंतु नाही ( तिला ओढत नेते ). चल—

[ बाहेर बँड वाजतो. काही वेळाने–हेडमास्तर, जज्ज, डॉक्टर वगैरे मंडळी येतात. पोलीस इन्स्पेक्टर आदबीने पुढे येतात आणि हातांत हारतुरे घेतलेला सर्जेराव आणि त्याच्या मागून ढेरेसाहेब– ]

ढेरे—या या–[ जमिनीवर एक कागदाचा कपटा पडलेला असतो–त्याकडे हेडमास्तरांचे लक्ष वेधतात. लगबगीने दोन तीन लोक तो कपटा उचलतात. खिडकींतून फेकून देतात व सर्जेरावाच्या बाजूला कांहीशा आदबीने आणि बऱ्याचशा लाचारीने जाऊन उभे राहतात. ]

**सर्जे**—वा! उत्कृष्ट संस्था!—मी इतक्या गावांत फिरलों पण सर्व सरकारी अधिकाऱ्यांनी इतक्या आस्थेनें विचारपूस केल्याचें हे पहिले उदाहरण. बाकीच्या गावांतले सरकारी अधिकारी म्हणजे भलते निष्काळजी. फार उर्मट लेकाचे.

**ढेरे**—त्याला कारणंहि तशींच आहेत साहेब. म्हणजे स्वतःचा मोठेपणा म्हणून नव्हे, पण इतर जिल्हाधिकारी जातीनं काय पाहतात? सगळी कामं कारकुनांकडे—आत्मगौरव होतोय थोडा, पण—पण आमच्या अधिकाऱ्यांचं ध्येय एकच! वरिष्ठांच्या आज्ञा—हुकूम शिरसावंद्य मानायचा, सरकारी नोकरी हे लोकसेवेचं असिधाराव्रत आहे असं समजून वागायचं, आणि त्यांच्याकडून मिळणारा दुवा हा नारिकेलपाक आहे हे उमगूनच कष्ट करायचे—

**सर्जे**—कसला पाक म्हणालांत—त्याच्यावरून आठवलं—हॉस्पिटल्मधले गुलाबजांबू अगदी ए वन् होते बुवा. ( हसतो—इतर लोक भयंकर विनोद झाला अशा रीतीने पण आदब संभाळून हसतात. )

**ढेरे**—आपल्यासाठी खास करवले होते—

**सर्जे**—आपल्याला बुवा खाणं पिणं मस्त पाहिजे असतं. अहो आयुष्यांत दुसरं काय आहे नाही तरी! ( सगळे माना डोलवतात ) भ्रमराप्रमाणे ह्या फळावरून त्या फळावर--

**हेडमास्तर**—फुलावर ( एकदम चूक दुरुस्त केल्याची चूक लक्षांत येऊन ) नाही, कांही भ्रमर फळावरसुद्धा बसतात म्हणा. (लाचारीनें हसतो. बाकीचे गंभीर.)

**सर्जे**—बाकी हॉस्पिटल्मध्ये गुलाबजांबू खाल्ले हे खरं नाही वाटणार म्हणा कोणाला. पण काय हो मला रोगी कुठे आढळले नाहीत तिथं? सगळे बरे होऊन गेले की काय एकदम?

**डॉ. रोंगे**—नाही, चारच सापडले होते. ( ढेरे घाबरून रोंग्यांकडे पाहतात. रोंग्यांना आपली चूक उमगते. )

**सर्जे**—सापडले?

**ढेरे**—रोगाच्या तडाख्यांत सापडले, असं म्हणायचं होतं त्यांना—

**सर्जे**—असं असं! सापडले म्हटल्यावर मलाहि कळेना. म्हटलं धरून-बिरून आणावे लागतात की काय रोगी इथं? पण तरीसुद्धा बहुतेक बिछाने रिकामेच होते—

डॉ. रांगे—रोग नाहीसा करणं हे रोग्याच्यान्न हातांत आहे साहेब–

सर्जे—आणि रोगी नाहीसा करणं हे डॉक्टरच्या हातांत आहे–काय ?

डॉ. रांगे—हॅ हॅ हॅ–आपल्या बाबतीत तसं नाही. आपली स्वतःचीच तारीफ करत नाही मी. पण मी इथं सिव्हिल सर्जन म्हणून येण्यापूर्वी विलक्षण अंदाधुंदी होती इथं. ह्या हॉस्पिटल्मध्ये–सुव्यवस्था–रोग्यांची आस्थेवाईक रीतीनें तपासणी आणि योग्य उपाययोजना इतक्या सुधारणा प्रथम वडवून आणल्या ! वातावरण स्वच्छ आणि सुंदर ठेवले. औषधांपेक्षाहि प्रामाणिकपणा, स्वच्छता आणि सुव्यवस्था–आणि–आणि–यानंच रोगी बरे होतात. मोठ्या जबाबदारीचं काम असतं साहेब–( ढेरे त्याला मागे लोटतात. )

ढेरे—पण साहेब, आमच्या कामाच्या मानानं कांहीच नाही. आम्हांला दुहेरी मार. जनतेकडून आणि वरिष्ठांकडून. पण परमेश्वराच्या कृपेनं आजवर दोघांचेहि आशीर्वाद मिळाले. रात्री झोपताना रोज प्रार्थना हीच असते माझी. परमेश्वरा, मला जर आयुष्य द्यावं अशी तुझी इच्छा असली तर जनतेच्या कल्याणासाठी देह झिजावा म्हणून दे–

सर्जे—( ढेऱ्याना ) वा ! तुमच्यासारखं माझंहि आहे. मी सुद्धा कधीमधी प्रार्थना करतो. चिंतन करतो. कधी गद्यांत, कधी पद्यांत–

हरभट—( हळूच नारभटास ) बोलणें पाहिलेंस कसें बृहस्पतीसारखें–

सर्जे—पण काय हो ढेरेसाहेब, कांही करमणूक वगैरे ? कांही पत्तेबित्ते खेळतां की नाही ? ( खिशांतून सिगरेट काढतो. एकदम दोनचार जण काड्याच्या पेट्या समोर धरतात. )

ढेरे—( तेवढ्यांत स्वगत ) पत्ते काय ? म्हणजे आमच्या रमीच्या अड्ड्याचा पत्ता लागलेला दिसतोय. ( प्रगट ) पत्ते ? खरं सांगू ? साहेब आपल्याला खोटं वाटेल, पण मला राजा कुठला आणि गुलाम कुठला हे सुद्धा ओळखता येत नाही. मग हातात धरणे तर दूर. सरकारी नोकरांनी पत्ते खेळू नयेत असं माझं मत आहे. हो, नाही म्हणायला लहानपणी–माझ्या नव्हे, आमच्या कुंदाच्या लहानपणीं पत्त्यांचे बंगले बांधून देत असे मी तिला—

सर्जे—कुंदा ? कोण कुंदा ?

ढेरे—मुलगी माझी! बी. ए. ला जाणार होती, पण एकुलती एक मुलगी. आम्हांला सोडून जायला तयारच होईना. भारीच लाघवी आहे पोर. आणि गाण्यांत तिचा हात धरणारा उभ्या सुरंगवाडात कोणी नसेल. कुंदाऽ—

( एकदम दोन्ही भटजी व इतर लोक कुन्दाताई—कुन्दाताई अशा तत्पर-तेने हाका मारतात. माईसाहेब नटून थटून येतात. कुन्दाचे पांचवारी पातळ नेसल्या आहेत. ढेऱ्यांचे लक्ष नसते. ते एकदम ओळख करून देतात— ) ही माझी मुलगी कुन्दा ( माईसाहेबांना पाहून घाबरतात, दचकतात. )

सर्जे—नमस्कार! लाजायचं कांही कारण नाही—बॉम्बेला मुली काय फ्री असतात—

ढेरे—पण साहेब—

सर्जे—छे छे—अहो स्त्रीपुरुषांच्या समान हक्काचे दिवस हे! काय कुन्दाबाई?

ढेरे—नाही पण—

माई—पण—

सर्जे—पण काय? बोला ना, थांबता का? बाकी बोलण्यापेक्षा गाण्याची कृपा केलीत तर चांगलं होईल! काय ढेरेसाहेब ( इतर मंडळी हसूं आवरतात. ढेरे संताप, भीति, फजिती ह्या सर्व गोष्टींनी कांहीच्या कांही झाले आहेत. )

ढेरे—तसं नाही—

सर्जे—काय तसं नाही. आपण फार सुंदर गाता म्हणे—

माई—छे! ( तशांतहि लाजत ) आपलं उगाच—

सर्जे—वा! उगाच कसं, तुमच्या वडिलांनी आताच सांगितलं. काय हो ढेरेसाहेब—

ढेरे—नाही पण—

माई—आपला थोडासा गैरसमज झालाय—

सर्जे—हे पाहा कुन्दाबाई, गैरसमज नाही आणि कांही नाही. बसा मंडळी. तुम्ही म्हटलंच पाहिजे गाणं. अहो मुंबई सोडल्यापासून गाणं नाही, डान्स नाही. हं कुन्दाबाई—( लोकांना ) अहो बसा की. हं, कुन्दाबाई म्हणा—

हरभट—( प्रसंगांतला गोंधळ ओळखून ) म्हणा की माईसाहेब. तो

दुर्वासाचा धावा म्हणा माईसाहेब–द्रौपदीचा कृष्णानं केलेला माईसाहेब–साहेब आमच्या माईसाहेबांच्या गळ्यांतून धावा ऐका. वळवळवळ पाणी येईल डोळ्यांतून तुमच्या. त्या हिराबाई–माणिकबाई–मोतीबाई कानांत, आपलं तोंडांत बोटं घालून गेल्या. आमच्या माईसाहेबांच्या आवाजापुढे कुन्दाबाईचा आवाज म्हणजे आपल्या बुद्धीसमोर माझ्या बुद्धीसारखा आहे. काय नारभट ?

**नारभट**—वा ! माईसाहेबांचा आवाज म्हणजे–

**सर्जे**—कोण माईसाहेब ?

**हरभट व नारभट**—ह्या ! ढेरेसाहेबांच्या पत्नी. ( हळूच बोटांनी दुसऱ्या असे दाखवतात. )

**सर्जे**—आणि कुन्दाबाई कुठल्या ?

**ढेरे**—कुन्दा–( येते )

**हरभट**—ह्या कुन्दाताई. म्याट्रिक फेल पर्यंत पास होत गेल्या आहेत. शिवणकाम, विणकाम, भरतकाम, अप्रतिम करतात, बाकी माईसाहेबांनीच शिकवलं म्हणा–

**सर्जे**—ढेरेसाहेब माफ करा हं. जरा समजुतीचा घोटाळा झाला–

**ढेरे**—कांही हरकत नाही–

**हरभट**—आपलाच काय साहेब ! पुष्कळांचा होतो. काय नारभट–

**नारभट**—तर. एकदा कुन्दाबाईनाच माईसाहेब म्हणून मी अष्टपुत्रा सौभाग्यवती भव म्हणालो–

**सर्जे**—मग त्यांत काय झालं ?

**हरभट**—होणार काय ? अजून लग्न व्हायचं आहे त्यांचं–

**सर्जे**—असं का ? बसाना कुन्दाबाई. बसा माईसाहेब–

**माईसाहेब**—माझं नांव श्यामला–

**सर्जे**—वा!छान आहे नांव. काय कुन्दाबाई, बॉम्बेला वगैरे गेला होता की नाही कधी–

**माईसाहेब**—बाकी आपल्यासारख्या मुंबईला आयुष्य घालवलेल्या माणसाला सुरंगवाड म्हणजे खेडं वाटत असेल–

**सर्जे**—वा ! खेड्यात काय कमी शोभा असते ? तो सूर्योदय, तो सूर्यास्त,

तो उन्हाळा, तो हिवाळा, तो पावसाळा, तो मार्गशीर्ष, पण नेहमी शहरांत (केवळ कांहीतरी छाप पाडण्यासाठी मोठा शब्द वापरावा म्हणून) ॲण्टिफ्लोजिष्टिन् स्टाइलनें राहण्याची सवय असल्यामुळे सुरुवातीला थोडं ॲनकंफर्टेली वाटतं.

**माईसाहेब**—बाकी आपल्या सारख्यांचे पाय आमच्या घराला लागायचे म्हणजे भाग्य म्हटलं पाहिजे आमचं—

**सर्जे**—वा वा! तुमचं कसलं, माझंच. इतकं सुंदर घर आहे तुमचं! आणि फर्निचरहि एक्सलंट आहे अगदी—

**ढेरे**—बॉम्बेहून मागवलं कार्पेंटर ॲण्ड को मधून—

**सर्जे**—असं सांगा. मी लगेच ओळखलं. माझं सगळं फर्निचर मी तिथूनच घेतो. बाकी इंग्लिश कंपन्यांचं काम चोख बघा! (उठून कुंदा व माईसाहेब बसलेल्या कोचावर बसतो.) वा! स्प्रिंग्ज् वगैरे अगदी 'पर्फेक्ट'—(माईसाहेब उठूं लागतात) बसा ना आपण. मंडळी, बसाना सगळेजण—

**सर्वजण**—छे छे! आपआपला हुद्दा ओळखून राह्यलं पाहिजे—

छे! आम्ही कुठे, आपण कुठं—

वा! असं कसं म्हणतां साहेब—

**सर्जे**—अहो कसला हुद्दा! खरं सांगायचं म्हणजे मी तर नेहमीच मी कोण आहे याचा पत्ता लागूं देत नाही कोणाला. पण अवघड जातं. आम्ही जरा बाहेर कुठं गेलों की लगेच पत्ता लागतो. ते पाहा सर्जेराव चालले! एकदा पुण्याच्या क्यांपांतून चालली होतो, लोक मला एकदम कमांडर इन् चीफ लॉर्ड आकिनलेक समजले. एकदम बिगुल काय वाजले, तलवारी काय वर गेल्या, कांही विचारूं नको. मला कांहीच कळेना! दुसरे दिवशी कर्नल कोर्लेकर म्हणून मित्र आहे माझा, त्यानं सांगितलं मला. तेव्हा कळलं—

**माई**—कमाल आहे बाई! मिल्ट्रींतसुद्धा ओळख आहे वाटतं तुमची—

**सर्जे**—मिल्ट्री? हं, मिल्ट्री काय, सिनेमा काय, फिल्म लाइनमध्ये काय कमी ओळखी आहेत म्हणतां माझ्या? ऊफ्! ही तुमची नर्गिस—लहानपणी एवढीशी होती. पण तेव्हा मी तिच्या आईला सांगितलं होतं—ही पोरगी नशीब काढणार. अजून स्मरते बिचारी. नट्या काय, त्यांचे बाप काय, भाऊ काय,

एकेकींचे नवरे काय, सगळे दोस्त आमचे. (आपल्या बोलण्याच्या परिणामावर खूष होऊन धुंदीत आल्यासारखा बडबडूं लागतो.) झालंच तर तुमचे साहित्यिक, कवि, मुंबईला गेलों की प्लॅटवर रीघ असते त्यांची. आधी चहा देईपर्यंत उठत नाहीत, आणि चहा दिल्यावर जाणं वाईट दिसतं म्हणून उठत नाहीत. बाबूराव झाले–भाऊसाहेब झाले–बाबूराव म्हणजे केसरीचे बाबूराव गोखले. नवयुगचे बाबूराव अत्रेहि येतात कधी कधी. भाऊसाहेब मात्र दोघेहि येतात हं! खांडेकर आणि माडखोलकर–तात्यासाहेबांना, म्हणजे आपले नरसोपंत! त्यांना मधांत द्राक्षं बुडवून खायची संवय कोणी लावली? मीच! मला नेहमी म्हणायचे, सर्जेराव, म्हटलं तर तुम्ही क्षत्रिय आहां, म्हटलं तर ब्राह्मण! म्हातारा मोठा विनोदी. मी लिहिलंय त्यांच्याबद्दल एके ठिकाणी–

**माई**—म्हणजे तुम्ही लेखकहि आहां–

**सर्जे**—आता आपलीच तारीफ आपण करूं नये, पण अत्र्यांना साष्टांग नमस्काराची आयडिया कोणी दिली? नाहीतर जन्मभर झेंडूच्या का कसल्या फुलासारखे निबंध खरडीत बसले असते. पण लेखन हे कांही माझं खरं कार्य नव्हे. आपली गंमत! आता तुम्हाला म्हणून सांगतों, विभावरी शिरूरकर म्हणजे कोण आहेत असं वाटतं तुम्हाला? विविध वृत्ताचा आलमगीर, नवयुगचा 'द्रोणाचार्य' सगळ्यांचे लेख लिहिता लिहिता नाकीं नऊ येतात माझ्या—

**माई**—म्हणजे ह्यांचे लेख आपण लिहितां?

**सर्जे**—दुरुस्त करून देतो. तरी वेळ जातोच की नाही फुकट?

**माई**—मग पत्नीस्नेही ऊर्फ दीडहजार पाकक्रियाहि तुमचंच पुस्तक असेल–

**सर्जे**—अर्थात—

**कुंदा**—पण लेखिकेचं नांव छोटीबाई थोरात असं छापलंय माई—

**माई**—वाटलंच मला तू मधे बोलणार म्हणून. अग छापणारांना काय? परवां त्या कोणाच्याशा लग्नपत्रिकेत नाही का, नवरीच्या जागी तिच्या आईचं नांव छापलं? कंपोस्टर मेले असेच.

**सर्जे**—कुन्दाबाईचं अगदीच चूक नाही. छोटीबाई थोरात ही माझी चुलतभाची. थोरातांची कमळा ऐकून माहिती असेलच तुम्हाला–

**माई**—हो ऐकलंय नांव–

**सर्जे**—त्याच घराण्यांतली ही. फार लागली मागे, दिलं एक पुस्तक लिहून. लेखन हे माझं जीवन आहे. मुंबईला आमच्या बंगल्यांत या म्हणजे दिसेल. वरळीला कोल्हापूरकरांचा पॅलेस आहे ना, त्यांच्या आणि ग्वाल्हेरकरांच्या पॅलेसमधला बंगला आमचा–

**माई**—पाहिला पाहिजे–

**सर्जे**—अवश्य! मंडळी तुम्हा सर्वांना आजच आमंत्रण देऊन ठेवतो. मात्र येण्यापूर्वी पत्र टाकून कळवा म्हणजे झालं. कांही नाही, सर्जेराव सुंठमारीकर, बॉम्बे –एवढयावर येतं पत्र. येऊन तर पाहा! काय आढळेल सांगता येत नाही. जपानहून एकदा एक एवढं कलिंगड आणलं होतं. काय किंमत असेल असं वाटतं तुम्हाला? तीनशे रुपयाला एक कलिंगड (आश्चर्योद्‌गार)! लहर लागली तर इजिप्तहून बिर्याणी मागवतों खास! कैरोला अजगरपाशा नांवाच्या माझ्या मित्राचं हॉटेल आहे. माझं पत्र जायची खोटी की तारेनं जेवण पाठवतो लेकाचा. न पाठवून सांगतो कोणाला? उद्या हिंदुस्थानचा प्रेसिडेंट झालों म्हणजे इजिप्तचा राजासुद्धा येईल नाक मुठींत धरून. नाडी आमच्या हातांत आहे ना? सगळे लोक चळचळ कापतील मी कोण आहे हें कळलं तर. सरकारी, बिन-सरकारी, खाजगी, सगळ्या अधिकाऱ्यांच्या नाड्या बरोबर कळतात मला!

**ढेरे**—नाही पण साहेब आमच्या बाबतीत–

**हेडमास्तर**—हो मी देखील एम्. ए.–

**डॉ. रोंगे**—आमचे रोगी खरोखरीच, युवर हायनेस्–

**सर्जे**—अरेच्या असं काय करता–

**ढेरे**—कांही नाही, पण आपल्याला विश्रांतीची आवश्यकता असेलच? सरकार, जरा पडलांत तर–

**सर्जे**—पडलों तर? nsense! ठीक आहे. कुठे आहे माझी खोली–

**ढेरे**—ह्या बाजूला. या– (त्याला नेतात)

(कांही वेळाने ढेरे परत येतात)

**ढेरे**—सुटलो!

**डॉ. रोंगे**—पण आमचा बार फुसका ठरला–

**ढेरे व इतर**—म्हणजे ?

**डॉ. रोंगे**—अहो, गुलाबजांबूंत भांग घातली होती–

**सर्वजण**—भांग ?

**हेडमास्तर**—तरी वाटलंच मला ! तीनशे रुपयांचं कलिंगड म्हणे !

**ढेरे**—भांग ? कशाला ?

**डॉ. रोंगे**—म्हटलं तारेंत तरी खरं बोलेल. पण शेवटपर्यंत पत्ता लागू दिला नाही–

**ढेरे**—अजून शंका येते तुम्हाला ? शेवटी शेवटी काय म्हणाले तें ऐकलं नाही वाटतं ? सरकारी–बिनसरकारी–खाजगी–सगळ्या अधिकाऱ्यांच्या नांग्या बरोबर माहिती आहेत मला. शंकाच नको–तोच–तो–

( जवळजवळ सर्वजण एकमेकांना तोच तो–तोच तो हे सांगत असतांना पडदा पडतो. )

# अंक चौथा

[ तिसऱ्या अंकाचाच देखावा. ढेरे दडत दडत येतात. वेळ–तिसऱ्या अंकानंतरचा दिवस. ]

**ढेरे**—( हलक्या आवाजांत ) रामसेवक–ए लक्ष्मणसेवक.

**रामसेवक**—जी साब–

**ढेरे**—अरे हळू. केवढ्यांदा शंख करतोस ! साहेब झोपले आहेत. हे बघ, कोणालाहि आंत सोडायचं नाही. ते दुकानदार येतील वशिले लावायला. कोणीहि अर्जबिर्ज घेऊन आला तर अगदी असं वाळवून दे–( लाथ मारून हाकलण्याचा अभिनय करतो. ) माझ्याविरुद्ध बोलायला कोणीहि येतो असा संशय आला की आंत सोडायचंच नाही. पुढच्या महिन्यांत दोन रुपयांची बढती देतों तुला. काय ! ( बोलतां बोलतां आपलाच आवाज चढत चालला आहे हे त्यांच्या लक्षांत येते ) श्: श्:–लक्षांत ठेव.

**राम**—जी ( रामसेवक पाय न वाजवता जातो. माईसाहेब व कुंदा येतात. )

**माई**—हे काय ? अजून कपडे सुद्धा केले नाहीत ?

ढेरे—अग झोपले आहेत साहेब ! केवढ्याने ओरडते आहेस ? माझ्या डोक्यांत केवढं काहूर उठलंय. कधी फास बसेल गळ्याला कांही सांगता येत नाही. रात्रभर डोळ्याला डोळा नाही माझ्या–

माई—मला बाई भीतिबीति नाही वाटली त्यांची ! एवढा अंमलदार आहे पण बोलायचालायला किती साधा आहे ?

कुंदा— खरंच छान आहेत ते बाबा–

माई—अस्सल मुंबईकर आहे. मॅनर्स सुद्धा किती पॉलिश आहेत. बघतांना सुद्धा हळूच बघत होता माझ्याकडे–

कुंदा—माझ्याकडे देखील–

माई—अहाहा ! डोळे फुटले नाहीत त्याचे तुझ्याकडे पाहायला. नेहमी मोठ्यांच्या बोलण्यात तोंड घालायला हवं. बरं, रीतभात लावायची म्हणून कांही बोललं. की सावत्र आई–

ढेरे—माझे आई, जरा तोंड आवरा. नेहमी वितंडवाद घाला. खरंच कांही कळेनासं झालंय. तो काल बोलत होता त्यातलं खरं किती खोटं कीती– ह्या रोंग्याला नाही ते उद्योग करायला कोणी सांगितलं होतं ! भांग घातली होती म्हणे खायला ! गाढव कुठला–छे–

माई—म्हणजे अजून तुम्हाला शंका वाटते–

ढेरे— गप ग. तुला काय कळतंय त्यांतलं ? आणि हा एवढा नट्टापट्टा कशाला ? कांही वयाकडे पाहून तरी–( पुढले शब्द पुटपुटतो )

(कुंदा ( हसते )

माई—अहाहा–तुला अगदी गुदगुल्या झाल्या असतील—

ढेरे—शः–हळू. छे ! डोक्यांत रणकंदन माजलंय. बोलता बोलता कांही धागे सांपडत होते. अजून बच्चा आहे. सोंग वठवतां आलं नाही नीट. कितीहि लपवलं म्हणून मूळ अधिकाराचा रुबाब कुठे जातो ?

माई—कुंदे, तू कशाला इथं ? चल–कांही बघावं जाऊन स्वैपाकघरांत, ते नाही. खरंच मलाहि गेलं पाहिजे शिप्याकडे. मेल्यानं जंपर आणून देतो म्हटलं होतं अगदी उजाडतांना. अजून पत्ता नाही—

( दोघी जातात. इतक्यांत पोस्टमास्तर, हेडमास्तर, जज्ज, हरभट, नारभट इत्यादि मंडळी येतात. )

**ढेरे**---ऑं ! तुम्ही सगळे इथे कुठे ?

**हेडमास्तर**---कांही नाही. अंमलदारसाहेबांच्या दर्शनाला आलों होतों. जुन्या संस्थानी निष्ठा कायम आहेत आमच्या. थोरामोठ्यांचे रोजचे मुजरे चुकता कामा नयेत---

**हरभट**---शिवाय कांही महत्त्वाचं कामहि होतं-[ इतरहि लोक संमतिदर्शक माना डोलावतात. ]

**ढेरे**---मास्तर, इथं वेळ फुकट घालवण्यापेक्षा शाळेंत कांही केलं असतं तर ? तो जिनगर आला का ड्रॉईंगमास्तर म्हणून--

**हेडमास्तर**---छे ! तो म्हणतो, मी माझी इल्लम शिकवणार नाही कोणाला.

**ढेरे**---शाळेंत मास्तर शिकवत असतात म्हणून कोणी सांगितलं त्या गाढवाला ? आणि तुम्ही न्यायाधीश ?

**जज्ज**---निम्म्या कोंबड्या विकल्या काल. चार आपल्या बंगल्यावर पाठवल्या, पंचवीस आहेत अजून--

**ढेरे**---त्या निदान कोर्टाच्या आवारांतून उचला तरी. छेः ! मी जातोय कचेरीला. साहेबांनी कांही विचारलं तर नीट एक्स्प्लेनेशन द्या--

**जज्ज**---म्हणजे-तेच हे हें अगदी नक्की ना ?

**ढेरे**---शंकाच नको ! मी जातों. जरा जपून. नाहीतर सगळ्यांचे गळे गुंतवाल. मी कुठे आहे म्हणून विचारतील. कचेरीत गेलो आहे म्हणून सांगा. मी तेथे बोलावण्याची वाट पाहातोय--( जातो. )

**जज्ज**---( ढेरे गेल्यावर ) वाट पाहा आता. मंडळी, मला वाटतं आपण अर्धवर्तुळाकार उभे राहू या. म्हणजे सगळ्यांचे मुजरे दिसू शकतील--

**पोस्टमास्तर**---मुजऱ्यापेक्षा शेकहँड बरा. म्हणजे हात आणि मूठ एकदम दाबली की काम संपलं--

**जज्ज**---नको नको. भलतंच होईल. लांच घेणारा नसला तर अंगलट येईल--

**पोस्टमास्तर**---त्यापेक्षा पोस्टानेच पाठवूं या. कांही पत्ता लागणार नाही, कुठून पैसे आले त्याचा--

**जज्ज**—वा ! मग काय उपयोग ? आपण पैसे पाठवायचे आणि फायदा व्हायचा तिसऱ्याचा. नीट उभे तरी राहा. आणि प्रथम विषय कोण काढणार ? डॉक्टर, तुम्हीच बोला. काल इस्पितळात तुमची पार्टी झोडली आहे त्यानी, खाल्ल्या मिठाला तरी जागतोय का पाहू–

**डॉ. रोंगे**—त्यापेक्षा हेडमास्तरच बोलू देत. बोलायची सवय असते मास्तर लोकाना–

**हेडमास्तर**—नको नको. वरिष्ठांशी बोलताना जीभ टाळूला अडकते माझी. तुम्हीच पाहा बुवा. जज्जसाहेब तुम्हीच बोला की. वक्तृत्वाची कला आहे तुमच्यात. कोर्टाच जजमेंट देताच की तुम्ही–

**जज्ज**– पण ते वकीलच लिहून आणून देतात हो मला. मी काय बोलणार ? ( आंतून सर्जेराव–हणम्या, माझा हातरुमाल कुठे आहे ? )

**सर्वजण**—अरे बापरे ! आले वाटतं–( एकदम मधल्या दाराने धावू लागतात. हरभटाच्या पायावर कोणाचा तरी पाय पडतो. )

**हरभट**—ओऽय–मेलो–( सर्वजण बाहेर जातात. सर्जेराव व हणमंत प्रवेश करतात. )

**सर्जे**—असं आदरातिथ्य करणारी माणसं पाहिजेत. हणम्या, आराम चाललाय ना इथं ?

**हणम्या**—एकूण चांगलं वागतात साहेब. पण जरा चमत्कारिक वाटतं साहेब हे मला. कांहीतरी घोटाळा आहे–

**सर्जे**—घोटाळा कसला ? अरे माझ्यासारखे कल्चर्ड लोक येतात कुठे इथे ? कांही असलं तरी माणसं चांगली आहेत. ती पोरगी तर मस्त आहे आणि आईहि कांही अगदीच ही नाही. आपल्याला आवडतं बुवा असलं लाइफ–( हळूच जज्ज येतो )

**जज्ज**—( मुजरा करीत ) गुड आफ्टरनून, मी–

**सर्जे**—( दचकून ) गुड आफ्टरनून–

**जज्ज**—मी इथला जज्ज यस्. वाय्. टुमणे. बी. ए. एलेल्बी. एस्टीसी– ( उजव्या मुठीत नोटा. )

सर्जे—असं का? तुम्ही जज्ज आहांत होय इथले? छान. कसं काय चाललंय कोर्ट? कमाई, बरकत चांगली असते की नाही? (जज्ज घाबरतो.)

जज्ज—वरिष्ठांची मर्जी आहे. जुन्या राजवटीत न्यायमोती हा किताब बहाल केला होता राजेसाहेबांनी. ते असते तर न्यायरत्न झालों असतो. (हातांतली चवड दाबीत धावी का ठेवावी ह्याचा विचार करतो.)

सर्जे—न्यायरत्न काय? छान. आँ? हातात काय आहे तुमच्या?

जज्ज—(हातांतल्या नोटा गळून पडतात) कांही नाही–

सर्जे—कांही नाही? अहो पैसे पडले की तुमचे (उचलतो.) हे काय? शंभराच्या नोटा आहेत की–

जज्ज—राहूं देत–युवर एक्सलन्सी–युवर ऑनर–असूं देत तुमच्याजवळ–

सर्जे—माझ्याजवळ? हे पैसे? म्हणजे? मला कशाला देता हे पैसे?

जज्ज—आमच्या ध्यानांत आलंय युवर ऑनर! असूं देत पैसे. मी नाही बोलत कुठे. ठेवा साहेब–

सर्जे—छे छेः! अहो पण, हे कशासाठी?

जज्ज—ठेवा साहेब—

सर्जे—कर्ज म्हणून ठेवीन. अहो प्रवासात खर्च काय होतो बेसुमार! मी मुंबईला गेल्यावर लगेच परत करीन.

जज्ज—छे छे! परत? नो युवर ऑन्सलन्सी, एक्सोलन्सी द ऑनर इज माईन, खरंच! वरिष्ठांची सेवा हाच धर्म! आपल्याला जास्त तसदी देत नाही मी. आपला कांही हुकूम—

सर्जे—कसला हुकूम—

जज्ज—नाही, कोर्टाच्या कामाच्याबाबत कांही सूचना—

सर्जे—छे छे कांही नाही.

जज्ज—(पुन्हा मुजरा करून) आज्ञा असावी साहेब. येऊं मी? नमस्ते. (जाताना मिजाशींत बाहेर जातो.)

(सर्जेराव तो जाताना थक्क होऊन त्याच्याकडे आश्चर्याने पाहातच राहतो.)

सर्जे—वेड बिड लागलंय की काय ह्या जज्जाला! चारशे रुपये! युवर

ऑनर! ( जज्जाची नक्कल करीत ) कोर्टाच्या कामाबाबत कांही सूचना? आम्ही काय डोंबलाची सूचना करणार?

( हेडमास्तरांना कोणीतरी ढकलून आंत पाठवतात. मास्तर कोपऱ्यांत भेदरून उभे आहेत. ) काय हो? कोण तुम्ही? असें घाबरता कां?

**हेडमास्तर**—मी इथल्या शाळेचा मुख्याध्यापक. आपलं हेडमास्तर. गुंडो गणेश गोळे—

**सर्जे**—मग असा पोटांत गोळा आल्यासारखे कां उभे? बसा ना. सिगरेट ओढता—

**हेडमास्तर**—कधीच नाही.

**सर्जे**—घ्या हो! इथं कोणी विद्यार्थी येत नाही पाहायला. घ्या स्टेट एक्सप्रेस आहे. घ्या. ( मास्तरांची सिगरेट पेटवतो. मास्तरांना ठसका लागतो. ) सवय नाही वाटतं. आपल्याला तर सिगरेटशिवाय भागत नाही. सिगरेट आणि पोरी. रागवूं नका हं मास्तरसाहेब. शाळेत मास्तरणी आहेत की सगळे गुरुजीच?

**हेडमास्तर**—नाही पण सरकार—

**सर्जे**—अहो घाबरता काय एवढे? बाकी पुष्कळ लोक मला उगीच भितात बरं का. पण बायकांच्या बाबतींत मात्र आपला अनुभव उलटा आहे. तुमचा काय आहे?

**हेडमास्तर**—नाही, म्हणजे तसला कसलाच अनुभव नाही मला. क्षमा असावी—

**सर्जे**—( मास्तरांकडे हळूच नजर टाकीत ) बरं का मास्तरसाहेब, मोठी गंमत झाली येताना. वाटेत चिंचलीच्या जत्रेंत एका मित्राच्या नादानं तीन पानी जुगार खेळलों आणि जवळचे सगळे पैसे घालवून बसलों. तुम्ही एक दोनपांचशे रुपये कर्जाऊ देऊं शकता का? शक्य नसेल तर नाही म्हणा हो स्पष्ट. घरी गेल्यावर तारेनं पाठवून देईन—

**हेडमास्तर**—( स्वगत ) आता आली मुद्यावर गाठ. ( प्रकट ) पाहतों. हे आहेत. पण सरकार, परत करण्याची भाषा कशाला? नमस्कार युवर एक्सलंसी —सरकार, अधिक तसदी देत नाही—नमस्ते—

**सर्जे**—थँक्यू–थँक्यू–नमस्ते. हं—

**हेडमास्तर**—( जातां जातां ) आता आणखी शाळा तपासायला नाही आले म्हणजे मिळवली. ( जातो. )

**सर्जे**—बाकी एकूण ह्यां रुबाबाला बरेच लोक भेदरतात असं दिसतंय. ( पोस्टमास्तर येतो. ) कोण आहे ? नमस्ते.

**पोस्टमास्तर**—नमस्ते—

**सर्जे**—नमस्ते–आपण ?

**पोस्टमास्तर**—मी ऽ ऽ

**सर्जे**—( अजून ओळख पटली नाही ) आपण म्हणजे ऽ

**पोस्टमास्तर**—मी पोस्टमास्तर.

**सर्जे**—हो हो बसा !

**पोस्टमास्तर**—छे छे. आपण बसा. प्रत्येकानं आपली पायरी ओळखून वागलं पाहिजे. मी यःकश्चित सुरुंगवाडचा पोस्टमास्तर. आपल्यासारख्या दिल्लीच्या अंमलदारापुढे बसायला लागलों तर लोक शेण घालतील आमच्या तोंडात ! ह्या लोकांनी लाजा सोडल्या म्हणून आम्हीहि शिष्टाचार डेड लेटर ऑफिसांत नाही टाकले.

( आपल्याला चुकून अंमलदार समजले आहेत हे आता त्याच्या लक्षांत आले ! )

**सर्जे**—हं, काय पोस्टमास्तर. ठीक चाललं आहे ना पोस्ट ?

**पोस्टमास्तर**—उत्तम ! आमचं डिपार्टमेंट चोख आहे ! तिथं कांही ढेरे साहेबांचा कारभार नाही. आम्ही अधिकाऱ्यांनी एकमेकांबद्दल बोलूं नये–पण आपल्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना राष्ट्रहिताच्या दृष्टीने कांही गोष्टी सांगणे आवश्यक आहे, म्हणून मुद्दाम भेटीला आलों ! असले अधिकारी जर राज्य करूं लागले तर आपल्या देशाच्या चिंधड्या होतील !

**सर्जे**—काय म्हणतां ?

**पोस्टमास्तर**—काय सांगू ! जिवावर येतं साहेब पण नाही राहावत. आत्ता गेला हा डॉक्टर. संस्थानी जमान्यांत पशु डॉक्टर होता. स्वतःला आता सिव्हिल् सर्जन म्हणवतो. ढेरेसाहेबांची कृपा !

**सर्जे**—ओ !

**पोस्टमास्तर**—तसंच हा हेडमास्तर ! पूर्वी बाजारमास्तर होता वाड्यावर —

**सर्जे**—बाजारमास्तर ?

**पोस्टमास्तर**—होय बाजारमास्तर ! अगदी मिरच्या कोथिंबीर आणणारा ! तोच कशाला ? तो जज्ज टुमण्या—सुरवातीला आला तो—काय सांगू ? कोर्टात क्षणभर राहत असेल तर शपथ ! दिवसभर कोंबड्यांच्या खुराड्यांत असतो ! आता जज्ज म्हणविणाऱ्याने अंडीं विकण्याचा साइड्‌बिझनेस् करणं शोभतं का अंमलदारसाहेब ?

**सर्जे**—भलतंच ! अंडी विकणारा न्यायाधीश ! ऐकायलासुद्धा कससंच वाटतं—

**पोस्टमास्तर**—पाहा म्हणजे झाल ! शिवाय आता न्यायाधीश म्हणवतो स्वतःलाच, पण चारित्र्य काय ? तो नारभट पाहिला असेल आपण ? आपल्या तीक्ष्ण नजरेतून कोणीच सुटलं नसेल म्हणा—

**सर्जे**—बरं त्याचं काय ?

**पोस्टमास्तर**—तो पूजा एकादष्ण्या करायला घराबाहेर पडला की जज्ज-साहेब शिरले त्याच्या घरी. यावरून काय ते समजा म्हणजे झालं. सुज्ञासि अधिक सांगणें नलगे ! असा आहे इथला कारभार !!

**सर्जे**—वा ! चांगली माहिती पुरवलीत—

**पोस्टमास्तर**—( खुलतो. ) हो, म्हणजे आपला इथे येण्याचा उद्देश कळला. म्हटलं राष्ट्रांत खरी सुधारणा व्हायला हवी असेल तर असल्या ह्या नालायक लोकांची हकालपट्टी झाली पाहिजे. आपल्यासारख्या अंमलदारांना खरी माहिती पुरविणं ही पर्यायाने राष्ट्राचीच सेवा नाही का ?

**सर्जे**—तर ? मी योग्य उपयोग करीन ह्या माहितीचा ! राष्ट्राची सेवा म्हणजे काय समजले हे लोक ? लंबे करतो एकेकाला ! ! काय पोस्टमास्तर साहेब, एक चारशे रुपये निघतील का तुमच्याजवळ ?

**पोस्टमास्तर**—अरे अरे अरे ! पैसे पाहिजे होते का आपल्याला ? बघा कसा घोटाळा झाला ! आत्तांच त्या टुमण्याने दोनशे रुपये उसने घेतले माझ्या कडून ( हळूच ) आपल्याला द्यायचे आहेत म्हणाला. स्वतः हे लाचखाऊ

..., आपल्यालाहि त्याच रांगेत चालू पाहात होते. आणि चोर कसा ... पाहा ! बाहेर येऊन मला म्हणाला की आपण लाच म्हणून स्वीकारलेत पैसे !

**सर्जे**—मी ? काय हरामखोर आहे हो तो ? कुठे आहे तो ? आ... त्याला, शूट करून टाकतो ! नाही तर थांबा, त्याला डिसमिसच करतो–

**पोस्टमास्तर**—बरं मग जाऊं मी ? जमलं तर अर्ध्या तासांत पाठवतो पैसे... आमची सेव्हिंग बँकहि बंद झाली आता. बरं आहे, नमस्ते—

**सर्जे**—नमस्ते. ( पोस्टमास्तर जातो. हरभट आणि नारभट येतात. )

**हरभट**—नमस्कार–

**नारभट**—नमस्कार–

**सर्जे**—काय आहे ?

**नारभट**—नाही, कांही नाही. मी वेदशास्त्रसंपन्न नारायण शास्त्री उकिडवे –आणि–

**हरभट**—मी हरेश्वर शास्त्री बोबडे. वेदशास्त्रसंपन्नच. इथले देवस्थान श्रेष्ठी आहों आम्ही दोघे.

**सर्जे**—ऐकलंय मी तुमच्याबद्दल ! काय उत्पन्न आहे देवस्थानचं ? खरं सांगा. उगाच छपवाछपवी करूं नका ! !

**हरभट**—असेल एक–

**नारभट**—हो असेल–

**सर्जे**—असेल असेल काय ? किती पैसे आणले आहेत ?

**हरभट**— आम्ही गरीब भिक्षुक–

**सर्जे**—दोनशे रुपये द्या–

**दोघेहि**—एवढे ? श्रीमंत सरकार, गरीब भिक्षुक आम्ही, एका-दण्यावर जगणारे–

**हरभट**—कुठं एखादा सत्यनारायण, एवढे पैसे कुठून देणार ? नारभट, तुझ्या पागोट्यांत किती आहेत ?

**नारभट**—तुझ्या बंडीतल्या आणि कनवटीच्या नोटा काढ अगोदर–



क्र. २३८०८
दि. ५।१२।७२

**सर्जे**—आटपा लवकर. घाई आहे मला. अजून पंचवीस ऑफिसर्सची हजेरी घ्यायची आहे.

**हरभट**—हे पंचवीस निघाले—

**नारभट**—आणि हे बावीस—

**हरभट**—आणि कनवटीचे तीन रुपये काढ लघुरुद्राचे—

**नारभट** – हे तीन —

**सर्जे**—हं, आणा. काय म्हणणं आहे तुमचं—

**हरभट**—आमची एक अर्जी आहे सरकार. हें देवस्थानचं उत्पन्न तेवढें आम्हा दोघांच्या नांवावरून करून देण्याबाबत सरकारात थोडी खटपट करावी. ह्या भ्रष्टींच्या कामात कांही सुटत नाही—

**नारभट**—आणि—

**सर्जे**—आणि काय ?

**नारभट**—( आसपास पाहून ) हरभट, तें ढेरेसाहेबांचं सांगा—

**हरभट**—( सावधगिरीने ) सरकार, ह्या ढेऱ्यास जरा फैलावर घ्या नीट. देवळांतल्या नैवेद्याच्या नारळांत सुद्धा आपला हिस्सा ठेवला आहे याने—

**सर्जे**—ठीक आहे. पाहतो प्रयत्न करून—

**नारभट**—शिवाय आपण थोरामोठ्यांत हिंडता, दिल्लीबिल्लीस कधी मधी सरकारदरबारीं आमच्या नांवांचा उल्लेख करावा. सुरुंगवाडास वेदशास्त्र-संपन्न नारभट उकिडवे आणि वेदशास्त्रसंपन्न हरभट बोबडे भेटले होते. आमचीं नांवें ह्या सुरुंगवाडाबाहेर कोणीतरी घ्यावींत ही इच्छा.ही विज्ञापना. हरभट, आशीर्वाद दे श्रीमंतांना—

**हरभट आणि नारभट**—शतंजीव शरदो वर्धमानः
शतं हेमंतां शतमुवसंतान् ।
शतमिंद्राग्नी सविता बृहस्पतिः शतायुषा
हविषेमं पुनर्दुः ॥ श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमाविधाच्छोभमानं महीयते । धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः ॥

**सर्जे**—( त्यांनीच दिलेल्या पैशांतील आठ आठ आणे त्यांना देत ) हं, ही दक्षणा घ्या.

**हरभट**—छे छे ! नको. तेवढें ढेऱ्यांचें लक्षांत असूं द्या. चांगलें कांडांत काढतां आलें तर उत्तम ! चल नारभट, गोडबोले वकिलाकडे मेहुण आहे. वेळेवर गेलें पाहिजे.

**नारभट**—हो, बारसें असो नाहीतर बारावें। वेळेच्या आधी पांच मिंटें हजर ! नमस्कार. ( दोघेहि जातात. )

**सर्जे**—अरे चोरांनो ! अशी झाली काय भानगड ! हणम्या, ए हणम्या ( हणम्या येतो ) सलाम कर गाढवा. सरकारी अंमलदारापुढे बेअदबी ? ( हंसतो. ) हें बघ. ( नोटा दाखवतो ) वनथाउजंडच्या वर आहेत. आयडिया !! आमच्या वसंताला पत्र लिहून कळवलं पाहिजे ! बायका नवरे सोडून गेल्याची नाटकं लिहितो लेकाचा ! ह्या विषयावर नाटक लिही म्हणावं !

**हणम्या**—साहेब आता निघूं या–

**सर्जे**—गपरे, राहूं या दोन दिवस !

**हणम्या**—नको साहेब. तो कोण खरा अंमलदार आला म्हणजे दोघांनाहि बसावं लागेल तुरुंगात !

**सर्जे**—तुरुंगात ?

**हणम्या**– चला साहेब ! मी लागतो सामान बांधायला ! बाहेर मला गावकरी पिडायला लागले आहेत. आज निघू या. फार दिवस झाले घर सोडून–

**सर्जे**—अरे घाबरतोस काय असा ?

( बाहेर रामसेवकचा आवाज, 'चलो हटो–ए, आंत येऊं नका म्हणतो ना. चलो, साब अंदर काम में है !' बाहेर आवाज वाढत जातो. 'आम्हांला आंत येऊं द्या ! आम्हांला साहेबांना भेटायचं आहे ! आमच्या तक्रारी कोण ऐकणार मग ?'–रामसेवक, 'जाव ! जाव ! साहेब झोपले आहेत.' )

**सर्जे**—हणम्या, काय गडबड आहे रे ?

**हणम्या**—( धावत येतो व खिडकींतून डोकावून ) बाहेर गावकरी लोक जमले आहेत. तुम्हाला भेटायचं म्हणताहेत—रामसेवक सोडत नाही त्यांना—

**सर्जे**—( खिडकींतून ) मित्र हो-( पुढारी छाप नमस्कार करतो. )

( **आवाज**–साहेब, आम्हाला तुम्हाला भेटायचं आहे, आमचा अर्ज आहे साहेब– )

सर्जे—ठीक आहे, कोणातरी दोघाना पाठवा. हणम्या, हे प्रकरण आता आंगलट येणार—

हणम्या—तेच म्हणतो मी. आता सुटू या इथून लवकर. (जातो.)

(दोघेजण येतात. एक संपूर्ण खादीचा पोषाख केलेला गृहस्थ व एक मारवाडी)

सर्जे—या या ! बसा—

पहिला शेटजी—जयगोपाल सरकार—

दुसरा शेटजी—जयहिंद साहेब—

सर्जे—नमस्ते. बसा—

पहिला शेटजी—साहेब, आमी कापड बेपारी संघचे तरफसे हा हार घालतां ! आणि हे आपली छोटी भेट (एक बुलनचा पीस देतो.)

दुसरा शेटजी—साहेब, मी इथल्या किराणा भुसार व्यापाऱ्यांचा प्रतिनिधि. डब्यांत दोन शेर साखर आहे साहेब—

सर्जे—नुसती साखर ?

दुसरा शेटजी—डबा उघडून बघा साहेब—(**डब्यात नोटांचे पुडके निघते.**)

सर्जे—ऑं ? अहो हे कशाला ? बरं असू दे ! तुम्हां मंडळींचं प्रेम म्हणजे टू मच होतं बघा. हं, काय तक्रारी आहेत तुमच्या—

पहिला शेटजी—साहेब, ढेरेसाहेब घरांत नाहीत का ?

दुसरा शेटजी—नाही, कचेरींत आहेत. मी पाहून आलोंय—

पहिला शेटजी—चला ! तो सारूं थयूं ! साहेब, आमा बेपारी लोकावर हे कलेक्टर साहेबनी लयी अण्याय च्यालविलाऽहे साहेब. असा शैतान माणस बगला नाय साहेब. पूर्वी राजासाब होता तेंचा जुलुम तुमी सरकारनी कमी केली साहेब, पण हे शैतान रातदिन छळते साहेब—

दुसरा शेटजी—साहेब, महिन्याकाठी हजार रुपयांचा माल ढेरेसाहेब फुकटचा नेतात—

पहिला शेटजी—ते, ने तेची बायडी, ने तेची सोकरी, कपडा नेते जबरदस्ती—वरी दीवाळीला पुना ज्युलुमसी सिलकसाडी, शालु ने साटीन दरसाल मोफत देतं आमी—

सर्जे—मोठा हरामखोर दिसतो हा ढेऱ्या—

पहिला शेटजी—तुमी बघा खावंद ! वर्साला धा धा वेळा वाढदिवस करते, आपला ने आपले बायडीचा. आमी लोकाला प्रेझेंठ देनेचा मुर्देड ! तुमच्या पाय धरतो साहेब, तेला एकदम ढेसमीस करू द्या. पायज तर हे ठेवा—( नोटा काढतो. )

सर्जे – शेठजी, असली लांचलुचपत घेत नाही मी. जनतेचीं गाऱ्हाणीं ऐकण्यासाठी तर नेमणूक आहे आमची–

दुसरा शेटजी —लांच म्हणून नाही साहेब. प्रवासखर्च समजा साहेब. पण ह्या ढेरेसाहेबाला धडा शिकवा—

सर्जे—अवश्य. जनतेच्या सेवेसाठी तर आमचा जन्म. तुम्ही म्हणता म्हणून ठेवून घेतो. कोणाचं मन मोडणं मोठं जिवावर येतं माझ्या. बरं आहे, नमस्ते—

शेटजी—नमस्ते. पण त्या ढेरेसाहेबाचा चांगला काटा काढा !

सर्जे—कांही काळजी करूं नका ! ( ते जातात ) हणम्या, हणम्या ! बाहेरचं दार लावून घे !—बस्स झालं आता ! आवरा. ( खाली– ‘ तुम्ही लोकांनी आपले वशिले लावून गांठ घेतली साहेबांची, ब्यायला गरीबांचा वाली कोणी नाही ’ इ. आवाज. कुन्दा प्रवेश करते. )

सर्जे—कोण आहे ? ओ ! तुम्ही होय ?

कुंदा—अगबाई, एवढं घाबरायला काय झालं ?

सर्जे—छे तुम्हाला काय घाबरायचं ? कुणीकडे निघालां होता ?

कुंदा—छे ! कुणीकडे असं कांही नाही. सहजच आलें होतें–

सर्जे—सहज आलांत ? छान ! बसा ना—

कुंदा—मला वाटलं माई असतील इथं—

सर्जे—छे ! छे ! माई नाहीत. पण सहज आलात ?

कुंदा—नाही—हो—पण सहजच ! कांही महत्त्वाच्या कामांत नव्हता ना ?

सर्जे—छेः छेः ! तुमच्याशी बोलण्यापेक्षा अधिक महत्त्वाचं काय काम असूं शकणार ? थकल्या जिवाला ह्यापेक्षा मोठा विसावा काय असणार ? तुम्ही

सदैव जर माझ्याबरोबर राहाल तर वाटेल तसल्या सरकारी, खाजगी, सगळ्या जबाबदाऱ्या हलक्या फुलासारख्या झेलीन मी–

कुंदा—किती सुन्दर बोलता हो तुम्ही ?

सर्जे—तुम्ही समोर आल्यावर मुक्यालासुद्धा बोल फुटेल आणि बोलणारा मुक्याचं व्रत घेईल–

कुंदा—कुठल्याशा नाटकात आहे नाही हे वाक्य ?

सर्जे—हं ! आर. जी. गडकऱ्याला लिहून दिलं होतं मी त्याच्या भाव-बंधनांत घालायला. मेला बिचारा ! बसा ना. बाकी स्त्रियांना बसायला हृदया-सारखं सिंहासन नाही. तूर्त बसा ह्या खुर्चीवर–

कुंदा—नको बाई, जातें–( खुर्चीवर बसते )

सर्जे—तुमच्या गळ्यांतला हा मोत्यांचा हार फार सुंदर आहे नाही–

कुंदा—काय थट्टा करता गरिबांची–

सर्जे—थट्टा ? बेदरकारपणें तरुणीच्या गळ्यांत पडणाऱ्या हारांचा मला नेहमीच हेवा वाटतो.

कुंदा—इश्श ! आज हवा किती चमत्कारिक पडली आहे नाही–

सर्जे—हवा ? कुन्दा, हवेवर बोलण्याइतके 'झालों' नाही आपण अजून ! हा विषय खास पेन्शनरांच्या साठी राखून ठेवण्यात आला आहे !

कुंदा—कवींच्या पुढे आम्ही तरी काय बोलणार बाई !

सर्जे—समोर स्फूर्ति आहे म्हणून कवीला काव्य सुचतंय !

कुंदा—इतकं काव्यमय बोलता, त्याच्यापेक्षा माझ्या वहीत एखादी कविताच लिहून द्याना–

सर्जे—कविता ? एक कां, वाटेल तितक्या. काय लिहूं ?

कुंदा—तुमची स्वतःची !

सर्जे—पण माझी स्वतःची काय एक कविता आहे ? कुठली देऊं ? एकत्र गुंफोनी जीवित धागे ऽऽऽऽ प्रीतीचें नर्तन नाचलों मागे ऽऽऽऽ ( मागे पाहतो. ) ही चालेल ? का—सखि भा ऽ ऽ व-गी ऽ त मा आ ऽ आ ऽ ऽ आहे ? तुजसाठि गायिए ऽ ए ऽ ऽ एले तू ना ऽ ऽ ही ऐकिये ऽ ऽऽ

लें—ही चालेल ? शेकडो कविता लिहिल्या आहेत ह्या बोटांनी. तुम्ही लिहिल्या आहेत की नाही ?

**कुंदा**—मी काय लिहिणार ? खेडवळ मुली आम्ही—

**सर्जे**—जरा डोळे बघू तुमचे—

**कुंदा**—डोळे ?

**सर्जे**—यस, युवर आइज. कलावंताच्या डोळ्यांत निराळंच पाणी खेळत असतं. ( डॉक्टर पाहतात त्याप्रमाणे डोळ्याची खालची बाजू ओढून पाहतो. ) शुअर, तुम्ही कविता लिहिता—

**कुंदा**—अगबाई ! कसं ओळखलं तुम्ही ?

**सर्जे**—क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणाचा ! मग पुढे—ह्या ओळी लिहिणाऱ्या ह्या कवीला काय अशक्य आहे ? हं म्हणा—

**कुंदा**—काय ते ?

**सर्जे**—तुमची कविता—

**कुंदा**—चला, पुरे झाली थट्टा !

**सर्जे**—पुरे झाली ? वा! अजून सुरू नाही झाली आणि पुरे काय झाली ? म्हणा—

**कुंदा**—हसायचं नाही हं—

**सर्जे**—छे छे—

**कुंदा**—( कविता म्हणते. )

ओळखीच्या पाउलांची लागली चाहूल रे
कां कळेना आज माझे हृदय होई बावरे ।
आज राया किति दिसांनी धन्य झाली लोचने
आसवांचे रूप घेते आस तूझ्या दर्शने
हार हातांचे तुला मी गुंफिले रे साजिरे ।।
धाडिला संदेश तुजला पाखरांच्या संगती
ऐकुनी आलास कारे त्यांचिया तूं मागुती
पाखरू तूझे जहाले आज येथे बावरे ।।

चांदण्यांनो शोभते का ही तुम्हां रीती अशी
हळुच मिचकुनि नयन हंसता पाहुनी होतें पिशी
भाबड्या ह्या बालिकेला कोण आता सांवरे ॥
नेत्र मम पाणावले रे कांपते काया किती
धीर दे मज तूच आता तूच माझा सोबती
भान हरतां धीर नुरता ये सख्या झणि धांव रे ॥

**सर्जे**—अहाहा ! कुंदा, कुठे आहे मी ? स्वर्गधरेच्या मीलनरेषेवर सागराच्या लाटा उचंबळून येतात, त्याप्रमाणे माझ्या हृदयाच्या आकाशांत प्रीतीचे ढग जमायला लागले आहेत. प्रिये सोडि सोडी अता संशयाते पहा देइ सखि गाढ आलिंगना–( हात पसरून जातो. )

**कुंदा**—अगबाई ! ( दूर होते ) मी नाही हं असला फाजिलपणा चालू द्यायची—

**सर्जे**—कुंदा रागावू नकोस. तुझ्या सौंदर्याने माझे डोळे दिपले. तुझ्या संगीताने कान बंद झाले. रागावू नकोस. मी पदर पसरतो. ( विजारींतून सदरा बाहेर काढून अक्षरशः पदर पसरतो. ) क्षमा कर. प्रीतीच्या ह्या भिकाऱ्याला–अजून जेवणं व्हायचीं आहेत, पुढे जा–असं सांगू नकोस ( गुढघे टेकतो. माईसाहेब येतात ).

**माई**—अगबाई ! कुंदे !

**कुंदा**—माई–पण मी—

**माई**—कांही बोलू नकोस–चालती हो. तोंड दाखवूं नकोस मला. ( कुंदा जाते ).

**सर्जे**—माईसाहेब, प्रीतीच्या ज्वाळांनी मी हळु हळू हळु हळू असा ऽ ऽ ऽ जळत चाललोंय—

**माई**—पण अंमलदारसाहेब, असे गुढघे टेकायला काय झालं ? फरशी झाडलीसुद्धा नव्हती आज—

**सर्जे**—माईसाहेब, जिथं हृदय पेटलंय तिथं कपड्यांची शुद्ध काय राहणार ? ( पुन्हा गुढघे टेकतो. ) सांगा, बोला, तुमचा निर्णय द्या. बोला, मला जीवन देता की मरण—

माई—माझ्या काहीच लक्षांत येत नाही अंमलदारसाहेब. कुंदाशी लग्न करायचा विचार आहे का आपला ?

सर्जे—कुंदा ? कां अशी माझी निर्दय थट्टा करता माईसाहेब ? माझं सर्वस्व आपल्या हातांत आहे—

माई—अंमलदारसाहेब, पण हे काय भलतंच. दुसरेपणाची असलें तरी लग्न झालेली स्त्री आहे मी. समाज काय म्हणेल ?

सर्जे—समाज ! समाज ! ! प्रीतीला समाजाच्या बंधनाची काय पर्वा ? माईसाहेब चला, कुठे तरी दूऽऽर दूऽऽर जाऊं. जिथं समाज नाही, धर्म नाही, रूढी नाही, ढेरेसाहेब नाहीत, माईसाहेब–प्रीतीचा भिकारी–( कुंदा येते. )

कुंदा—माई, बाबा कचेरींतून आले–अगबाई–शीः ! शोभतं का तुला हे ?

माई—( एकदम ) शी म्हणायला काय झालं ? असं मांजरीसारखं फिसकारून कशाला यायला हवं ? अगदी कुक्कुलबाळ समजते स्वतःला ! कांही रीतभात ? अशी एकदम आंत आलीस, अंमलदारसाहेबांना काय वाटलं असेल ?

कुंदा – पण माई–

माई—कोण म्हणेल तुला कलेक्टरांच्या घरांतली मुलगी म्हणून ? अगदी त्या नारभटाच्या बायकोसारखी अडाणी मेली ! माणसं कशी वागतात, कशी चालतात, कांही नाही. चांगल्या लोकांची उदाहरणं ठेवायची नाहीत समोर. तरी हिला चांगलं वळण लावायचा किती प्रयत्न–वर पुन्हा सावत्र आई म्हणून नावं ठेवायला तयार—

सर्जे—माईसाहेब, आमच्या सुखांत विघ्न घालूं नका. आमच्या पवित्र प्रेमाला सावत्र मातेचा–आपलं, पवित्र मातेचा पवित्र आशीर्वाद द्या–

माई—( दिङ्मूढ होऊन ) म्हणजे ? ( कुंदाकडे पाहते ).

सर्जे—सांगा माईसाहेब–जीवन की मरण ?

माई—बघ ! तुझ्यासाठी अंमलदारसाहेबांनी माझ्यापुढे पदर पसरला, आणि तू भलत्या संशयाने माझ्याकडे पाहत होतीस. आता मी नाही म्हटलं तर ?

कुंदा—माई, चुकलं माझं ! पुन्हा नाही असं करणार–( ढेरेसाहेब धावत येतात ).

ढेरे—साहेब ! वाचवा मला–

सर्जे—काय झालं तुम्हाला ?

ढेरे—साहेब, माझ्या कचेरीत सरकारी कामांत मी गुंतलों आणि लोकांनी माझ्या विरुद्ध इथं नाही नाही त्या कागाळ्या केल्या–

सर्जे—कागाळ्या–

ढेरे—खुदावंत, क्षमा करा. हरामखोर आहेत सगळे लेकाचे. पर्मिटं मिळवतांना गुढघे टेकून पदर पसरतात, आणि मग असे उलटतात. सापाची जात आहे सरकार ह्या लोकांची !

माई—बसा तरी. ऐकलं का ? अंमलदारसाहेबांनी आपल्या कुंदेला लग्नाची मागणी घातली आहे–

ढेरे—गप् ग ! माफ करा अंमलदारसाहेब ! तिच्या बडबडण्याकडे लक्ष देऊं नका. पहिल्यापासून डोक्यांत अंमळ अधूच आहे ती ! तिची आई सुद्धा अशीच होती–

सर्जे—पण ढेरेसाहेब, खरोखरच मी लग्नाची मागणी केली आहे–

ढेरे—काय म्हणता ?

सर्जे—खरंच !

ढेरे—मी स्वप्नांत तर नाही ना ! चिमटा घे ग मला ( माई चिमटा घेतात ) आई ऽ केवढ्यानं घेतलास !–अंमलदारसाहेब, काय म्हणता आपण–

सर्जे—ढेरेसाहेब मी आपणाकडे यापुढे माझे भावी श्वशूर या नात्यानं पाहीन म्हणतों. नाही म्हणालांत तर–तर मला नाही सांगता येत काय होईल ते–

ढेरे—छे छे ! अंमलदारसाहेब, मी कशाला नाही म्हणेन ? एकुलत्या एक गरीब मुलीचा एकुलता एक गरीब बाप मी ! अभाग्याच्या घरीं–खुदावंत–कामधेनु आली–

सर्जे—कुंदा, वडलांचा आशीर्वाद घेऊं या. ( दोघेहि नमस्कार करतात. )

ढेरे—अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ! छे छे ! सगळं जग माझ्याभोवती गरगरा फिरायला लागलं आहे. सरकार, तुम्ही माझे जांवई ऽ ऽ ऽ–

हणमंता—( येत ) साहेब, पंधरा मिनिटांत गाडी सुटेल. एवढ्यांत ट्याक्सी घेऊन येईल रामसेवक. मी सांगून आलोंय—

सर्जे—ठीक आहे. बाकीचं सामान बांध—

ढेरे—म्हणजे आपण निघणार आता? पण लग्नाचं—

सर्जे—सरकारी नोकर आहे मी ढेरेसाहेब. आधी लगीन कोंडाण्याचं, मग आमचं. कर्तव्य म्हणजे ड्यूटी. तिथं अपील नाही. दिल्लीला जाईन, रजा घेईन दोन महिन्यांची नि मग येईन. येताना वडलाना घेऊनच येईन बरोबर. तीं बोलणींबिलणी काय ते तुम्ही वडील माणसं पाहा.

ढेरे—मी काय बोलूं? माझी वाचाच बंद व्हायची वेळ आली आहे. पण वाटेत प्रवासात कांही लागणार नाही का आपल्याला—

सर्जे—छेः छेः! बरं हें असं बघा—

ढेरे—काय?

सर्जे—एक बारशे—नको पण आठशे रुपये द्या बरं. दिल्लीपर्यंतचा प्रवास, आमची ही गव्हर्मेंटची खातीं. ए. जी. कडून टी. ए. चा सँक्शन यायला दोन दोन वर्षं लागतात...

ढेरे—ठीक आहे. (जातो)

सर्जे—कुंदा–(तिच्या जवळ जातो) कुंदा–

माई—माझी अडचण होत नाही ना तुम्हाला?

सर्जे—छेः छेः! माईसाहेब, कुमुदिनीला पाहून चंद्र फुलला तरी महासागरातल्या प्रचंड लाटेवर त्याचं प्रेम नसतं असं थोडंच आहे?

ढेरे—(येत) हं, हे आठशे रुपये (थैली देतो).

सर्जे—हणमंतराव, माझा कोट आणा. (हणम्या कोट देऊन जातो. कांही वेळाने बाडबिस्तरा घेऊन बाहेर पडतो.) मग जाऊ मी? (ढेऱ्यांच्या पाया पडतो.) काय योगायोग असतात पाहा! मी कोण, कुठला, कोण म्हणून आलों आणि कोण होऊन चाललोंय—

ढेरे—ब्रम्हदेवाने मारलेल्या गांठी ह्या, आपण कोण सोडणार!!

सर्जे—पण माझं हे असं होणार हे खुद्द ब्रह्मदेवाला सुद्धा सांगता आलं नसतं. बरं आहे कुंदा—येतां मी—रडूं नकोस. (आपल्या रुमालाने तिचे डोळे पुसतो व तोच रुमाल माईसाहेबांना देतो. त्याहि उगाच डोळे पुसतात.) बरं आहे ढेरेसाहेब. सर्जेराव सुंठमारीकर, सेक्रेटरिएट, दिल्ली, एवढ्यावर पत्र पोहोचतं. मग येऊं मी ढेरेसाहेब? बाकी आता ढेरेसाहेब का म्हणायचं?

येण्यापूर्वी तुम्ही इथले कलेक्टर एवढंच ठाऊक होतं मला. जातांना तुम्हाला 'मामा' करून जाईन अशी कल्पना नव्हती मला. बरं आहे मामासाहेब–

ढेरे—(माईसाहेबांना) चला आपणहि स्टेशनपर्यंत जाऊं—

सर्जे—हां हां, तुम्ही आता खाली सुद्धा येऊं नका! वास्तविक मी अंमलदार आहे हे सुद्धा कळणं इष्ट नव्हतं. दुर्दैवाने ही बातमी कशी कोण जाणे गावभर झाली. आता कृपा करून मी कधी गेलों, कुठे गेलों, कांही पत्ता लागता कामा नये!

रामसेवक—(येत) साहेब, बाहेर मोटार आली आहे.

सर्जे—हो, आलोंच मी! हं तर सांगत होतों काय, की मी कुठे गेलों सांगूं नका! कदाचित् मी पुढल्या स्टेशनवर जाऊनहि गाडी गाठेन. शिवाय मला हे रिपोर्ट्स लिहिले पाहिजेत. जातांना जरी अंमलदार म्हणून गेलों तरी येताना तुमचा भावी जांवई म्हणूनच येईन—

रामसेवक—(आश्चर्याने) जांवई?

माई—शः, बोलू नकोस कुठे. अंमलदारसाहेब आता जांवई होणार आमचे!

रामसेवक—वा वा! देव पावला!

सर्जे—बरं आहे मामासाहेब. बरं आहे कुंदा. बरं आहे माईसाहेब. तुम्ही बसा इथेच, मला आता गपचूप निघून गेलं पाहिजे. बरं आहे (जातो.)

रामसेवक—साहेब? अंमलदारसाहेब जांवई? (खाली मोटारचा आवाज.)

ढेरे—आता या म्हणावं माझ्यापुढे! रामसेवक, साहेबांची मोटार गेल्यावर जो भेटेल त्याला सांग ही बातमी. डोळे पांढरे होऊं देत एकेकाचे–

माई—पण इतक्यांत–

ढेरे—गप बस तू! जा–

रामसेवक—जी साहेब–(धावत निघतो.)

ढेरे—काय कसं वाटतंय आता? माझ्याशी म्हातारा नवरा म्हणून लग्नाला कबूल नव्हता नाही का तुम्ही? स्वप्नांत तरी वाटलं होतं का एवढ्या

मोठ्या अंमलदाराची सासू व्हाल म्हणून ? नाहीतर आज असलां असतां आपल्या बापाच्या खाणावळींत पोळ्या लाटीत–

माई—इतकं कांही हुरळून जायला नको. बाबांच्या खाणावळीत एकदा गव्हर्नराचा ए. बी. सी. येऊन गेलाय. मी वाढलंय त्याला माझ्या हातानं–

ढेरे—ए. बी. सी. नाही, ए. डी. सी. ! ए. डी. सी. जेवलाय म्हणे ! कुठल्या तरी भामट्यानं थाप मारली असेल ए. डी. सी. म्हणून ! वाढलं तुझ्या बापानं. इथं अस्सल काम आहे. जाऊं दे ते. आपलं हे नेहमीच चालायचं—

माई—टेशणावर पोचवायला तरी जायला हवं होतं—

ढेरे—अग ऐकलं नाहीस का तू ? खाजगी रिपोर्टस लिहायचेत म्हणाला. मोटारींत आता एकेकाच्या तंगड्या मोडून ठेवेल बघ तो. रामसेवकाचा निरोप ऐकून अशा मिरच्या झोंबतील एकेकाच्या नाकाला—माझ्या विरुद्ध तक्रारी करता काय ? मरा आता. अंमलदार झाला तर मी अंमलदाराचा सासरा लागून राहिलोंय म्हणावं आता ! बरं, पण आपण आता कुठं इथंच राह्यचं की मुंबईला बदली करून घेऊं ? कमिश्नरच्या जागेवर—

माई—मुंबईलाच जाऊं या. इथं काय आहे मेलं ह्या खेड्यात ?

ढेरे—जाऊं मुंबईला ! मुंबई काय ? दिल्लीपर्यंत वशीला पोहोयचतो आता आपला. दिल्ली–व्हायसरीगल लॉज–पार्ट्या–

माई—मग मला नव्या साड्या घेतल्या पाहिजेत. दिल्लीला काय हीं फटकुरं नेसून हिंडणार ? मोठमोठ्या मंत्र्यांच्या बायका येणार तिथं. आणि आताच सांगून ठेवते, कुंदाच्या लग्नांत मी उंच टाचेचे बूट घालणार–

ढेरे—घाल घाल ! उंच टाचेचे काय अगदी शिड्या लावून चाल पायाला. मलाहि कपडे टाकले पाहिजेत शिवायला–

माई—हो आणि मलाहि बिनबाह्यांचं पोलकं नाही चांगलं. टाईम्समध्ये दिल्लीच्या बायकांचे फोटो येतात, सगळ्यांच्या पोलक्याना बाह्या नसतात. शिवूं ना ?

ढेरे—विचारतेस काय ? अवश्य शीव ! आणि हे बघ, आणि जरा

तर्खडकरांची भाषांतरपाठमाला घे पाठ करायला. तीन वर्षं झाली, अजून थ्यँक्यू म्हणता येईना वेळच्या वेळी–

**कुंदा**—माई ऽ ऽ–

**माई**—काय ग ?

**कुंदा**—मला बाई लग्न म्हटल्यावर भीति वाटते–

**माई**—तुला कसली भीति मी असताना ? कांही तरीच मेलं एकेकाच कौतिक. आमची लग्नं झाली नाहीत ? ह्यांच्या वर मी मामंजी म्हणूनच पाया पडले होते चुकून. आठवतं ना ?

**ढेरे**—हो हो ऑठवतं ! आणि मी सुद्धा तुला तुझ्या त्या खाणावळवाल्या बापाची आर्जी समजलो होतो. मामंजी म्हणे ! डोळे फुटले होते तेव्हा तुझे–

**माई**—हो ! आणि तुमचे शाबूत होते. कुंदे तुला सांगून ठेवते, मला विचारल्याशिवाय अंमलदारसाहेबांशी एक अक्षर बोलायचं नाही–

**कुंदा**—पण ते माझ्याशी लग्न करणार आहेत–

**माई**—हो हो, तुझ्याशीच लग्न करणार आहेत ! कळतं मला ! सटवाईला नव्हता दादला आणि म्हसोबाला नव्हती बाईल !

**ढेरे**—म्हसोबा ? साहेबाना म्हसोबा म्हणतेस ? एवढ्या मोठ्या सरकारी अंमलदाराला ? राजद्रोहाखाली खटला भरीन तुझ्यावर– ( रामसेवक येतो. )

**रामसेवक**—साब !

**ढेरे**—काय रे ?

**रामसेवक**—बाहेर मंडळी भेटायला आली आहे–

**ढेरे**—पाठवून दे. सगळं गाव आलं तरी पाठवून दे. ( रामसेवक जातो. ) पाहिलंस ? आले असतील सगळे दातीं तृण धरून–

**पहिला शेटजी**—( येत ) जयगोपाल–कलेक्टर साहेब–

**दुसरा शेटजी**—नमस्ते, कलेक्टर साहेब–

**ढेरे**—( मनांतून अत्यंत चिडलेले परंतु वरून फाजील विनय दाखवित ) नमस्कार. आपले पवित्र पाय माझ्या झोपडीला लागले, उंबरा सोन्याचा झाला. इथं कुठं वाट वाकडी केली आपण ? जनाची आणि मनाची कोळून पिऊन

आला नाही ना ?–मी छळतों काय तुम्हाला ? माझा काटा काढणार होता तुम्ही ? अरे लोकांच्या भिंतींना कान असतील तर माझ्या ह्या टेबलखुर्च्यांना आहेत ! हरामखोर–

माई—इश्श ! ही काय बरं भाषा असली ?

ढेरे—गप बस तूं ! माहिती आहे तुम्हाला ? ज्या अंमलदारापुढं तुम्ही ह्या खोट्या तक्रारी गुदरल्या त्यानं वाकडं तर नाहीच केलं माझं, पण उलट जाताना सासरा करून गेला मला. नीट ऐका शेटजी, नाहीतर प्राण जाईल ऐकतां ऐकतां. अंमलदारसाहेब कुंदाशी लग्न करणार आहेत. दिल्लीला रिपोर्ट जाण्यापूर्वी रजेचा अर्ज करणार आहेत–लग्नासाठी. तुम्ही जगुमल, कापडाचा कंट्रोल उठवणार कधी–बसणार कधी–याची आठ आठ दिवस आधी इन्फॉरमेशन दिली तुम्हाला, त्याचे हे पांग फेडलेत ? तुम्हाला सभ्य समजलों आणि सरकारी कंत्राटं दिली तुम्हाला, त्याची ही फेड ! ( दुसऱ्या शेटजींना ) बारसं व्हायच्या आधी दीडदांडी मारायला शिकणारे तुम्ही, तुमच्या साखरेच्या पोत्यांची जप्ती मी थांबविली. केरोसीनची एजन्सी मी मिळवून दिली ती अशा रीतीनं माझ्या-विरुद्ध तक्रारी करायला ?

दुसरा शेटजी—रागावूं नका साहेब !

ढेरे—अरे चामडी लोळवली नाही तुमची ह्याबद्दल देवाचे आभार माना ! आता बाजी उलटली साहेब, बाजी उलटली.

पहिला शेटजी—साहेब, माय–बाप तुम्ही तारा आम्हाला ! समदा लगनाचा खर्च मी करतो—

ढेरे—तो आता तुमच्या तीर्थरूपाना चुकत नाही ! जा चालते व्हा ! ( जज्ज येतात. शेटजी जातात. )

जज्ज—कॉंग्रॅच्युलेशन्स ढेरेसाहेब. याला म्हणतात मुत्सद्दी ! शाबास ! कांही झालं तरी संस्थानी शिस्तीत वाढलेली माणसं आम्ही ! ह्या पोरासोरान. काय दाद देणार ! भले ! चांगला गुंडाळलात त्या अंमलदाराला–

ढेरे—टुमणे, तोंड आवरा ! माझ्या भावी जावयाबद्दल ही भाषा ?. डिस्ट्रिक्ट जज्जाचा बेलिफ करून टाकीन. ( हरभट नारभट येतात. )

हरभट—वा वा वा दिवाणसाहेब–कलेक्टरसाहेब, धन्य धन्य—अहो कुन्दाताईच्या लग्नात देव स्वर्गातून पुष्पवृष्टी करतील—

नारभट—स्वर्गातून काय हरभट ? स्वर्गाबाहेरून देखील ! हजार पान उठलं पाहिजे ढेरेसाहेब. जिलबी पाहिजे–

हरभट—जिलबीबरोबर मठ्ठा असू दे हं माईसाहेब. गडबडीत विसरून जातं म्हणून सुचवतों—

हेडमास्तर—( प्रवेश करीत ) वा वा वा ! ढेरेसाहेब. अमर्यादेची क्षमा असावी, पण नाही राहवत–( ढेऱ्यांना मिठी मारतो )

ढेरे—( मनांतून खूष होऊन ) अहो अहो ! अहो काय हें मास्तर ?

जज्ज—पण ढेरेसाहेब, हे जुळलं कसं ?

हरभट—अहो त्यांत काय आहे ? कन्ये आधीं तिच्या पतीतें विधि निपजवितो आर्येऽऽ म्हटलंच आहे अण्णा किर्लोस्करानं. आवाज काय होता बेट्याचा—

हेडमास्तर—भटजी, तुमचा आवाज बंद करा पाहूं ! काय कुन्दाताई, तुम्ही कां गप्प ? काय जादू केलीत त्या अंमलदारावर ?

माई—ती कसली जादू करणार ? मला विचारा. मलाच म्हणाले ते–

ढेरे—मंडळी, बसाना–

जज्ज—हं, काय काय म्हणाले ?

माई—लाज वाटते बाई सांगायला—

हरभट—तुम्हाला कसली लाज माईसाहेब ? तुमचं लग्न असतं तर गोष्ट निराळी ( जीभ चावून ) नाही पण वाटायचीच लाज—

नारभट—अरे लज्जा स्त्रीसुलभ आहे. त्याना नाही वाटायची, तर काय तुला ? खुळाच आहेस तू तरी. काय म्हणाले ते माईसाहेब ?

माई—काय सांगू. पाया काय पडले, गुढघे काय टेकले, दू ऽ ऽ र दू ऽ ऽ र जाऊं म्हणाले—

कुंदा—मलाहि असंच म्हणाले—

माई—अग होय तुझ्याबद्दल. पण प्रत्यक्ष मला म्हणाले—

ढेरे—मला हे कळलं तेव्हा विश्वास बसेना माझा. कांही कळेना–

सर्व—मग पुढे ?

**ढेरे**—मी मनांत म्हटलं, परमेश्वराचीच इच्छा दिसते. आपण कोणाचं कधी वाईट केलं नाही, तो कशाला आमचं वाईट करणार? त्यानंच जुळवून आणलं ( हरभट शिंकतो. )

**नारभट**—शिकलास काय? कृष्ण कृष्ण कृष्ण—

**हरभट**—अरे सरदीच्या शिंकेला अपशकून नसतो—

**ढेरे**—ए शास्त्र्या, अपशकुनाबिपशकुनाची भाषा बोललांत तर वळकट्या गुंडाळीन तुमच्या—

**जज्ज**—महामूर्ख आहेत लेकाचे.

**हेडमास्तर**—छड्या मारल्या पाहिजेत. बरं, पण अंमलदारसाहेब कुठे गेले ?

**ढेरे**—तें सीक्रेट आहे !

**जज्ज**—ढेरेसाहेब, तुमचा उदयकाळ आला आता—

**ढेरे**—मंडळी, चिंता करू नका ! मी उद्या मुंबईला कमिश्नर म्हणून गेलों किंवा दिल्लीला जाऊन परराष्ट्रीय खात्यात अमेरिकेचा परराष्ट्रीय वकील झालों—

**हेडमास्तर**—म्हणजे मिनिष्टर !

**ढेरे**—अँबेसेडर ! ! मास्तर, हेडमास्तर म्हणवतां आणि अँबेसेडर आणि मिनिस्टर ह्यांतला फरक ठाऊक नाही तुम्हाला ?

**हेडमास्तर**—चुकलं जरा आमचं—

**ढेरे**—हरकत नाही. मंडळी, उद्या मी अँबेसेडर झालों तरी तुम्हाला विसरणार नाही. आजवर राहिलात तसेच रुजू रहा. टुमणे, उद्या सुप्रीम कोर्टांत जज्ज नाही तरी शिरस्तेदार करीन तुम्हाला. मास्तर, तुम्हाला एखाद्या शेतकी कॉलेजांत प्रोफेसर करीन. नाहीतर सुरुंगवाड युनिवर्सिटीचा व्हाइस चॅन्सेलर नेमीन—

**हेडमास्तर**—त्यापेक्षा दिपोटीचं जमत असेल तर बघा. चांगला काटा काढतों एकेकाचा. कुंदाताई, केव्हढे उपकार केले तुम्ही आमच्यावर ! खरोखर जादू टाकलीत तुम्ही—

**हरभट**—एक गाणं म्हटलं असेल उंच गळा लावून! तो खुष! कुंदाताईचा आवाज काय? वा! माईसाहेबांचा देखील गोड आहे हो. ढेरेसाहेब, आजच्या ह्या शुभप्रसंगी आमचं तोंड गोड होऊं द्या. काय नारभट?

**नारभट**—आणि कानहि गोड होऊं द्या. हं कुंदाताई, म्हणा एखादं देवाचं गाणं—

**कुंदा**—इश्श!

**ढेरे**—म्हण की कुंदे. बसा, बसा, मंडळी. हं कुंदा—

**कुंदा**— ( गाणे म्हणते )

सीते तुझाच ग श्रीराम । आता ॥
तुझाच ग श्रीराम ॥
शिवधनु भंगुनि पहा ठाकला । रघुकुलकीर्तिललाम ॥
अवधपुरीचा श्यामसुलोचन
आला राघव जिंकुनिया पण
घाल गळ्यामधिं माळ तयाच्या । तुझाच तो विश्राम ॥
भरल्या नेत्रीं दुहिता पाही
व्याकुळ कैसा होइ विदेही
वियोग कन्येचा ना साही । जातां सोडुनि धाम ॥
अमलांगी गोरटी चालली
श्रीरामा वरमाला घाली
नयनांचे फिटतसे पारणे । पहाता सीताराम
सीते तुझाच ग श्रीराम ॥

( गाणें संपल्यावर सर्वजण टाळ्या वाजवतात. )

**पोस्टमास्तर**—( धावत प्रवेश करीत ) अरे टाळ्या कसल्या वाजवतां? शंख करायची वेळ आली आहे.

**ढेरे**—काय झालं हो पोस्टमास्तर?

**पोस्टमास्तर**—काय झालं? काय झालं नाही? घोटाळा झाला...! छे! ब्रह्मघोटाळा झाला!

**सर्वजण**—अहो सांगा तरी–

**पोस्टमास्तर**—( सर्वत्र घाबरी नजर टाकतो. श्वास घेतो आणि भेदरलेल्या आवाजात सुरवात करतो. ) मित्रहो ! घरीं जायला निघालों. तेवढ्यात हणमंत पत्र टाकण्यासाठी आलेला दिसला. ते पत्र नीट लक्ष ठेवून काढून घेतलं. पत्ता आहे–वसंतराव जोशी, होम डिपार्टमेंट, सेक्रेटरिएट, बॉम्बे. मला वाटलं कांही-तरी सेक्रेटरिएटला अधिकाऱ्यांबद्दल रिपोर्ट असेल. मला आंतला आवाज सांगू लागला, पोस्टमास्तर, पत्र उघडून पाहा–

**जज्ज**—अंमलदारसाहेबांचं पत्र आणि तुम्ही उघडलंत ?

**ढेरे**—काय म्हणतां ?

**पोस्टमास्तर**—मंडळी, मला असं अडवूं नका. आधीच माझे प्राण कासावीस झाले आहेत. एक मन सांगे–मास्तर, पत्र उघडा. दुसरं सांगे उघडूं नका. तुमचा सत्यानाश होईल. नुसत्या विचारांत एक तास गेला. ते कुठलं हॅम्लेट नाटक आहे ना–

**ढेरे**—नाटक जाऊं दे खड्डयांत. पुढे काय झालं ?

**पोस्टमास्तर**—मी देवाची प्रार्थना केली–म्हटलं मूकं करोति वाचालं–पंगु पंगु–

**हरभट**—लंघयते गिरीम्. हं, पुढे बोला–

**पोस्टमास्तर**—म्हटलं–देवा, मला ह्या पापाबद्दल क्षमा कर. धीर केला. दारं खिडक्या बंद केल्या. सारखं वाटे, पत्रांत कुणाकुणाचे मृत्युलेख आहेत कोण जाणे. थरथरत्या हातानी पत्र वाफेवर धरलं. एकएक कोपरा डिंकापासून सुटायला लागला, लिफाफा उघडला. पण आतलं पत्र उघडवेना. शेवटी रामाचं नांव घेतलं आणि पत्र उघडलं—

**ढेरे**—पोस्टमास्तर ! पुन्हा वर तोंड करून सांगतां ! आणि एवढ्या मोठ्या सरकारी अंमलदाराचं पत्र फोडून वाचायला लाज नाही वाटली तुम्हाला ?

**पोस्टमास्तर**—मुळीच नाही ! तो एवढा मोठा नाही, सरकारी नाही, आणि अंमलदार तर मुळीच नाही–

**ढेरे**—गांजा पिऊन नाही ना आलां ?

**पोस्टमास्तर**—ढेऱ्या, तोंड आवरून बोल–

**ढेरे**—पोष्ट्या ! ( एकमेकांच्या अंगावर धावून जातात. )

**पोस्टमास्तर**—अरे जा ! कलेक्टर असशील तर आपल्या घरचा. अजून नेमणूक पक्की व्हायचीय् तुझी. तुम्ही मारे संस्थानी खात्याला खूप कळवले असेल आपण सुरुंगवाड संस्थानात कलेक्टर होतों म्हणून. त्यालसांत फार तर जकात कारकून म्हणून जाल सुरुंगवाडच्या नाक्यावर–

**हरभट**—शांतम् पापम्

**ढेरे**—काय वाटलं रे तुला ? तुरुंगात डांबीन. अंमलदाराविरुद्ध बोलतोस ? तुला कैद केलीय मी !

**पोस्टमास्तर**—तूं ? मला ? करून बघ ! कोर्टांत हवेलंडी उडवली नाही तर नावाचा डाकेमास्तर पोस्टल सुप्रिंटेंड नव्हे–

**ढेरे**—कुठल्या जोरावर ह्या गमजा सांगतोस ? उद्या तो अंमलदार माझा जावई झाला म्हणजे थेट दिल्लीला वशिला पोहोचतोय माझा ! पोस्टमंत्र्यांना सांगून सातपुड्याच्या जंगलात रनर म्हणून बदली करीन तुझी. इतका कसला जोर आलाय तुला ?

**पोस्टमास्तर**—ह्या पत्राचा ! !

**सर्व**—मास्तर, वाचा ! ! वाचा तरी–

**पोस्टमास्तर**—वाचतों. पण माईसाहेब, अगोदर कांदा–पाणी–अमोनिया वगैरे आणून ठेवा. एकेकाचे डोळे पांढरे होतील ऐकून ! ऐका–

प्रिय वसंता,

आजपर्यंत तू डझनभर नाटकं लिहिली असशील, पण मी प्रत्यक्ष अनुभवलेल्या एका प्रसंगाइतकं रोमहर्षक कथानक तुझ्या स्वप्नात देखील आलं नसेल. आम्ही नेहमीप्रमाणे वडलांना थापा मारून बिझिनेस करण्यासाठी म्हणून कोल्हापुराहून निघालों. निघताना आमच्या म्हाताऱ्यानं पाचशे रुपये दिले होते. सोबत माझ्यावर देखरेख ठेवण्यासाठी, पण वरून माझ्या तैनातीसाठी, म्हणून आमचा नोकर हणम्या दिला होता. आम्ही भटकत निघालों. सध्या गावोगावीं जत्रा चालल्या आहेत. वाटेंत चिंचलीच्या जत्रेतं जुगार खेळलो आणि होतं नव्हतं ते सारं घालवून बसलो. जवळपास पाचपंचवीस रुपये राहिले होते. ते घेतले आणि सुरुंगवाडला येऊन ठेपलों. सुरुंगवाड संस्थान नुकतंच विलीन झालं आहे. वर्तमानपत्रात बातमी येण्याइतकंहि हे संस्थान महत्त्वाचं नाही.

टीचभर आहे. आणि प्रिय मित्र वसंत, इथले लोक आम्हाला दिल्लीच्या संस्थानी खात्यांतला अंमलदार समजले. आमचा एकूण रुबाब, बोलण्या-चालण्याचा डौल, यावरून ह्या संस्थानी गावंढळांची अशी समजूत झाली असावी. इथे आलों तेव्हा एका खाणावळींत उतरलों होतो. त्याचं बिल तुंबलं होतं आणि तो आमच्या पृष्ठभागावर लाथ मारून हाकलून देण्याच्या विचारात होता. तितक्यात कोणीतरी गाढवानं (हरभट व नारभट दचकतात) मी अंमलदार असल्याची अफवा उठविली. हे पत्र मी त्या खाणावळीतूनच लिहितों आहे. त्याचे बिल कां बुडवा म्हणून ह्या गावांतून पलायन करता करता देऊन टाकण्यासाठी आलों आहे. मी अंमलदार आहे ह्या समजुतीने इथल्या लाचखाऊ अधिकाऱ्यांनी आमच्या खिशांत नोटांची पुडकीं कोंबली आहेत. मालकाच्या अंगावर एक शंभराची नोट भिरकावली आहे. त्याला मोड मिळेपर्यंत हे पत्र लिहीत आहे. तुम्ही मोठे नाटककार लागून राहिला आहांत तेव्हा डीटेल्स लक्षांत आहेत तोपर्यंत कळवतों–

आम्ही अंमलदार आहों हे ठरल्यावर, इथल्या जुन्या दिवाणसाहेबांनी आम्हाला त्यांच्या बंगल्यावर नेलें. सेवेला ऋद्धिसिद्धीसारख्या त्यांच्या द्वितिय पत्नी आणि एकमेव सुंदर कन्या होत्या. तेवढ्यांत आम्ही त्यांच्या कन्येवर प्रेम करून लग्नहि ठरविलें. ह्या दिवाणाचें नांव ढेरेसाहेब! तसा उदार दिसतो. पण कुंभाराच्या मडक्यांत आणि गाढवांत मिळून जितकी अक्कल असेल तितकीहि त्याच्या टाळक्यांत नाही–

**ढेरे**—साफ खोटं! पोस्ट्या, तूं हे स्वतः लिहिलं आहेस–

**पोस्टमास्तर**–मला काय जरूर! मंडळी, हे अक्षर माझं आहे का? तुम्हीच पाहा.

**जज्ज**—छे! छे! हे पोस्टमास्तरांचं अक्षर नाही. हे जरा बरं आहे! हं वाचा पुढे—

**पोस्टमास्तर**—ऐका! कुंभाराच्या मडक्यांत आणि गाढवांत—

**ढेरे**—पुन्हा कशाला वाचतां ते? हाच रिपोर्ट लिहायचा होता वाटतं! हरामखोर!

**पोस्टमास्तर**—ठीक आहे. अं, हं—यम्‌यम्‌यम्‌ हं टाळक्यात अक्कल नसेल. दुसरा पोस्टमास्तर. हं ! हे कांही विशेष नाही—( पत्र खिशांत दडपूं लागतो )

**ढेरे**—वाचा की—

**पोस्टमास्तर**—कां म्हणून ?

**ढेरे**—कां ? आमच्याबद्दल वाचताना आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतील—

**जज्ज**—द्या इकडे. हं—( चष्मा लावून ) पोस्टमास्तर. हं—ह्याला पोस्टमास्तर कोणी केला देव जाणे. अत्यंत कळकट माणूस ! बार्शी लाइट रेल्वेच्या स्टेशनवरचा हमाल सुद्धा त्याच्यापेक्षा चांगला दिसत असेल !

**पोस्टमास्तर**—हो हो ! हलकट कुठला !

**जज्ज**—आणि इथला जज्ज टुमणे. यम्‌यम्‌—

**हेडमास्तर**—वाचा की—

**जज्ज**—पुढली अक्षरं नाही लागत—

**हेडमास्तर**—आणा इथं. वर्गातल्या पोरांची गिचमिड अक्षरं वाचून संवय आहे मला. हं, जज्ज टुमणे. ह्या इसमाच्या चेहऱ्यावर सदैव बिनतिकिटानं प्रवास करणाऱ्या इसमाची कळा आहे.

**जज्ज**—आहाहा ! !

**हेडमास्तर**—पुढे ऐका ! आणि याचीं गावांतल्या कांही बायकाशी लफडी आहेत म्हणे—

**जज्ज**—साफ खोटं !

**ढेरे**—काय खोटं ? कायरे भट्टा, तुझा चेहरा कां पडला ?

**हेडमास्तर**—पुढं ऐका—ह्या बोक्यावर खूष असणाऱ्या बायका एकतर आंधळ्या तरी असतील किंवा सरसकट ठाण्याच्या इस्पितळातून पळून आल्या असतील ! बरं झालं आमच्याबद्दल कांही नाही.

**पोस्टमास्तर**—खोटं बोलूं नका. आणा ते पत्र. ( पत्र हिसकावतो ) हे घ्या शेवटी राहिला हेडमास्तर. हा म्हणे पूर्वी बाजारमास्तर होता.

**हेडमास्तर**—ह्याला कोणी सांगितलं ? हां ! त्या रोंगे डॉक्टराचं काम असेल. तरीच लेकाचा दिसत नाही इथं.

**पोस्टमास्तर**—ऐका, हा तर माझ्यापुढं यायला भिजलेल्या कुत्र्यासारखा थरथरत होता. त्याला वाटलं त्याचीं कांही मास्तरणीबिस्तरणींची लफडीं मला कळली आहेत. पण ह्या खोकडावर मास्तरणी कशाला, गावांतली कुत्रीं देखील खूष होणार नाहीत—

**हेडमास्तर**—अरे जा! सुंद्राबाई नर्सला विचार म्हणावं. (चपापतो)

**हरभट**—मी सुटलों—

**नारभट**—आणि मीहि—

**पोस्टमास्तर**—कसे सुटाल? शिवाय दोन भटजी आहेत. उकिडवे आणि बोबडे. नुसते शुद्ध सात्त्विक नंदीबैल!

**हरभट**—म्हणजे कांही फार वाईट नाही!

**पोस्टमास्तर**—वसंता, ह्या विषयावर जरूर नाटक लिही. बाकी ठीक. आमचे तीर्थरूप आणखी पंधरा वर्षे तरी नक्की जगणार. तोपर्यंत आमचे हे असेच हाल चालायचे. पण तूर्त या सुरुंगवाडकर गाढवांच्या कृपेनं एक हजार-भर रुपये कमावले! सगळे बेटे एकजात लाचखाऊ. मलाहि त्यांनी लाचखाऊ बनवले! कळावे, तुझा सर्जा!

**माई**—मी तो आला त्याच वेळी ओळखलं होतं, हा कोणीतरी लफंगा आहे. पण आमच्या ताईसाहेब हुरळून गेल्या ना—

**कुंदा**—मुळीच नाही. ते माझ्या अंगाला हात लावायला आले तेव्हा मी स्वच्छ सांगितलं त्यांना, असला फाजीलपणा मुळीच खपणार नाही म्हणून. तूच उलट हुरळली होतीस—

**ढेरे**—जा, जा, परत आणा त्याला. फांशी देतों चोराला—

**पोस्टमास्तर**—ते शक्य नाही!

**ढेरे**—कां शक्य नाही?

**पोस्टमास्तर**—त्याचा क्राइम कोणता आहे? तुम्ही गाढवांनी त्याला अंमलदार समजून नोटा कोंबल्यात त्याच्या खिशांत, ह्यांत त्याचा काय गुन्हा? तो काही सांगायला आला नव्हता आपण अंमलदार आहोंत म्हणून.

**जज्ज**—शिवाय ब्राइब घेण्याप्रमाणें देणें हाहि गुन्हा आहे. माझे चारशे गेले—

हेडमास्तर—मला चारशे रुपयाला चाट बसली.

हरभट—माझे पन्नास—

नारभट—पण माझे पंचवीस होते त्यांत—

हरभट—होय ! तुझे पंचवीस आणि माझे पंचवीस—

ढेरे—पैशाचा कसला हिशेब करता गाढवांनो ? माझी अब्रु गेली. त्याच्या जोरावर व्यापाऱ्यांना दम देऊन बसलों, उद्या हे त्यांना कळलं तर बुलन् कापड सोडा, लंगोटीला देखील चिंधी देणार नाहीत फुकट. छे छे छे—काय गाढव मी ! इतकी वर्षं संस्थानी राज्यकारभार केला आणि—आणि यःकश्चित् पंचवीस वर्षांचं कारटं मला फसवून गेलं. जा धरून आणा त्याला. चौकात फोडून काढतों. हरामखोर. डुक्कर ! अंमलदार म्हणे ! कुठल्या गधड्यानं मला येऊन सांगितलं तो अंमलदार म्हणून—

जज्ज—आपणच त्या दिवशी सकाळी ते पत्र वाचून दाखविलं—

ढेरे—अहो होय. पण हाच तो अंमलदार म्हणून कुठल्या बैलानं येऊन सांगितलं मला ? विस्तवावर भाजून काढीन त्याला—

जज्ज—कोण बरं—हां हे दोघे. बैल म्हणालांत तेव्हा आठवलं.

हरभट—मी ? शांतं पापम् !

नारभट—मी ? भलतंच !

हेडमास्तर—हो हो हेच !

माई—हो हो हेच ! हेच आले होते—मेले कोकलत—

ढेरे—बरोबर, हेच ते दोघे ! शेंड्या धरून ठेचतों आता. कुत्रे लेकाचे ! तोंड वर करून हेच भुंकत सुटले होते, अंमलदारच तो—अंमलदारच तो करीत. कुठे फेडाल हे पाप चांडाळानो—

जज्ज—चोर !

हेडमास्तर—सैतान !

माई—राक्षस मेले ! कसे अहिमहीसारखे माजले आहेत पाहा फुकटच खाऊन !

हरभट—माईसाहेब, हा नारभटच प्रथम म्हणाला. नाही म्हणूं नकोस—

नारभट—मी ? तूंच मला नेलंस तातू भंडाऱ्याकडे—

हरभट—खोटं बोलतोस? रौरवांत जाशील चोरा! तुझं पोट दुखत होतं त्या दिवशीं. तूच कुक्कुटार्क प्यायला गेलास—

रामसेवक—( धांवत येतो. भयंकर भेदरला आहे. ) साऽहेऽब— साहेऽब—

ढेरे—काय रे ?

रामसेवक—साहेब—( मागे कोणी तरी येत आहे, अशी हाताने खूण करतो. एक सरकारी तांबडा पट्टा लावलेला पट्टेवाला येतो. )

ढेरे—कोण तुम्ही ?

पट्टेवाला—मिस्टर ढेरे कोण आहेत इथं ?

ढेरे—मी—मी—आपण कोण ?

पट्टेवाला—दिल्लीच्या संस्थानी खात्यांतून बडे अंमलदारसाहेब चौकशी साठी आले आहेत. डाकबंगल्यांत उतरले आहेत. आपल्याला ताबडतोब बंगल्या-वर या असा हुकूम आहे—

पोस्टमास्तर—( धावत जाऊन त्याचा बिल्ला वाचतात. ) मिनिस्ट्री ऑफ स्टेट्स, देहली. हाच तो खरा अंमलदार. मंडळी, आता शंखान् दध्मुः पृथक् पृथक्. आमचं डिपार्टमेंटच डिफ्रंट आहे. ( पट्टेवाल्याला ) हेच ते ढेरेसाहेब, कलेक्टर ऑफ सुरुंगवाड ! हॅ हॅ हॅ हॅ ( हसतो. )

( सर्वजण संताप, भीति इ. मिश्र भावनांनी पोस्टमास्तराकडे पाहतात. ढेरेसाहेब कोचांत कोसळतात आणि पडदा पडतो. )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय विभाग.
क्र. २३९०८ नों. दि. ५।७।९०
वि. ....

IRBK-0123908